# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192472
UNIVERSAL LIBRARY

सामराजकविविरचित

# रुक्मिणीहरण.

[ उपोद्घात, शब्दकोश, अर्थनिर्णायक व अवांतर टीपांसहित. ]

शालोपयोगी संक्षिप्तावृत्ति.

संपादक

गोपाळ विष्णु तुळपुळे, एम् ए.,

इंग्रजी व मराठी विषयांचे अध्यापक—फर्ग्यूसन कॉलेज.

आवृत्ति पहिली

१९२४

किंमत १२ आणे

प्रकाशक
गोपाळ विष्णु तुळपुळे,
८४४ सदाशिव पेठ, पुणें.

[ सर्व हक्क स्वाधीन ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पु

# चार शब्द

सामराजाच्या 'रुक्मिणीहरणां'तील आबालवृद्धांस प्रिय झालेली कथा, त्यांतील गोड व प्रासादिक काव्य, मनोवेधक प्रसंग, बहारीचीं वर्णनें व सुंदर उपदेश इत्यादि गुणांमुळें हें काव्य विद्यार्थ्यांच्या वाचनांत अवश्य आलें पाहिजे असें वाटल्यावरून त्याची ही शालोपयोगी संक्षिप्तावृत्ति काढली आहे. मूळ काव्य बरेंच मोठें असून त्यांत कांहीं प्रसंगी विचारांची व वर्णनांची पुनरावृत्ति झाली आहे; कांहीं ठिकाणीं लग्नसाहित्याच्या व वस्त्रपात्रांच्या लांबच लांब नीरस याद्या आल्या आहेत, व कांहीं स्थलें विद्यार्थ्यांस अनिष्ट अशीं आहेत. मूळ कथेचा धागा तुटूं न देतां व रसभंग होऊं न देतां, वरील प्रकारचे सर्व भाग गाळून ही आवृत्ति तयार केली आहे. सामराजाचें हें काव्य पुष्कळदां वामनपंडितांची आठवण करून देतें. कांहीं श्लोक त्यांच्यापेक्षांहि सरस वाटतात. काव्य प्रासादिक व सुबोध आहे. इतक्या उच्च दर्जाच्या काव्याशीं विद्यार्थ्यांचा परिचय होणें इष्ट आहे, व या कामीं प्रस्तुत आवृत्तीचा उपयोग होईल अशी आशा आहे.

८४४ सदाशिव पेठ,
पुणें.

गोपाळ विष्णु तुळपुळे.

# उपोद्घात.

मराठी काव्य म्हटलें कीं विद्वानांनीं त्याच्याकडे पाहून नाकें मुरडावींत व त्याला नांवें ठेवीत सुटावें असा एक काळ नुकताच येऊन गेला. या काळाचें यथार्थ वर्णन 'निबंधमालें'तील 'मोरोपंतांची कविता' या निबंधांत पहावयास सांपडतें. मराठी काव्याला सर्वस्वीं प्रतिकूल असलेलें तें अनिष्ट वातावरण अनेक कारणांनीं हळुहळू निवळूं लागलें. 'काव्येतिहास संग्रह', 'काव्यसंग्रह' वगैरे नियतकालिकांतून जुनीं काव्यें प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें तीं लोकांच्या वाचनांत येऊन इंग्रजी काव्यवाचनानें मराठी काव्याविषयीं उत्पन्न झालेले विपरीत ग्रह नाहींसे होत चालले. पुढें सुदैवानें मराठी भाषेचा मुंबई विश्वविद्यालयांत प्रवेश झाला, व त्यायोगें अलीकडे या पंधरावीस वर्षांत मराठी काव्य लोकांच्या वाचनांत अधिकाधिक येऊं लागल्यामुळें तत्संबंधीं मनांत वावरणारे पूर्वग्रह बरेचसे कमी होऊन या भाषेच्या वाङ्मयाला अनुकूल काल उत्पन्न झाला आहे. अशा अनुकूल परिस्थितींत-सुद्धां जुन्या मराठी काव्यावर ठराविक आक्षेप घेणारी मंडळी दृष्टीस पडतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें जुन्या मराठी कवींत प्रतिभा, स्वातंत्र्य, निसर्गाचें प्रेम वगैरे खऱ्या कवींत वास करणारे गुण मुळींच दिसून येत नाहींत. नाहीं म्हणावयाला नामदेव-तुकारामादि संत मंडळी मात्र आक्षेपकांच्या तडाक्यां-तून वांचलेली दिसते. या आक्षेपांचें खंडन कांहीं विद्वानांनीं उत्तम प्रकारें केलें आहे. तथापि हा विषयच असा आहे कीं प्रसंगीं पुनरुच्चाराचा दोष पत्करून सुद्धां तो पुन्हां हातांत घेण्याची इच्छा होते.

काव्याच्या अनेकांनीं अनेक व्याख्या केल्या आहेत, त्या सर्वांत 'रसा-त्मकं काव्यं' ही व्याख्या विशेष योग्य दिसते. काव्याचा मुख्य हेतु मनो-रंजन. दुसरे आणखी हेतु असले तरी ते गौण होत. अंतःसृष्टि किंवा बाह्यसृष्टि यांपैकीं एखादा हृदयंगम प्रसंग किंवा देखावा पाहून आपल्या स्वतःच्या मनांत ज्या आनंदलहरी किंवा दुःखावेग, भीति किंवा आश्चर्य,

वगैरे विकार, विचार व भावना उत्पन्न झाल्या असतील त्या तशाच शब्दचित्रांनीं वाचकांच्या मनांत उत्पन्न करणें हा कवीचा मुख्य हेतु असतो. हा हेतु साध्य होण्यास त्याच्यामध्यें अनेक गुण असावे लागतात. पण त्या सर्वांत प्रसाद, प्रतिभा व प्रेम हे तीन मुख्य होत. प्रासादिक कवींची कविता आबालवृद्धांना सहज वाचतां वाचतां समजण्यासारखी असते. तिचा अर्थ लावण्यास त्यांना कष्ट पडत नाहींत. काव्यविषयाशीं कवीचें मन तादात्म्य पावून त्याच्या वृत्ती प्रबळ झाल्या म्हणजे स्वाभाविकपणें त्या काव्यरूपानें मुखावाटे बाहेर पडतात. अशा सहज स्फूर्तीनें उत्पन्न झालेल्या काव्यांत उत्तान अर्थ नसल्यास नवल? कवीचा दुसरा गुण 'प्रतिभा'. कवीच्या मनांत नाना प्रकारचे नवीन नवीन विचार उत्पन्न करून त्याला प्रत्यहीं आपलें हें नश्वर जग सोडून काल्पनिक जगांत वावरावयास लावणारी अद्वितीय शक्ति ती प्रतिभा. 'प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता', अशी 'प्रतिभा' शब्दाची संस्कृतांत व्याख्या आहे. तिसरा गुण 'प्रेम'. हा गुण काव्याला प्रसाद व प्रतिभा यांच्या इतकाच अवश्यक आहे. किंबहुना प्रेमाचा जिवंत झरा कवीच्या हृदयांत वहात असल्याशिवाय खरा प्रसाद व खरी प्रतिभा यांचा वास त्याच्यांत संभवणार नाहीं. दीर्घाभ्यासाच्या जोरावर कदाचित् हे गुण एखाद्याला कांहींसे हस्तगत करून घेतां येतील, पण स्वाभाविक दैवीतेजाच्या अभावीं त्यांची कृत्रिमता त्याच्या काव्यांत जागोजाग उघडकीस येईल.

उपरीनिर्दिष्ट तीन मुख्य गुण उच्च दर्जाच्या कविश्रेष्ठांत पहावयास सांपडतात. याशिवाय इतरही अनेक गुण कवीच्या ठिकाणीं असावे लागतात, पण ते गौण होत. कोणत्याही कवीच्या काव्यांतील गुणावगुण पाहून त्याची योग्यता ठरवितेवेळीं या तीन गुणांकडेच प्रथम लक्ष जातें. जुन्या मराठी कवींचें व त्यांच्या काव्यांचें परीक्षण करतांना हीच दृष्टि ठेविली पाहिजे.

कवीची योग्यता ठरवितांना आणखी एका गोष्टीचा विचार करावा लागतो. प्रत्येक जनतेचे, व कवी हे जनतेचे घटक असल्यामुळें त्या जनतेंतील कवींचे, देशकालामानाप्रमाणें कांहीं विशेष असतात. भिन्न भिन्न देशांतील व कालांतील आचारविचार व भावना भिन्न भिन्न असतात. अनेक कारणांनीं त्यांच्या

मनोरचनाच वेगवेगळ्या बनतात. अशा स्थितींत एका देशांतील किंवा कालांतील कवींच्या काव्यांतून येणारे विषय, वर्णनें, कल्पना, अलंकार इत्यादि गोष्टी दुसऱ्या देशांतील किंवा कालांतील कवींच्यापेक्षां निराळ्या असल्या तर त्यांत आश्चर्यकारक किंवा दूषणीय असें कांहींच नाहीं. एकाच देशांतील पण भिन्न भिन्न कालांतील कवींत सुद्धां हा भिन्नभाव दिसून येतो. आंग्ल कवींतील एकीकडे सोळाव्या शतकांतील स्पेन्सर व शेक्स्पीअर घ्या, व दुसरीकडे एकुणिसाव्या शतकांतील वर्ड्स्वर्थ, बायरन, शेले वगैरे नाणावलेल्या कवींपैकीं कोणतेही घ्या. यांच्या काव्यविषयांत किंवा विषयवर्णनांत कितपत साम्य आढळतें? तथापि हे सर्व कवी आपआपल्या परीनें श्रेष्ठ दर्जाचे आहेत. ह्याचें कारण एकच कीं, त्यांचीं काव्यें प्रतिभासंपन्न असल्यामुळें त्यांत मुख्य मुख्य काव्यगुण बाहुल्यानें पहावयास सांपडतात. त्यांचे काव्यविषय, विचार व कल्पना भिन्न भिन्न असल्या तरी त्यांच्या काव्यगुणांत व त्यामुळें श्रेष्ठपणांत त्यांचें साम्य असते. स्पेन्सर व शेक्सपिअर यांच्या काव्यांत वर्ड्स्वर्थची सृष्टीची कल्पना व तिचीं तदनुरूप वर्णनें आढळणार नाहींत, तर वर्ड्स्वर्थमध्येंही स्पेन्सरच्या मध्ययुगीन 'रोमॅन्सेस्' दृष्टीस पडणार नाहींत. पण याबद्दल त्यांचे भिन्न भिन्न काल व तत्कालीन परिस्थित्या जबाबदार आहेत. काव्याचा विषय, त्यांतील निरनिराळे प्रसंग किंवा स्थलें हीं काव्याला अनुकूल अशीं असावींत; परंतु काव्याची पारख करतांना त्यांच्याकडे विशेष लक्ष न देतां कवीनें आपला विषय आणि त्यांतील प्रसंग व स्थळें कशीं रंगविलीं आहेत हें मुख्यतां पाहिलें पाहिजे. कवि हा चित्रकार असून तो आपलें चित्र शब्दांनीं रंगवीत असतो. एखादें चित्र पहात असतांना तें कशाचें आहे हें न पहातां आपण तें मुळाबरहुकूम साधलें आहे कीं नाहीं हें मुख्यत्वेंकरून पहातों, व त्या मानानें त्या चित्रकाराची योग्यता ठरवितों. पाश्चिमात्य चित्रांत पुष्कळदां दिसून येणारे जलपर्यटणाचे, नौकाविहाराचे किंवा समुद्रावरील युद्धाचे प्रसंग आपल्या इकडील चित्रकलेंत फारसे दृष्टीस पडणार नाहींत; त्यांच्याकडील भव्य व सुंदर इमारतींची घाटणी आपल्या मोठमोठ्या देवळांत, गोपुरांत किंवा मुसलमानी अमदानींत बांधलेल्या मशिदींत आढळणार नाहीं; त्यांचें गायनवादन आपल्यापेक्षां भिन्न तऱ्हेचें असेल; परंतु येवढ्यावरून

जर कोणी असें म्हणूं लागला कीं इकडचे चित्रकार, शिल्पकार किंवा गवई व बजवय्ये ही मंडळी कुचकामाची आहेत तर त्याचें हें विधान बरेंच धाडसाचें होईल.

इतर देशांतील कवींप्रमाणें आमच्या भारतीय कवींमध्येंही स्वाभाविकपणें कांहीं गुणावगुण आहेत. आमच्या कवींच्या—विशेषें करून जुन्या कवींच्या—काव्यसरितेचा ओघ परमेश्वरगुणवर्णनाकडे वहात असल्यामुळें तिच्यांत भक्ति, निवृत्ति व परमार्थ यांनाच स्वाभाविकपणें प्रमुखस्थान मिळालें आहे. मराठी कवींनीं हा दहावा भक्तिरस निर्माण केला असें म्हणण्यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. जसा कवीचा स्वभाव तसें त्याचें काव्य. आधिभौतिक विषयांपेक्षां पारमार्थिकांकडे अधिक कललेल्या मनांत आधिभौतिक विषयांना गौणपद मिळणें अगदीं स्वाभाविक आहे. या दृष्टीनें मराठी काव्याकडे पाहिलें म्हणजे त्या काव्यांत दिसून येणाऱ्या गुणावगुणांचा उलगडा होतो. मानवी कृतीत गुणांबरोबर दोष रहाणारच. या नियमानें मराठी काव्यांत कांहीं दोष नाहींत असें नाहीं. पण कोणत्या देशांतील काव्य अगदीं निर्दोष आहे ? शिवाय दुसरे असें कीं, आमच्या कवींत दिसून येणारे दोष सर्वच यथार्थ आहेत कीं नाहींत हें पाहिलें पाहिजे. मराठी काव्य पूर्वग्रह बाजूला ठेवून नीट काळजीपूर्वक वाचलें व त्यांत दिसणाऱ्या दोषांची छाननी केली म्हणजे असें आढळून येईल कीं, त्यांतील बराच अंश आभासात्मक व काल्पनिक आहे. इतकें करूनही कांहीं दोष रहातील व ते केव्हांही सरळमनानें कबूल केले पाहिजेत. पण तेवढ्यावरून जुने मराठी कवि येथून तेथून टाकाऊ, परभृत, अरसिक वगैरे दोषांस पात्र होतात असें नाहीं.

सदर प्रस्तावना विस्तृत स्वरूपाची नसल्यामुळें वर प्रदर्शित केलेले विचार अत्यंत संक्षिप्तपणें व्यक्त केले आहेत. प्रस्तुत काव्यांत त्यांचें समर्थन करण्यासारखीं अनेक उदाहरणें असल्यामुळें आणखी निराळीं उदाहरणें देऊन प्रस्तावना लांबविली नाहीं. किंबहुना हें सरस मराठी काव्य वाचकांच्या पुढें आणून तद्वारें मराठी काव्यावरील आक्षेपनिरसन अंशतः तरी झालें तर पहावें याच हेतूनें हें पुन्हां एकदां छापून काढण्याचें मनांत आणलें. मराठी कवींच्या समर्थनार्थ चिपळूणकर, पांगारकर, भावे, आजगांवकर वगैरे विद्वानांनीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. रा० भाव्यांच्या

'महाराष्ट्र-सारस्वतां'तील उदाहरणें वाचलीं तरी सुद्धां पुष्कळसें काम भागणार आहे. रा० पांगारकरांचें 'मोरोपंती वेंचे' हें छोटेंसें पुस्तक काळजीपूर्वक वाचल्यास पंतांच्या काव्याची थोरवी उत्तमप्रकारें दिसून येईल. रा० आजगांवकरांच्या 'महाराष्ट्र-कविचरित्रा'च्या तिन्ही भागांत प्रत्येक कविचरित्राच्या शेवटीं त्या कवीच्या काव्याचे निवडक उतारे दिले आहेत. त्यांचाही या कामीं चांगला उपयोग होईल. या दोन पुस्तकांत सामराजाच्या काव्याची भर पडल्यास तें मराठी कवींची बाजू चांगली सांवरून धरील असा अंदाज आहे.

सामराजकवीची आजतागायत उपलब्ध असलेली माहिती रा० भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्र–सारस्वतां'त दिली आहे. ती अशी—

"निरंजनमाधवाप्रमाणेंच कांहींशी नानाविध रचना करणारा दुसरा एक कवि या काळीं ( शाहूमहाराजांच्या काळीं ) हयात होता असे दिसतें. याचें नांव सामराज. या सामराजासंबंधें एक मोठी अडचण अशी आहे कीं, यानें आपली चरित्रात्मक अशी माहिती आपल्या ग्रंथांत फारशी दिलेली नाहीं. यामुळें 'सामराज' किंवा 'शामराज' या नांवाचा एकच ग्रंथकार असून त्या नांवावर उपलब्ध असलेले सर्व ग्रंथ त्या एकाचेच आहेत, किंवा हे भिन्न ग्रंथकारांचे ग्रंथ आहेत हें कळण्यास मार्ग नाहीं. 'कोकशास्त्रा' पासून 'भागवतटीके'पर्यंतचे निरनिराळे दर्जाचे विषयांवरील ग्रंथ सामराज कवीनें लिहिलेले आढळतात. एका संस्कृत ग्रंथाच्या आधारें 'मी ही कामशास्त्रटीका रचितों' असें कवि त्या ग्रंथाचे प्रारंभीं लिहितो. भागवताच्या दशमस्कंधावरही एक टीका आहे. हींत कवि आपलें नांव 'शामराज', 'शाम' व 'सामराज' असें तीन तऱ्हेनें लिहितो. या टीकेचे ९० अध्याय असून हिची ग्रंथसंख्या जवळजवळ साडेचार हजार आहे. हा ग्रंथ यानें एका वर्षांत लिहिला.* हा ग्रंथ अगदीं साधारण आहे. यावरून ही रचना

* या भागवतटीकेचे प्रारंभीं–संवत सत्राशें साठीं (१७६०) भरितां। ... मीच शामराज कथा वदितां।...इ० (अ. १-ओं. ५) व शेवटीं संवत सत्राशें एक सष्टींत। श्रावण वद्य सप्तमी भरत। त्यांत हें पुराण पूर्ण होत।... ( अ. ९०–ओं. ५६ ) असे उल्लेख आहेत.

अगदीं प्रारंभींची असावी किंवा हा कवि पुढील 'रुक्मिणीहरण'कर्त्या कवीहून भिन्न असावा असें वाटतें."

"सामराजानें रचिलेलें एक 'मुद्गल आख्यान'ही उपलब्ध आहे. या प्रकरणावरून कवीचें कुलदैवत 'मुद्गल' हें होय असें दिसतें. या मुद्गल आख्यानांत कवीनें आपलें गोत्र, मातापिता व बहीण यांचा उल्लेख पुढील-प्रमाणें केला आहेः—

शाकल्यान्वय सागरीं जानिं असे ज्याची मना शुद्धता ।
आल्हादीं द्विजराज लक्ष्मण सुधी जाणा जयाचा पिता ॥
काशी हे विमळा जयास जननी मंदाकिनी सोदरी ।
केली मुद्गलदैवतस्तुति पहा त्या सामराजें बरी ॥

हें मुद्गल क्षेत्र दौंडापासून चार कोसांवर भीमा नदीचें कांठीं आहे, व येथील जोशीपण सातारच्या राजोपाध्यांकडे आहे."†

—महाराष्ट्र-सारस्वत. आवृत्ति पहिली. पृष्ठ २२१-२२.

'रुक्मिणीहरणां'तही सामराजानें आपल्याविषयीं कांहीं माहिती दिलेली नाहीं. फक्त पहिल्या सर्गांतील एक दोन श्लोकांवरून त्याच्या मातृ-भाषेची व स्वभावाची ओळख होते. तो म्हणतोः—

असे मऱ्हाटी निजदेशभाषा,। नयेत उक्ती बहुशा विशेषा, ॥
तथापि जे कीं निजभक्त तूझे। न पाहती ते गुण दोष माझे. ॥
अगत्य नाहीं जनरंजनाचें। लागे तुझें ध्यान निरंजनाचें. ॥

प्रस्तुत पुस्तकांत छापलेलें काव्य रा॰ भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्रकवि' या मासिक पुस्तकांत शके १८२७ सालीं छापलेल्या प्रतीबरहुकुम आहे. या प्रतींत कांहीं थोड्या ठिकाणीं चरणांचा अर्थ लागत नाहीं, व केव्हां केव्हां मूळ हस्तलिखित प्रतींत लिहितांना किंवा भाव्यांच्या प्रतींत छापतांना कांहींतरी चुका झाल्या असाव्या असें वाटतें. त्या शुद्ध करण्याकरितां जर

---

† "भा. इ. सं. मं. ग्रं. पृ. ५-या राजोपाध्यांकडे एक सामराजानें लिहिलेली रुक्मिणीस्वयंवराची पोथी मिळाली होती. यावरून हा व रुक्मिणीस्वयंवराकर्ता हे तरी भिन्न नसावेत असें वाटतें."

भाव्यांच्या जवळील मूळ हस्तलिखित प्रत सांपडती तरी फार चांगलें झालें असतें. पण ती प्रत त्यांना सांपडली नाहीं.

सामराजाच्या 'रुक्मिणीहरणा'चे ८ सर्ग असून त्यांत एकंदर ११०० वर श्लोक आहेत. हें काव्य वाचीत असतां याचे एकदोन विशेष तेव्हांच दृष्टीस पडतात. यांतील बराचसा भाग संस्कृत काव्याच्या धर्तीवर असून पुष्कळ वेळां या कवीचा संस्कृत काव्य व साहित्यशास्त्र यांच्याशीं चांगलाच परिचय असला पाहिजे असें स्पष्ट दिसून येतें. एकंदर काव्याची अंतर्बाह्य रचना, त्याची ठेवण, सर्गांचीं नांवें व त्यांची मांडणी, निरनिराळ्या प्रसंगांची संस्कृत काव्यांतील त्या त्या प्रसंगाशीं मिळणारीं वर्णनें, दुसऱ्या सर्गांतील आरंभींचें भीमकराजाचें वर्णन, त्याची प्रजापालनतत्परता, त्या नंतरचें गर्भिणीचें वर्णन, हीं वाचलीं म्हणजे कवीचा 'रघुवंशा'दि काव्यांशीं उत्तम परिचय असला पाहिजे अशी खात्री वाटूं लागते. इतकेंच नव्हे, तर रुक्मिणीच्या आईचें गर्भारपणांतील वर्णन करीत असतांना कालिदासाचें 'रघुवंशा'च्या तिसऱ्या सर्गांतील वर्णन कवीपुढें खास असलें पाहिजे. त्याचप्रमाणें तृतीय सर्गांतील रुक्मिणीचा भाऊ रुक्मी यानें केलेल्या कृष्णनिंदेवरून 'कुमारसंभवां'तील बटूच्या शिवनिंदेची आठवण होते. तसेंच पांचव्या सर्गांतील १०७ व त्या पुढील श्लोकांत आलेलें रुक्मिणीचें प्रत्यवयववर्णन पाहून 'कुमारसंभवां'तील पार्वतीच्या वर्णनाचा भास होतो. अशीं समानार्थांचीं आणखी कितीतरी स्थलें सांपडतील. यांपैकीं कांहीं पुढें परिशिष्टांत दाखविलीं आहेत.

सामराजाचा संस्कृत ग्रंथांशीं असलेला परिचय दुसऱ्याही एका कारणानें चांगला व्यक्त होतो. या काव्यांत पुष्कळसे संस्कृत शब्द, संस्कृत भाषेच्या धर्तीवर लांब लांब समास व कित्येक ठिकाणीं संस्कृत पद्धतीची वाक्यरचना दृष्टीस पडतात. तसेंच उपमा, दृष्टांत वगैरे कवीनें योजिलेल्या अलंकारांपैकीं बरेचसे नेहमीं संस्कृत काव्यांतून आढळून येणारे असे आहेत. या काव्यांत आलेल्या अनेक अलंकारांवरून या कवीचें अलंकार व साहित्य या शास्त्रांतील प्राविण्य दिसून येतें.

अशा प्रकारें या काव्यांत संस्कृताचें वर्चस्व जरी सर्वत्र दिसत असलें

तरी त्यांत अशींही कांहीं स्थळें आहेत कीं, त्या ठिकाणीं जुन्या मराठी काव्याची आठवण होते. मातापितरांना न जुमानतां कृष्णद्वेषी रुक्मी आपल्या बहिणीच्या लग्नाची तयारी करीत असतां त्या वर्णनांत येणाऱ्या वस्त्रपात्र, दागदागिने, जडजवाहीर, लग्नसाहित्य इत्यादिकांच्या लांब लांब याद्या इतर मराठी कवींप्रमाणें यांतही पहावयास सांपडतात. या याद्या वाचूं लागलें म्हणजे आपण संस्कृत काव्यवातावरण अगदीं विसरून जाऊन अनंतकवि, आनंदतनय, नागेश, विठ्ठल अशासारख्यांचें एखादें काव्य वाचीत आहों असा भास होतो. तसेंच पहिल्या सर्गाच्या आरंभींचें भवार्णव व त्याचें दुस्तरत्व यांचें वर्णन, मराठी भाषेंत काव्यग्रथनाचा उल्लेख, कवीचा परमेश्वरकथावर्णनाकडे ओढा, जुने प्राकृत शब्द, तशींच जुनीं अपरिचित अशीं शब्दांचीं रूपें, अक्षरांच्या ऱ्हस्वदीर्घांकडे कांहींसें दुर्लक्ष, क्वचित्प्रसंगीं अशुद्ध शब्दरूपांची योजना वगैरे मराठी काव्यांत दिसून येणारे बरेवाईट विशेष सामराजांत सर्वत्र दिसून येतात.

सामराजाच्या काव्यांतील मुख्य गुण प्रसाद. पुस्तकाचें साधारणपणें कोणतेंही पान उघडून वाचूं लागलें म्हणजे हा गुण उत्कटत्वानें दृष्टीस पडतो. जुने अपरिचित शब्द योजल्यानें क्वचित्प्रसंगीं काव्याला दुर्बोधत्व आलें आहे; कांहीं श्लोक ऱ्हस्वदीर्घांच्या दुर्लक्षामुळें कर्णकटु होतात; वस्त्रपात्रादिकांच्या लांबलचक काव्यहीन याद्या नीरस व कंटाळवाण्या वाटतात, हें खरें. पण अशा प्रकारचे दोष एकंदर काव्याच्या मानानें फार थोडे आहेत. एकंदरीनें पहातां प्रस्तुत काव्य वाचकांना प्रासादिक व सुरस वाटेल यांत शंका नाहीं. प्रसादाला प्रतिभेची जोडही उत्तम प्रकारें मिळाली आहे. पहिल्या सर्गांतील संसारसमुद्राचें उत्कृष्ट रूपक, दुसऱ्या सर्गांतील रुक्मिणीचा जन्म, तिची बाल्यावस्था व त्यानंतर तिसऱ्या सर्गांत वर्णिलेली तारुण्यदशेंत श्रीकृष्ण वियोगामुळें उत्पन्न झालेली विरहावस्था, चवथ्या सर्गांतील सुदेव ब्राह्मण व त्याबरोबर पाठविलेली प्रणयपत्रिका, सुदेवाचें प्रवासवर्णन, त्याचा मनास उपदेश वगैरे कवीच्या प्रतिभेची साक्ष देतात. सामराजाचा सृष्टिवर्णनाचा नमुना म्हणून खालीं कांहीं श्लोक देतों, त्यांवरून त्याच्या अंगचे प्रतिभा व प्रसाद हे गुण स्पष्टपणें दृष्टीस पडतील.

## सायंकालवर्णन.

वदत वदत ऐसें सांज होयास आली,
दिनकरकरलक्ष्मी सर्व संक्षीण झाली. ।
मुखकमल तयेचें म्लान अत्यंत देखे
म्हणवुनि कमलांचा बंधु बांधव्य राखे. ॥ १ ॥

सहज दिनमणी हा अस्त होतांच, एकी
प्रिय-तम-विरहानें क्रंदती चक्रवाकी ।
विधि-विहित-नियोगें वारुणी आदरीली,
म्हणुनि चरम संध्या काय आरक्त झाली. ॥ २ ॥

तदुपरि उगवे हा चंद्रमा पौर्णिमेचा;
अनभिलषित अर्थी होय हा उत्तमेचा, ।
द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा ।
कर पसरुनि मागें वक्त्र-लावण्य भीक्षा. ॥३॥ (सर्ग २)

## चंद्रोदयवर्णन.

हिमकरकर जैसे कांतिपूर स्रवेती,
हळुच तसतसे ते चंद्रकांत द्रवेती. ।
क्षुधिततर चकोरां पारणें थोर जालें,
मुकुलित कुमुदांला जन्मसाफल्य आलें ॥ १ ॥

❀ ❀ ❀

तुहिनकर नव्हे, हें बीज चिंता लतेचें,
विकसित अथवा हें पुष्प उद्वेगतचें, ।
अभिनव मदनाचें छत्र किंवा उभारें,
युवतिजन जयाच्या दर्शनें मात्र भारें. ॥ २ ॥

नभ धवलित केलें, विश्व आंनदवीलें,
परि विरहजनाचें चित्त उन्मादवीलें,
क्षणभरि मज बाई याकडे पाहवेना,
प्रलय-दहन-कल्प स्पर्श हा साहवेना ३ ।। (सर्ग २)

अशाच तऱ्हेचें पुढें एक प्रातःकालवर्णन आलें आहे. जी काव्यांत सृष्टि-वर्णन मुळींच नसतें असा आक्षेप घेणाऱ्या मंडळींनीं हीं वर्णनें अवश्य वाचून पहावींत. या ठिकाणीं एक गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, इंग्रजी कवींप्रमाणें किंवा तदनुयायी आधुनिक मराठी कवींप्रमाणें स्वतंत्रपणें सृष्टिविषयक वर्णनपर अशी कविता जुन्या मराठी कवींनीं केली नाहीं; पण मुख्य काव्यविषयांत ओघाओघानें जर अशीं वर्णनें करण्याचा प्रसंग आला तर तो ते वायां जाऊं देत नाहीत. मुक्तेश्वरांत अशीं कांहीं वर्णनें पहावयास सांपडतात. त्यांपैकीं कांहीं उत्तम मासले हवे असल्यास महा-भारतांतील आदिपर्व, अध्याय २७ यांतील हिमाचलाचें वर्णन, अध्याय ३६ मधील रात्रीचें वर्णन, वगैरे पहावींत.

स्थल, काल व प्रसंग यांचीं यथायोग्य वर्णनें करण्याची हातोटी सामराजास चांगली साधते, व तितक्याच सफाईनें तो मानवी स्वभावाचें यथार्थ चित्रही काढतो. रुक्मिणीच्या आईला आपल्या लाडक्या लेकीच्या लग्नाविषयीं लागलेली काळजी, तिनें तेवढ्याकरितां निरनिराळ्या देवतांस केलेल्या प्रार्थना व नवस, मुलीशीं श्रीकृष्णाच्या होणाऱ्या लग्नामुळें झालेला आनंद, रुक्मिणी आजपासून दुसऱ्याची होऊन आपल्याला कायमची अंतरणार म्हणून तिच्या मातृहृदयाला होणारें वियोगजन्य दुःख, व शेवटीं देवीच्या देवालयाकडे जाण्याकरितां निघालेल्या रुक्मिणीला तिनें मातृ-प्रेमानें प्रेरित होऊन केलेला बिनमोल उपदेश वगैरे वाचून पाहिलीं म्हणजे खऱ्या प्रेमळ मातेची मूर्ति आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. त्याप्रमाणेंच श्रीकृष्णाकडे रुक्मिणीची पत्रिका नेणारा सुदेव ब्राह्मण आणि त्याची खाष्ट पत्नी यांचीं स्वभाववर्णनेंही फार सरस वठलीं आहेत. एखाद्या प्रसंगाचें किंवा व्यक्तीचें वर्णन करतांना बारीक सारिक गोष्टीसुद्धां सामराजाच्या निरीक्षणांतून सुटत नाहींत, हें पाहिलें म्हणजे त्याचा अनुभव व सूक्ष्म

निरीक्षण हीं व्यक्त होतात. श्रीकृष्णाला देण्याकरितां सुदेवाजवळ लिखित प्रेमपत्रिका देऊन व तोंडीं निरोप सांगून शेवटीं श्रीकृष्ण—

'कार्यांतरी सक्त असेल जेव्हां
करूं नको गोष्टि मदीय तेव्हां,'। तर
'त्याचे नीं हा मज ठाव व्हावा,
प्रसंग ऐसा बरवा पहावा'.।

असें बजावून सांगते. सहाव्या सर्गांत रुक्मिणीच्या विवाहाकरितां निरनिराळ्या देशांहून आलेल्या वऱ्हाडी मंडळींचीं विनोदी व मार्मिक वर्णनें केलीं आहेत. ह्या वर्णनांत निरनिराळ्या देशांतील रहिवाशांचें स्वभाववैचित्र, नैय्यायिक, वेदान्ती वगैरे मंडळींचा आपआपल्या पंथाविषयीं अभिमान व वादविवाद वगैरे वर्णनें मनोरंजक आहेत. सामराज मधून मधून विनोदाचीही झुळूक दाखवितो. विवाहसाहित्याकरितां पडलेल्या तळणांचें वर्णन करतांना तो विनोदानें म्हणतो—

बसेत जेव्हां तळणें तळाया । तैं अर्भकें धांवति आंतळाया ॥
आकांत होती बहु लेंकरांचे । वाजेत तेथें धबके करांचे. ॥ १ ॥

प्रस्तुत काव्यांत अलंकारांची इतकी रेलचेल झाली आहे कीं, पुष्कळदां आपण एखादें संस्कृत काव्यच वाचीत आहोंत असा भास होतो. संस्कृत काव्यांचा सामराजावर किती परिणाम झाला होता हें मागें सांगितलें आहे. व पुस्तकाच्या शेवटीं संस्कृत काव्यांतील समानार्थक उतारेही दिले आहेत. मोरोपंतांच्या 'केकावलीं'त व रघुनाथपंडितांच्या 'नलदमयंती स्वयंवराख्यानां'त असाच अलंकारांचा यथास्थित भरणा आहे. रघुनाथ पंडितांचे काव्य पुष्कळअंशीं सामराजासारखें आहे. पण सामराजांत पंडितांपेक्षां प्रसाद अधिक असल्यामुळें 'रुक्मिणीहरणा'ची रचना 'नलदमयंती स्वयंवराख्याना'पेक्षां अधिक स्वाभाविक व मनोहर वाटते. 'नलदमयंती' काव्यांतील कृत्रिम रचनेमुळें तें काव्य कांहींसें क्लिष्ट झालें आहे.

रुक्मिणीहरण किंवा रुक्मिणीस्वयंवर या विषयावर सोळा कवींनीं ग्रंथरचना केली आहे. त्यांत सामराजाच्या 'रुक्मिणीहरणा'ची पायरी फार

चरची आहे. मूळ कथा जरी एकच असली तरी तिला काव्याचा पेहेराव चढवितांना कवीनें आपलें कौशल्यसर्वस्व खर्चिलें आहे. आधीं मूळ कथानक फार गोड व काव्यविषय होण्यास अत्यंत अनुकूल असून त्यांत शृंगारादि नवरस व स्वभाववैचित्र्य यांस पूर्ण अवसर आहे. शिवाय सामराजानें कांहीं प्रसंग अगदीं स्वतंत्रपणें घातल्यामुळें या काव्याचें सौंदर्य दुणावलें आहे. उत्तम सुपीक जमीन पाहून एखाद्या कुशल बागवानानें मोठ्या चतुराईनें तिच्यावर सुंदर बगीचा उठवावा त्याप्रमाणें काव्याला सर्वतोपरी युक्त असा रुक्मिणीहरणाचा प्रसंग निवडून प्रतिभादि गुणांच्या जोरावर त्यानें हें उत्कृष्ट काव्य निर्माण केलें आहे. यांतील वर्णन-सौंदर्य मागें दाखविलेंच आहे; याचप्रमाणें स्वभाववर्णनांत कवीची दिसून येणारी चतुराईही आपण पाहिली आहे. त्याचें कल्पनास्वातंत्र्य व्यक्त करणारे बरेच प्रसंग व अनेक वर्णनें प्रस्तुत काव्यांत आहेत; पण त्यांची लांबलचक यादी न देतां त्यांतील जे विशेष बहारीचे प्रसंग आहेत त्यांपैकीं कांहीं थोड्यांचा या ठिकाणीं उल्लेख करतों.

पहिल्या सर्गांत कथेची प्रस्तावना करतांना आलेलें संसारार्णवाच्या दुस्तरत्वाचें वर्णन सरस असून त्यांत रूपकांची योग्य योजना केली आहे.

आयुः पयाचा अति गोड प्याला।
हळू हळू काळ बिडाला प्याला. ॥

ही सुंदर कल्पना अगदीं नवीन दिसते. चवथ्या सर्गांत रुक्मिणीची प्रेमपत्रिका सुदेवनामाब्राह्मण श्रीकृष्णास नेऊन देतो. हा सर्ग 'शाकुंतल' नाटकाच्या चवथ्या अंकाप्रमाणें साग्र मनोहर झाला आहे. त्यांत लिखितपत्रिकेशिवाय रुक्मिणीनें कृष्णाला पाठविलेल्या तोंडी निरोपांत आपल्याला सत्वर घेऊन जाण्याविषयीं केलेली प्रार्थना वाचनीय आहे. यांत कवीचें साहित्यनैपुण्य उत्कृष्ट प्रकारें दृष्टीस पडतें, व त्याबरोबरच त्याचें रुक्मिणीच्या स्वभावचित्रांतील तिची कृष्णभेटीविषयींची मनाची आतुरता, लीनता, प्रेमळपणा, सारासारविचार, चातुर्य वगैरे गुणनिदर्शन पाहिलें म्हणजे त्याचें स्वभाववर्णनांतील कौशल्यही चांगलें व्यक्त होतें. या तोंडी निरोपांत रुक्मिणी शेवटीं कृष्णाला विनवून सांगते,

तूं सोडवी जीव विहंग माझा, ।
होईळ येणें पुरुषार्थ तुझा. ॥
त्वन्नाममुक्ताफळमात्र चारा ।
तुझे पदीं केवळ यास थारा. ॥ १ ॥
जैसें तुला मी नवरी न मानें, ।
करूं नको ज्येष्ठ कदापि मानें. ॥
मी धाकटी होईन धाकटीची; ।
दासी करीं, रे, मज शेवटीची. ॥ २ ॥

व शेवटीं सुदेवासही अनुकूल काल पाहून कृष्णाला पत्रिका देण्याविषयीं सुचविते. इतक्यांत प्रभातसमय प्राप्त झाल्यामुळे सुदेवाला निरोप देऊन ती मंचकावर पडली असतां तिचा किंचित् डोळा लागतो व स्वप्नांत तिला कृष्णभेट होते. इकडे सुदेव द्वारकेचा मार्ग आक्रमण करीत असतांना यदुपति-भजनाची गोडी लागून त्याच्या मनांत पारमार्थिक विचार उद्भवतात. या प्रसंगीं त्यानें आपल्या मनाला गोड व परिणामकारक असा उपदेश केला आहे. पांचव्या सर्गांत रुक्मिणीनें पाठविलेली प्रेमपत्रिका आपल्याला वाचा-वयास सांपडते. या एका पत्रिकेंत प्रसाद, शब्दसौष्ठव, अलंकार वगैरे काव्य-गुण एकवटलेले दृष्टीस पडतात; तसेच रुक्मिणीचें एकनिष्ठ प्रेम व भक्ति हींही चांगलीं व्यक्त होतात. श्रीकृष्णाची प्रार्थना करतांना ती म्हणते,

"विज्ञापना परिस यादव वंशवीरा,
योगींद्रहृत्कमलपंजरगर्भकीरा, ॥
हातास ये त्वरित आजि उडोन माझ्या,
वार्ता मला श्रवणगोचर होति तुझ्या. ॥ १ ॥
माझा मनोमधुप लुब्ध बहूत झाला,
तूझे पदांबुजयुगीं रहिवास केला. ॥
काकूलती बहुत याजनिमित्त येते,
कृष्णा तुझे चरणपल्लव हे धरीते. ॥ २ ॥

या श्लोकांच्या तोडीचे या काव्यांत अनेक श्लोक जागोजाग दृष्टीस पडतात. आतांपर्यंत वर निदर्शित केलेल्या प्रसंगवर्णनांत कवीचें काव्य-स्वातंत्र्य व कल्पनाशक्ति उत्तम तऱ्हेनें व्यक्त होतात. आतां आणखी अशाच प्रकारच्या एका प्रसंगाचा उल्लेख करून हें प्रकरण संपवितों.

सातव्या सर्गांत रुक्मिणी कुलरिवाजाप्रमाणें देवीच्या दर्शनाला जावयास निघाली असतां तिची आई तिला पतिगृहीं कशी वागणूक असावी याविषयीं उपदेश करते. हा बिनमोल उपदेश इतका सरस व सुबोध आहे कीं तो प्रत्येक मुलीकडून पाठ करून घ्यावा. 'केरळकोकीळ'चे संपादक रा० कृष्णाजी नारायण आठल्ये यांनीं मागें 'सासरची पाठवणी' म्हणून एक लहानसें सुंदर काव्य रचिलें होतें. त्याच्यासारखीच पण त्या-पेक्षां फार सरस अशी ही सामराजाची 'पाठवणी' आहे.

जाऊन तूं नांदसि सिंधुगर्भीं, ।

* * *

मी येकली राहिन ये विदर्भीं. ॥

* * *

मागेल आतां मज कोण जेऊं, ।

* * *

कठीण आहे स्थिति सासुऱ्याची. ।

यासारख्या मातेचें प्रेम-वियोगदुःख व चिंता व्यक्त करणाऱ्या शब्दांनीं या 'पाठवणी'चा आरंभ होतो. या विस्तृत उपदेशांत बोधप्रद अशा कितीतरी गोष्टी आल्या आहेत. यांत

'घालाघाली घालती नित्य सासा, ।
टाकूं बाई नेदिती हा उसासा'. ॥

अशा सास्वांपासून सासरच्या गडीमाणसांपर्यंत प्रत्येकाशीं कसें वागावें हें उत्तम प्रकारें सांगितलें आहे. 'सासू, दीर, नणंदा, जावा या सर्वांशीं नीट वागून व पतीच्या अर्ध्या वचनांत राहून त्याचें मन हस्तगत करून घे';

'त्वा आपुलीं आवरिजेत मूलें । जें नित्य होती कलहास मूळें. ॥
टाकून बाई अभिमान द्यावा । संसार हा गोड करून घ्यावा. ॥
मिळोन जातें मन दंपतीचें । तरीच घेती सुख संपतीचें. ॥
'सर्वांपुढें सत्वर त्वां उठावें । ते नीजल्या नंतर त्वां निजावें'. ॥
'आदासपर्यंतही अन्न द्यावें, । त्यानंतरें भोजन त्वां करावें. ॥

वगैरे गोष्टी कोणत्या प्रेमळ आईला आपल्या प्रथम सासरीं जाण्यास निघालेल्या कन्येस सांगाव्याशा वाटणार नाहींत? रुक्मिणीची आई मात्र येवढेंच सांगून थांबत नाहीं. शेवटीं—

'दुपाराची सायी समज अवघी संपति असे ।
शहाणे हे कोणीं धरितिच न यीचे भरवंसे. ॥

हा पारमार्थिक उपदेश करण्यास ती विसरत नाहीं. याच्यापुढें येणारे,

अये, ये लक्ष्मीची तिळभरिहि तृष्णा न धरिजे ।
यिच्या त्वां वेचें करुनच यिची वृद्धि करिजे ॥

हे उपदेशामृताचे शब्द किती अमोल आहेत? अशाप्रकारचा सुंदर उपदेश करून रुक्मिणीची आई शेवटीं तिला सांगते;

हा तूज शिक्षाविधि मात्र केला, । सर्वांस बाई उपदेश जाला; ॥
वर्तोत ऐशाच समस्त मूली, । घरोघरीं मृण्मय जाण चूली. ॥

या पुढील रुक्मिणीचें भाषणही मजेदार आहे. ती आईला म्हणते,

" जें जें मला तूं सिकवीस, कांहीं । वर्तेन तैसी अनुमान नाहीं; ॥
तूं सर्व माते समजेसि तत्त्वें, । नसेत तूझीं वचनें कवित्वें. ॥१॥
माते चमत्कार अपूर्व पाहे । जगामधें वर्तत एक आहे; ॥
मूर्धा पुढें काढुनि ठेवियेला । तथापि नाहीं यश ये सुनेला. ॥ २ ॥
सासू सुनेला सिकवीत आहे । वर्तें कशी आपण हें न पाहे; ॥
कार्पण्य कारुण्य कटाक्ष लेशी, । पांडित्य हें सर्व परोपदेशीं ॥ ३ ॥

हें 'पाठवणी' प्रकरण थोडेंसें लांबलें आहे हें खरें, पण वाचकांचें त्याकडे विशेष लक्ष वेधावें या हेतूनेंच तें लांबविलें आहे.

आतांपर्यंत या काव्याचें थोडक्यांत विवेचन केलें. हें काव्यच असें आहे कीं, वाचकांस त्याचें वेड लागावें व याच्या कांहीं भागाची तरी दुसऱ्यास केव्हां ओळख करून देऊं असें होऊन जावें. हें सर्व काव्य वाचलें म्हणजे सामराजाच्या आंगचे काव्यगुण लक्षांत येऊन त्याची योग्यता व दर्जा किती आहेत याचा अंदाज बांधता येतो. या काव्यांत कांहीं लहान सहान दोष आहेत. त्यांचा उल्लेख मागें केलाच आहे. शिवाय ते गुणांच्या मानानें इतके थोडे आहेत कीं, त्यांचा विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. कल्पनास्वातंत्र्य, पदलालित्य, प्रतिभा, सहृदयता, विनोद, भाषाप्रभुत्व, संस्कृति, बहुश्रुतपणा वगैरे अनेक गुण सामराजाच्या अंगीं वसत होते. इतक्या उच्च दर्जाचा कवि मराठी वाचकांपुढें यापूर्वीच यावयास पाहिजे होता. रा० भाव्यांनीं वीस वर्षांपूर्वी हें काव्य 'महाराष्ट्रकवी'त छापून काढलें, पण त्यावेळीं त्याला मिळावी तशी प्रसिद्धि मिळाली नाहीं. रघुनाथ पंडिताचें 'नलदमयंती स्वयंवर' हें एकच अशाप्रकारचें काव्य उपलब्ध आहे, व तें आबालवृद्धांच्या तोंडीं राहून वामनमोरोपंतादि इतर थोर कवींच्या काव्याप्रमाणें सर्वांच्या आदरास पात्र झालें आहे. त्याप्रमाणेंच सामराजाच्या रुक्मिणीहरणाशीं सर्वांचा परिचय व्हावयास पाहिजे अशी फार दिवस मनांत प्रबल इच्छा असल्यामुळें हें साग्र काव्य व त्याचीच शालोपयोगी संक्षिप्तावृत्ति प्रसिद्ध करीत आहें. यांच्या योगानें मराठी वाचकांचा व विद्यार्थ्यांचा एका उत्कृष्ट काव्याशीं परिचय होऊन या विद्वान् व रसिक कवीचा अज्ञातवास अंशतः तरी संपेल अशी आशा आहे.

सामराजकविविरचित

# रुक्मिणीहरण.

[शालोपयोगी संक्षिप्तावृत्ति.]

## सर्ग पहिला.

वंदीं, मना, पाय गजाननाचे, । जे सिंधु कल्पद्रुमकाननांचे, ॥
जे वंदिल्या विघ्न पळोन जाती । स्फुरेतही फार कवित्वजाती. ॥ १ ॥
जे घेय हातीं बरवी विपंची, । जीच्या गुणें होय विधि प्रपंची, ॥
जे राजहंसावरती विलासे, । तीचे पदीं मस्तक ठेविलासे. ॥ २ ॥
वात्सल्य मोठें तुजला विकासें, । जगद्गुरू, तूं मज लावि कांसे, ॥
आणीक कांहीं तुजला न मागें. । येईन आधार धरून मागें. ॥ ३ ॥
तूं आंधळ्याची अससील काठी; । हें पांगुळें वागवितोसि पोटीं; ॥
तूं द्रौपदीचा अति साहकारी; । असे तुझी दृष्टि परोपकारीं. ॥ ४ ॥
तां वाढवीला महिमा ध्रुवाचा; । तां दीधला बाळकही गुरूचा; ॥
तां सोडवीलें व्यसनीं गजेंद्रा; । उपेक्षिसी तूं मज कां उपेंद्रा? ॥ ५ ॥
माझा तुला काय विषाद आला? । किंवा कृपासागर शुष्क जाला? ॥
प्रसन्न नाहीं मन आजि तूझें? । कीं आड आलें दुरदृष्ट माझें? ॥ ६ ॥
कीं लागली हे तुज योगनिद्रा । न पावसी कां करुणासमुद्रा? ॥
करूनि दीनावरती कृपा हे । तूं आजि डोळे उघडुनि पाहें. ॥ ७ ॥
तूं आपणा दीनदयाळ ऐसें । जनामधें या म्हणवीस कैसें? ॥
मला प्रपंचांतुनि शीघ्र काढीं, । कीं आपुलें बीरुद आजि सोडीं. ॥ ८ ॥

असेत माझ्या अपराधकोटी; । तथापि मागें पसरून वोटी ॥
मत्सारिखीं हे कितियेक वेडीं । तुझे घरीं काय असेत थोडीं? ॥ ९ ॥
अजामिळा पावन त्वांच केलें. । पातित्य नाम स्मरतांच गेलें. ॥
तां तारिला व्याध महाभिमानी. । तां बैसवीली गणिका विमानीं.॥१०॥
संहारिलें तां खरदूषणांला. । तां दीधलें राज्य बिभीषणाला. ॥
तूं अर्जुनाचे तरि अश्व धूसी. । तूं संकटीं पावसि तद्वधूसी. ॥ ११ ॥
अनेक इत्यादिक उद्धरीसी, । मदर्थ कां संशय हा धरीसी? ॥
असेच जे जे तुज अंतरंती, । कोण्या उपायें जन ते तरेती? ॥ १२ ॥
आयुःपयाचा अति गोड प्याला । हळूहळू काळबिडाल प्याला. ॥
त्वद्योग तो या समयांत नाहीं; । चुके कशी हे यमयातना ही? ॥१३॥
शरीरसंरक्षणमात्र केलें; । वेचून वायां वय सर्व गेलें. ॥
आतां असें अंत समीप आला, । म्हणोनि तूझा अवलंब केला. ॥१४॥
तां घातलें ये मज मोहजाळीं, । कर्में मला बंधनरूप जालीं ॥
हा वासनाबंध कदा सुटेना. । जन्मावळीचें बिरडें तुटेना ॥ १५ ॥
प्रपंच हा दुर्वह कोण वोढी । पदोपदीं यास पडेत वोढी. ॥
जेथें निर्धांचा समुदाय आटे, । कल्पद्रुमांचे न पुरेत सांठे, ॥ १६ ॥
स्वधर्म येथें न घडेच कांहीं, । कधीं सुखाचा लवलेश नाहीं. ॥
महार्घ येथें परमार्थ जाला । विवेक दारिद्र्यदशेसि आला. ॥ १७ ॥
तृष्णापिशाची बहु फार वाढे । त्रैलोक्यसंपत्ति धरून दाढे; ॥
क्षणेंकही येथुन हे न फांके, । ब्रह्मांड जीच्या पदरांत झांके. ॥ १८ ॥
या वासनेची सुजि वोसरेना. । पदानुसंधान तुझें सरेना. ॥
निवृत्ति कैसी मजला पचावी, । प्रपंच ईला जरि साप चावी? ॥१९॥
हा क्रोधचांडाळ सदा विटाळी, । संपर्क याचा जन कोण टाळी? ॥
देहीं वसे वाघिणिसी अहंता, । असेस तूं येक इचा नियंता. ॥ २० ॥
आधार तूं स्थावर जंगमाचा. । तूं भारही होसि भुजंगमाचा. ॥
अपार तूझा महिमा कळेना. । स्वरूप तूझें मज आंकळेना. ॥ २१ ॥
असेत तूझीं चरितें विचित्रें । तसींच नामें सकळें पवित्रें. ॥
मदीय जिव्हेस अनेक कामें. । कदापि ईला न वसे रिकामें. ॥ २२ ॥

परापवादें अथवा विटाळें। इला कसें नाम तुझें उटाळें ? ॥
जे काटली नित्य महानृतानें। ते क्षाळिजे कृष्णकथामृतानें. ॥ २३ ॥
समस्त शास्त्रांस पढेत मौनें। शुकादिकांही विपरीत भानें. ॥
वेडावती वेद समस्त जेथें,। करूं तुझें वर्णन काय तेथें. ॥ २४ ॥
तथापि बांधेन कथा विचित्रा,। पदोपदीं पावन जे पवित्रा. ॥
तुझे कृपेचा परि ईस पाया। पडे, तर्यी हे न पवे अपाया. ॥ २५ ॥
जे बोलली भागवतीं पुराणीं,। विस्तारिली जे पुरुषीं पुराणीं, ॥
पवित्रकर्ती सकळा जगा या,। आधार ही थोर असे जगाया.॥ २६ ॥
त्वद्वर्णनीं हे रसना कवीची। प्रवेशतां येति विवेकवीची. ॥
मिळेत ही अर्थ वरे नवेची.। तो वंचलासे जन जो न वीची. ॥ २७ ॥
असे मऱ्हाटी निजदेशभाषा,। नयेत उक्ती बहुशा विशेषा, ॥
तथापि जे कीं निजभक्त तुझे। न पाहती ते गुणदोष माझे. ॥ २८ ॥
अगत्य नाहीं जनरंजनाचें.। लागे तुझें ध्यान निरंजनाचें. ॥
आराधनीं अन्य उपाय नाहीं;। समर्पितों याच उपायनाहीं. ॥ २९ ॥
माझ्या मना, तूं असशी बराडी,। कां भीमकीचा नव्हसी वराडी ? ॥
हा स्नेह नाहीं वरपंगतीचा.। तूं लाभ घेयीं वरपंगतीचा. ॥ ३० ॥
असे हरीही निजसोयरा, हो.। याच्या पदाची तुज सोय राहो. ॥
हें ब्रह्म नानाअवतारधारी;। तथापि हा कृष्णच तूज तारी. ॥ ३१ ॥
सत्संग आवश्यक आजि पाहें,। जो ईश्वरप्राप्तिस हेतु राहे. ॥
जो सज्जनांच्या निववी मनाला,। जो लाजवी, बा, वनचंदनाला.॥३२॥
राजा असे थोर परीक्षिती, हो.। कीर्ती सुधांशूस परीक्षिती हो. ॥
पुसे कथा तो मग हे शुकासी,। जीर्णे असे अत्यय पातकासी. ॥३३॥
द्वैपायना, योगिवरा, द्विजेंद्रा,। पौराणिका, सर्वकथासमुद्रा, ॥
ज्या सांगसी कृष्णकथा उदारा,। त्या नाशिती नित्य मनोविकारा.॥३४॥
कथारसें या मन हें विटेना। श्रीकृष्णपायींहुनि, हो, सुटेना. ॥
कथा पुसे आणिकही नवीना.। कां आपला संशय नाशवीना ? ॥३५॥
हे रुक्मिणी देववरें वरोरू,। नेली कशी द्वारवतीस भीरू ? ॥
स्वयंवरीं कृष्ण कसा वरी तें ?। केलें कसें साहस सावरीतें ? ॥ ३६ ॥

कृष्णास तो वंदुनि विप्र भावें । प्रवर्तला तच्चरणप्रभावें. ॥
तत्त्वार्थ सांगेच परीक्षितीसी । असे कथा हे तुज रक्षितीसी. ॥ ३७ ॥
साहित्यस्वारस्य समस्त वेंचे । शब्दोदधीचे निवडून वेंचे. ॥
पवित्र हे कृष्णकथा रसाला, । जे नित्य आणी रस नीरसाला. ॥३८॥
गंगाप्रवाहोपम बोध जेथें । न जाय हा काय अशेष तेथें ? ॥
करूनि चित्तें अति सावधानें । हे आयकावी हरिसन्निधानें ॥ ३९ ॥
जो हा महाविष्णु विराटरूपी, । चराचराची रचना निरूपी, ॥
तो गर्भ राहे मग देवईला. । संरक्षिता येउन देव ईला. ॥ ४० ॥
अव्यक्त जें व्यक्त दशेस आलें, । कारागृहीं तें अवतीर्ण झालें. ॥
भासे अकस्मातच बाळसेंही. । तत्काळ आलें मग बाळसेंही. ॥ ४१ ॥
हा बाळ सर्वांहुनि आगळा, हो. । गळेत त्या आपण आगळा, हो ! ॥
तत्काळ जालीं उघडीं कवाडें. । तो पावला गोकुळही निवाडें. ॥ ४२ ॥
उत्पन्न ज्यापासून भूतसृष्टी, । काढी तयाच्या बहु फार दृष्टी. ॥
जो पूतनास्तन्यविषास प्याला, । ते माय देते गरळा तयाला. ॥ ४३ ॥

करी जो विश्रांती श्वशुरसदनीं शेषशयनीं,
कदा योगींद्रांचे क्षणभरि पडेनाच नयनीं. ।
पयःपानीं त्याचें मुखकमळ दुग्धें करि भिजें.
सुखें ये मातेच्या करयुगुलतल्पावरि निजे.॥ ४४ ॥
न जाणों प्राग्जन्मीं कवण तप मातेस घडलें ?
यदीय प्रारब्ध प्रगटच असें हें उघडलें. ।
जयाचे हे ब्रह्मादिक विबुध लागेत चरणीं,
तया बाळा घेते उचलुन कडे नंदगृहिणी. ॥ ४५ ॥
अलिंदीं नंदाचे घन, रुचिर चैतन्य मिरवे,
जयाच्या माथांचे नव कुरळ शोभेत बरवे. ।
निजच्छंदे रांगे, विमलतळहातद्वय मळे,
पदस्पर्शे ज्याच्या तरुयुगुल तत्काळ उमळे. ॥ ४६ ॥
अनंत ब्रह्मांडें यदुदरदरीमाजि दडती,
जया चैतन्याचें स्तवन करितां वेद अडती, ।

जगत्कर्ता धाता सहज उपजे नाभिकमळीं,
विकासे त्याचा हा रुचिर सहवास व्रजकुळीं. ॥ ४७ ॥

धरूनि हे अर्भकदेहलीला, । जे शोभवी प्रत्यह देहलीला, ॥
हे लोक ज्याचया उदरांत माती, । तें ब्रह्म टाकी वदनांत माती. ॥ ४८ ॥
जो नांदवी उत्कट गोपवाडे, । गाती तयाचे बरवे पवाडे. ॥
पीतांबर, श्यामलरूपधारी । सर्वत्रवंशीकर जो मुरारी. ॥ ४९ ॥
कृत्यस्त्य पादांबुज, माळ कंठीं, । गोवृंद चारी यमुनोपकंठीं. ॥
माथां धरी रम्य मयूरबर्हें. । कर्मे करी नित्य महा अनर्हें. ॥ ५० ॥
बाहे सिदोरीस उदास अंसीं, । उत्पन्न त्याचें भय होय कंसीं. ॥
अक्रूर तेणें मग धाडियेला. । घेऊन दोघां मथुरेस गेला. ॥ ५१ ॥
चाणूर हा, मुष्टिक दुष्ट जेठी । धाडीत मर्दूनि कृतांतभेटी. ॥
त्या अंतरें मातुळ दाखियेला । उडोनि कंसावरि कृष्ण गेला. ॥ ५२ ॥
धरून केशीं मग खालता हा । पाडूनि त्यासीं मग होय 'हा हा;' ॥
कारागृहें सर्वहि फोडवीलीं; । तें मायबापें मग सोडवीलीं. ॥ ५३ ॥

कथा हे कृष्णाची सकलजगदानंदजननी
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं,।
प्रसंगें श्रोत्यांचे सकलहि महादोष हरती.
यदुत्तसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ५४ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकात्रिसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये
कृष्णजन्मो नाम प्रथम सर्गः ॥ १ ॥

---

# सर्ग दुसरा.

विदर्भदेशाधिप भीमनामा । राजा असे येक उदारधामा. ॥
जो धीर, गंभीर, महाप्रतापी, । जो लोकपालांसहि नित्य दापी. ॥ १ ॥
करीतसे पालन ये महीचें; । नयेंच घे उत्तम हेम ईचें. ॥
प्रजांपरी पालितसे प्रजांला, । निजान्वयीं जो कुलदीप झाला. ॥ २ ॥

असे तयाची मग मुख्य जाया, । त्याला असे तत्पर ते भजाया. ॥
विनीत अत्यंत, महाकुलीना, । कसें पतीचें मन आंकळीना ? ॥ ३ ॥
मूर्धन्य जे होय पतिव्रतांची, । जिला महा आवडि हीं व्रतांचीं; ॥
तिच्या गुणांची बहु त्यास गोडी; । तेही तयाचीं वचनें न मोडी. ॥ ४ ॥
विभक्त त्यांचीं दिसतीं स्वरूपें, । असंत चित्तें परि येकरूपें. ॥
तीं होतिं येकेविण येक अंध, । चाले महाप्रेम ऋणानुबंधें. ॥ ५ ॥
क्रमेंच त्यांला सुत पांच झाले. । कनिष्ठ हो चारि भले निघाले. ॥
रुक्मी असे अग्रज दुष्टबुद्धि, । कदापि कांहीं न धरीच बुद्धी. ॥ ६ ॥
हळू हळू तो बहु होय मोठा. । आला असे काय कलंक पोटा ? ॥
करी अवज्ञाच सदा पित्याची, । न पालटे रीति कदापि त्याची. ॥ ७ ॥
पित्यास पोटांतुनि दुःख वाटे, । तथापि त्याचे नव जाय वाटे. ॥
संबंध त्यासी बहुसा न पाडी, । त्याच्या विचारांतुनि चित्त काढी. ॥ ८ ॥
चिंतावली माय तशीच त्याची । हा नायके बुद्धि तशीच तीची. ॥
पदोपदीं येउनि शीकवीला. । तथापि तेणें उर पीकवीला. ॥ ९ ॥
ते त्रासलीसे सुतसंततीला, । कदापि नाहींच उसंत तीला. ॥
अपुत्र संसार म्हणे असावा, । कुपुत्र पोटीं सहसा नसावा. ॥ १० ॥
निजोदरीं जे नवमास वाहे, । ते माय त्याचें मुखही न पाहे. ॥
कुलास जेणें अधमत्व येतें, । संतान तें शल्य कसें न होतें ? ॥ ११ ॥
ते त्या दिसापासुनि नित्य देवी । अनन्यभावें कमलेस सेवी. ॥
असे सुतेचीच तिला असोशी. । त्या आत्मजांचें अति दुःख सोशी ॥ १२ ॥
न सेविती हे जरि लोकमाता, । कोठें इचा हा तरि शोक माता ? ॥
येके दिशीं फार विषण्ण झाली, । प्रत्यक्ष तीशींच वदों निघाली. ॥ १३ ॥

"महालक्ष्मी, माते, कमलनिलये, हांस मजला;
मला तूझा आतां सकळहि मुदाही समजला. ।
स्वसा तूं धेनूची नियत असशी सिंधुदुहिता.
बराकी जाणें मी, जननि, तुजला काय दुहिता ? ॥ १४ ॥
नसे हें निर्वाहें, जननि, मज सामर्थ्य भजनीं,
कृपाशीले, हेला म्हणुन न करीं मद्विधजनीं. ।

जगन्माते, येथें बहुत असती बाळ तुजला;
विचारें पाहातां तुजविण नसे माय मजला. ॥ १५ ॥
प्रसंगें हे झाली, जननि, मजला वोळखि तुझी.
मनोवाक्कायें मी नियत न करीं स्वामिनि दुजी. ।
तुझ्याही भक्ताला प्रतिपद पडे संकट जयीं,
जगन्माते, तूझा अविहित दिसे लौकिक तयीं. ॥ १६ ॥
असो चिंता माझी, जननि, पुरती येथुनि तुला.
नसे माझा कैसा अझुनि पुरता भोग सरला ? ।
असारीं संसारीं बहुत भवदाधार धरिला.
कृपाभिक्षा घालीं पदर तुज म्यां हा पसरिला." ॥ १७ ॥

अशी इची हे स्तुति आयकीली. । प्रसन्न तेही मग तीस झाली. ॥
स्वप्नीं तिला दर्शन दीधलें कीं, । म्हणे, 'तुझी होइन मीच लेंकी.'॥ १८ ॥
असेपरी हे नवमास गेले. । प्रसूतिचे संनिध दीस आले. ॥
येके दिशीं मध्यम राति गेली.। कन्या तिला उत्तम येक झाली. ॥ १९ ॥
जे जन्मल्या माय कृतार्थ झाली, । तें स्वप्न देवी विसरोनि गेली. ॥
अनिंद्य हें सर्व शरीर तीचें, । न आढळे दूषण हें रतीचें. ॥ २० ॥
प्रवीण सर्वांहुनि हा विधाता, । कदापि याच्या न कळेत धाता. ॥
सर्वोपमा मेळविजे अहो ते । तरीच हे सुंदर मूस वोते. ॥ २१ ॥
चातुर्य वेचें चतुराननाचें, । घडीत आलें तंव आननाचें. ॥
आकारलें रूप असेल जेव्हां, । तो भूलला काय नसेल तेव्हां ? ॥२२॥
करी तिच्या उत्तम बारशाला. । दे राव वर्ग्यास अपार शाला. ॥
ठेऊनि हे रुक्मिणि नाम तीचें, । म्हणे, पहा बालक हें मतीचें. ॥२३॥
नियोजिलीसे तिस येक दायी, । जे भूपतीनें करिजे निधायी. ॥
तथापि ते वत्सल राजपत्नी । तें वाढवीलें किं अनेक यत्नीं ॥ २४ ॥
तिणेंच ते प्रत्यह खेळवावी, । ते पाळणां सुंदरि हालवावी, ॥
कडेसही घे बहु धाकटीला, । जे शोभवीते बहुधा कटीला. ॥ २५ ॥
पित्यास जों जों बहु आवडावी, । तों तों तयासंन्निध हे भिडावी. ॥
त्याभोंवतीं येउनि नित्य खेळे, । त्याचेच मांडीवर नित्य लोळे. ॥ २६ ॥

जे बोबडे बोल तिला सुचावे, । तसेच त्याला बरवे रुचावे. ॥
जे क्लेश पुत्रें करिं फार पावे, । ईच्या गुणीं ते मग फार पावे. ॥ २७ ॥
ते लाडकी होउनियां गुणांची । बहीण झाली परि दारुणाची. ॥
वेधा जिचे दूषणमात्र खोडी, । ते कन्यका काय करील खोडी? ॥ २८ ॥
रुक्मी तिला बोल विरुद्ध बोले, । वसेत तीच्या हृदयांत भाले; ॥
तथापि ते राजसुता शहाणी । विरुद्ध वाचेस कदा न आणी. ॥ २९ ॥
होतांच हा निर्गम शैशवाचा । प्रवेशलासे गुण केशवाचा. ॥
ब्रह्मादिकांला न कळे तथा, रे, । तें ब्रह्म ईच्या हृदयांत थारे. ॥ ३० ॥
सेवार्थ बंदीजन नित्य येती, । तेहीं प्रसंगें वर वर्णिजेती. ॥
ज्याचे गुणीं रुक्मिणि कान देते । शरीर त्याला तरि कां न देते? ॥ ३१ ॥

परम विकल, येके आसनीं ते बसेना,
क्षणभरि जननीचे संनिधानीं असेना, ।
अनुदिन मन तीचें कोटि संकल्प नेघे,
हरिविण विषयांचा स्वाद कांहींच नेघे. ॥ ३२ ॥

विमल कमळ हातीं भीमकी घेत नाहीं,
प्रतिवचन सख्यांला हे नसे देत कांहीं. ।
हरियुत हरितेचा वायुही फार मानी,
हरिविण दुसरा हा नायके शब्द कानीं. ॥ ३३ ॥

अशन वसन तीला सर्वथा हें न माने,
हरिरहित सुखाचा हेतु आणीक नेणे. ।
निशिदिन तिज लागे ध्यान हें द्वारकेचें.
तदितर दुसरें तत्प्रापक द्वार कैचें? ॥ ३४ ॥

हरिचरणवियोगें रात्रि तीला न लोटे;
युगसम तिजला हे दीसही जाति मोठे. ।
कृशतनु तनु झाली, भूक ताहान गेली,
निखिल निजजनांची हे असे सांड केली. ॥ ३५ ॥

निरतिशय इची हे वेदना आयकीली,
त्वरित बहुत तेथें माय धांवोन आली. ।

मग तिस पुसतां हा कंठ अत्यंत दाटे,
नयनयुगिं जलाचा पूरही थोर लोटे. ॥ ३६ ॥
न पुसत मज तूं गे चित्रशाळेस जासी,
अनियत अथवा ये गेहवापीस न्हासी, ।
सहज निजशिरीं हे नित्य घालून नाडे
प्रतिदिन फिरसी गे येकली कां अनाडे ? ॥ ३७ ॥
अझुणवरि न लागे कां तुला हे पिपासा ?
न मानसि भय कांहीं, कां कराशी उपासा ? ।
झडकरि उठ आतां अल्पसें जेवि, मूली,
नियतच तुज आली हे असे अन्नभूली. ॥ ३८ ॥
मज तरि समजेना सर्वथा हे अवस्था.
न समजत करावी काय ईची व्यवस्था. ।
अनृत वदन नाहीं सर्वथा नावरेसी.
निशिदिन जगदंबा तूज राखो परेशी. ॥ ३९ ॥
प्रतिवचन न येतां, होय हे घाबरीशी,
प्रगट म्हणत आहे गोष्टि नाहीं बरीशी. ।
प्रतिगृहिं नसती या काय लेंकीसमा या,
बहुत सबळ माझी हे जळो व्यर्थ माया ! ॥ ४० ॥
सकलहि कुलदेवी. येकदां हंस राखा,
प्रतिदिन इस दृष्टीं कांसवाचेच देखा. ।
नवस नवसिले हे व्यर्थ होऊं न द्यावे,
इस गुण दिधल्याने सर्व संकल्प घ्यावे. ॥ ४१ ॥
तदुपरिहि पहाती वैद्य तीचीं निदानें;
तदुचित करवीती विज्ञ दैवज्ञ दानें. ।
धरुन तिस ललाटीं मंत्रवादी विभूति
करित असात, ज्यांच्या निर्विकल्पा विभूति. ॥ ४२ ॥
तदपि न धरवे हा धीर यां पोखत्यांला.
सहज न समजे हो हा इचा रोख त्यांला. ।

अति विविध चरित्रें हांसिलासे मुरारी
अधिक मग तियेचें चित्तचैतन्य चोरी. ॥ ४३ ॥

अगणित मग बाला दीर्घ निश्वास टाकी,
मुखकमल तियेचें अंचलें माय झांकी; ।
अनिश उभय पार्श्वीं फीरतां हे न भागे,
क्षणभरि इजला हे झोंप तेही न लागे. ॥ ४४ ॥

तदुपरि नृपपत्नी फार भेऊं निघाली,
सकरुण दुहितेला आपुली आण घाली. ।
उठवुन निजअंकीं बैसवी तीस माता.
'अभिलषित तुझें तूं, भीमकी, बोल आतां. ॥ ४५ ॥

'तूं खेळतां राजस भागलीशी, । कीं दृष्टि लागे तुज चांगलीशी ? ॥
संपर्ग झाला तुज सार्पिणीचा, । कीं लागला पालव पापिणीचा ? ॥४६॥

नसे तुझें हें मन आजि ठाईं, । अशाप्रकारें पडशी अपायीं. ॥
होईल शोकें हृदय द्विधा, गे, । हांसेत या तूज भवद्विधा गे. ॥ ४७ ॥

असीम लावण्य तुझे शरीरीं. । लाधेल हें कोण तऱ्ही शरीरी ! "
यदर्थ चित्तीं अति तापसी, गे, । न आढळे (तो) मज तापसी, गे.॥४८॥

प्रवेशला कोण असे त्रिवेणी ? । प्रसन्न कोणास पिनाकपाणी ? ॥
त्वदर्थ कोणें पडणीं पडावें ? । हुताशनप्राशन वा घडावें ? ॥ ४९ ॥

आजन्म कोणें उपवास केला, । ज्याच्या असे काम फळास आला. ॥
कीं खड्गधाराव्रत वीर सेवी । त्याचीच तूं होशिल मुख्य देवी. ॥ ५० ॥

किंवा असाधारण हे तपस्या. । तूं अन्यथा होशिल काय वश्या ? ॥
असा महापूरुष कोण आहे । जो आजि तूझा अनुराग लाहे ? ॥ ५१ ॥

शरीर तूझें मज पाहवेना, । त्वद्वेदनाही मज साहवेना,' ।
बोलोन ऐसें उगलीच राहे । तटस्थ तीचा मुखचंद्र पाहे. ॥ ५२ ॥

यदुपतिविरहें जे शुष्क होवोनि गेली,
अविदितहृदया जे मन्मथाधीन झाली. ।

निरवधि जननीचा थोर संकोच झाला,
प्रति वचनप्रसंगीं प्राण कंठास आला. ॥ ५३ ॥
'तुज मज जननी हा सर्वथा भेद नाहीं.
नव्हतिल तुज कैशा मद्गता वेदनाही ? ।
नियमितच असें मी श्वासविश्वास तूझा,
तुजविण दुसरा हा प्राण नाहींच माझा. ॥ ५४ ॥
परि. जननि, सुतेचा लाभ हा होय ज्याला,
नियत समजताहे थोर धिक्कार त्याला. ।
परम अधम हें स्त्रीजन्म वाईटवाणें,
उपजत परचित्ताधीन तेणें रहाणें ॥ ५५ ॥
अनुपद तुझिया मी व्यर्थ पोटास आलें,
परम अनुपयोगें भार भूमीस झालें. ।
अगणित अपराधी मी तुझें लेंकरूं गे,
अनुचित तुजशीं हे वचना कां करूं गे ? ॥ ५६ ॥
प्रगट म्हणसि जो हा कोपला शंबरारी,
अविदित तुज कैसा तात त्याचा मुरारी ? ।
वदत वदत ऐसें आढवी लाज आली.
तदुपरि मग बाला खालती मान घाली. ॥ ५७ ॥
अविदित दुहिताभिप्राय विज्ञात झाला.
नरपतिरमणीचा सर्व संदेह गेला. ।
प्रमुदित मग माता कन्यकेला बुझावी,
तदपि परम मुग्धा ईज लाहे बुजावी. ॥ ५८ ॥
तदुपरि जनयित्री फार उद्विग्न झाली;
पतिसमिप मृगाक्षी तेच वेळेस गेली. ।
सविनय मग त्यासी हात जोडोनि बोले,
अपरिमित जलाचे पूर नेत्रांस आले. ॥ ५९ ॥
'उपवर मुलि जाली, बोलतां येत नाहीं.
वरविषयक चिंता हे नसे होत कांहीं. ।

यदुवर, अवतारी, पुत्र जो देवकीचा,
गुणनिधि, अवधारीं प्राण ये भीमकीचा. ॥ ६० ॥

पदयुगुल हरीचें ईस आदान आहे.
तदितर वरवार्ता सर्वथा हे न साहे. ।

म्हणवुन, पृथिवींद्रा, गोष्टि हे आयकावी,
त्वरित मुलि उदारा केशवा आज द्यावी.'॥ ६१ ॥

वचन मग विदर्भाधीश बोलों निघाला.
'मजवरि अमृताचा लोट कोठोनि आला? ।

अगणित परिपाका पुण्य संपूर्ण आलें,
अघटितघटणेनें दैव किंवा उदेलें? ॥ ६२ ॥

तदुपरि मग दोहीं हाच निर्वाह केला.
म्हणति हरिस देऊं आपुले कन्यकेला. ।

नरपतिमुखिंची हे गोष्टि बाहेर आली,
हळुहळु तनयेच्या कर्णमूलास गेली. ॥ ६३ ॥

परम अधम रुक्मी जो महाशीघ्रकोपी.
प्रकट म्हणति याचे दोष हे कोण थोपी? ।

बहुतच अविवेकी होय संक्षुब्ध जैसा.
हुतवहवदनीं हा तैलसंपात तैसा, ॥ ६४ ॥

उपजत खल जो कीं दुष्टबुद्धि स्वभावें,
अनिश यदुपतीशीं वर्ततो वैरभावें, ।

जनक मग विचाराकारणें त्यास बाहे.
अधम तंव तयातें पुत्र सक्रोध पाहे ॥ ६५ ॥

तदुपरि हरिनिंदा जे मुखांतून आली
स्तुतिपर परभागें ते महा पुष्ट जाली. ।

अनृत वचन कांहीं वैखरी हे वदेना
सहज हरिचरित्रा दोष येऊंच देना. ॥ ६६ ॥

कथा हे कृष्णाची सकल जगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्याचें सकलहि महा दोष हरती,
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ६७ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये द्वितीयः सर्गः ॥

---

# सर्ग तिसरा.

रुक्मी म्हणे हें तुज काय झालें ? । कुलास या दूषण थोर आलें. ॥
विचार तूझा मज हा न माने, । किंवा इचें प्राक्तन कोण जाणें. ॥ १ ॥
विवाहकार्यीं स्थिरता धरावी, । त्वां आपली तांतडि आंवरावी. ॥
जें येकदां कृत्य घडोन येतें । विचारल्यावीण करूं नये तें. ॥ २ ॥
हिमालयें जो अविवेक केला । तसाच त्याचा परिपाक झाला. ॥
ये पार्वतीचे पडला कपाळीं । अद्यापि पाहे न चुके कपाळीं ॥ ३ ॥
त्याचेंच त्वां हें मत आदरीलें । कां आपलें पौरुष आंवरीलें ॥
मला अभिप्राय कळों न देशी, । त्या यादवांचे गुण नित्य घेशी. ॥ ४ ॥
मूखांबुजीं संतत वेणु वाहे, । गोपांगनांचे अपशब्द साहे, ॥
धरी शिरीं केवळ मोरपीसें । तें देवकीचें तरि पोर पीसें. ॥ ५ ॥
जो हा गुणग्राहक रानटांचा, । शोभे सदा वेष बरा नटाचा: ॥
असे जया संगति गोवृषांची । तो काय जाणे स्थिति मानुषांची ! ॥ ६ ॥
जेणें सखा मातुल हा वधावा । संबंध त्यासीं तुजशीं बधावा, ॥
त्या मावशीच्या तरि घातुक्याला । कन्या कशी देशिल पातक्याला ॥ ७ ॥
जो गोकुळीं गोवळ मातलाहे, । वक्षस्थळीं जो हरि लात लाहे, ॥
तो ईजला वल्लभ मी करीना । ज्याचा मला हा कळला करीणा. ॥ ८ ॥

जाणों नको यास मनुष्य देही. । असे सदांचा हरि हा विदेही. ॥
निर्द्वंद्व, निःसंग, महा अकर्मी, । याची नसे दृष्टि मनुष्यधर्मी. ॥ ९ ॥
सबाह्य अभ्यंतर कृष्ण काळा । कदापि नाहीं वचनास ताळा. ॥
कदापि जो धर्म अधर्म नेणें, । हा येक पाटश्वरवृत्ति जाणे. ॥ १० ॥
भूतांस जें होउन भूत लागे, । तें हें महद्भूत जगांत जागे. ॥
जळीं स्थळीं व्यापक रूप ज्याचें । न मानिसी तूं भय आजि त्याचें. ॥ ११ ॥
जाला असे जो उदकांत मासा, । तसाच हा कांसवही अमासा, ॥
त्यानंतरें सूकर घोररूपी, । नृसिंह तो त्याहुनही विरूपी. ॥ १२ ॥
तसाच हा वामन निर्विकारी । झाला बळीचे घरिंचा भिकारी. ॥
जो आपली भार्गव माय मारी, । तुम्हांस तो निर्दय काय तारी? ॥ १३ ॥
गमाविलें पौरुष रामरूपें । तें मर्कटें मेळविलीं अमूपें. ॥
रानामधें टाकुन जाय राणी, । असा नसे आणिक तो अडाणी. ॥ १४ ॥
हा आठवा चालक कृष्ण मोठा । संबंध त्यासीं तुज आजि खोटा; ॥
यालागिं जे जे जन आठवीती । ते सर्व संसारसुखा मुकेती. ॥ १५ ॥
हे गोष्टि माझी हृदयीं धरावी. । वार्ता हरीची सहसा त्यजावीं. ॥
वसुंधरा उद्वस आजि झाली ? । पुंसृष्टि किंवा अवघी बुडाली ? ॥ १६ ॥
जो चैद्यदेशीं मदघोष आहे, । विख्यात ज्याचें कुल, शील पाहे, ॥
आहेच पूर्वीहुन सोयरा जो । संबंध त्यासीं तुजसीं विराजो. ॥ १७ ॥
कुमार त्याचा शिशुपाल नामा । उत्कृष्ट सर्वांहुन, सार्वभौमा. ॥
उदार, गंभीर, महाभिमानी, । या यादवांला तृणतुल्य मानी. ॥ १८ ॥
विचारिलीं राजकुलें अशेषें । हा श्लाघ्यसंबंध दिसे विशेषें. ॥
ये भीमकें तप काय केलें ? । दैवें इच्या हेंच घडोन आलें. ॥ १९ ॥
अत्यंत हा आग्रह देखियेला; । पुत्रास तो भीमक वश्य झाला; ॥
कर्तव्य दुष्टाप्रति काय चाले ? । नेत्रीं विषादें जलबिंदु आले. ॥ २० ॥
पाचारवी पुत्र समस्त जोशी, । प्रत्युत्तराची न धरीच गोसी. ॥
जसें तसें केवळ लग्न काढी, । चैद्येश्वरा सत्वर मूळ धाडी. ॥ २१ ॥
कोठ्या थट्या मुक्त समस्त केल्या, । प्रमाणग्या आपण देववील्या ॥
सभोंवते भोंवतिं सर्व सेटे । राबेत तेथें कितीयेक वेंठे. ॥ २२ ॥

अति रुचिर रथांच्या आणवी संचयांला
हयनिवह नियोजी जे महासंच यांला।
मणिखचित अपारा पालख्या, तख्तरावे
घडिघडि अवलोकी; हा भरे येच हावे. ॥ २३ ॥

पटु पटह, पताका, आतपत्रें उदंडें,
शशिकरविशदें तें चामरें हेमदंडें, ।
कनकमय कमाना, त्या गदा दुर्निवारा,
सित शर तरवारा तीक्ष्णधारा अपारा. ॥ २४ ॥

मग जडित कडीं तें, मुद्रिका, कर्णभूषा,
पदकयुत गळांच्या सांखळयाही विशेषा, ।
कनकघटित माळा. हार मुक्ताफळांचे,
अति तरल विलोकी घाट ते मेखळांचे. ॥ २५ ॥

अविनय तनयाचा देखिला स्पष्ट भारी.
नरपतिरमणी ते खोंचलीसे जिव्हारीं. ।
मुखकमल तियेचें स्वच्छ विच्छाय झालें.
तदुपरि अविलंबें आंग मोडून आलें. ॥ २६ ॥

न कळत हृदयेशा स्वीय गेहास गेली
निजकनकपलंगीं भामिनी ने निजेली. ।
वचन परिजनांसी चंद्रवक्त्रा वदेना.
तनयकृत विचारा व्यक्त होऊंच देना. ॥ २७ ॥

नरपतिदुहितेला माय येतां दिसेना,
तदुपरि मग तीचें चित्त कोठें बसेना. ।
घडि घडि निजगेहा आंत बाहेर येते,
अनिमिष जननीची वाट बाला पहाते. ॥ २८ ॥

त्वरित बहुत घाई होतसे आपतीची.
क्षणहि मन न घाली सर्वथा माय तीची. ।
तदपि परिजनांला हेतु याचा पुसेना,
सुलज बहुगुणांची मायसीं जे रुसेना. ॥ २९ ॥

कुचकुच सखयांची अन्यथा देखियेली;
मग परम शहाणी तत्त्व जाणोन गेली. ।
नरपतितनयेचा सर्व उत्साह आटे;
प्रलयजलधि किंवा लोटला तीस वाटे. ॥ ३० ॥
स्थगित मग मृगाक्षी ते घडी यक राहे,
अति चकित दहाही शून्य दिग्भाग पाहे. ।
विसर तिस पडे हा कांहींही आठवेना.
हृदयकमलकोशीं दुःख हें सांठवेना. ॥ ३१ ॥
अनभिमत विचारें तें निचें चेत लासे,
विरहदहन आंगीं मागुतीं चेतलासे. ।
अपरिमित तियेला येति तेणें उमासे.
घडिक म्हणति जाऊं प्राणही हे अमासे. ॥ ३२ ॥
परम विकल तन्वी, हालवील्या न हाले.
सशपथ सखियांनीं बोलवील्या न बोले. ।
सहज यदुपतीचें नाम जे घेत आहे,
उघडुन मग डोळे तीकडे मात्र पाहे. ॥ ३३ ॥
मुखरणि सखियांची सर्व संमर्द वारी.
बहुत जवळि केली भूपतीची कुमारी. ।
हळुहळु मग काढी श्रीपतीचीच वार्ता,
न वदत तिजशीं हे बोलती तीस धूर्ता. ॥ ३४ ॥
यदुपतिपदवार्ता तन्मुखांतून येतां,
लगबग बहु झाली मूर्च्छयेलागिं जातां, ।
सकरुण सखयेसी भीमकी वाक्य बोले
सहज मृदु, जयाशीं काय पीयूष तोले ? ॥ ३५ ॥
जिव बहु उबगे हा, गोष्टि कांहीं रुचेना.
निजहित मज आतां सर्वथा हें सुचेना. ।
घडिघडि बहु, बाई, वोढती सर्व सांवा.
यदुपति मज भेटे कैं जिवाचा विसांवा ? ॥ ३६ ॥

अघटित घटना हे मांडिली या विधीनें.
कठिण हृदय केलें कां कृपेच्या निधीनें ?।
झडकरि जरि माझा येकदां जीव जाता
निजकुलपुरुषार्थी बंधु निश्चिंत होता. ॥ ३७ ॥

कनक, रजत वेंचे नित्य खंडीच खंडी,
परि मन जननीचें पातकी हा विखंडी. ।
न पुसत परभारी चालवी राजकार्यें,
नरपतिपरिपाटी टाकिली या अनार्यें. ॥ ३८ ॥

श्रुतिनिवह जयाला बोलती 'नेति नेति'
निजहृदयनिकेतीं नित्य योगींद्र नेती, ।
निशिदिन शितिकंठा हा जयाचाच धंदा,
घडि घडि बहु त्याची हे घरीं होय निंदा. ॥ ३९ ॥

निजहित समजेना, लिप्त हा होय दोषें.
तरुन कितिक गेले पातकी नामघोषें. ।
निजपदभजकांची हेलना होय जेथें,
त्वरित बहुत धांवे द्वारकानाथ तेथें. ॥ ४० ॥

सकरुण भगवंता, जाशि तूं आज कोठें ?
तुजविण पडलें हें जाण संकष्ट मोठें. ।
मजच वर न माने लग्न वायां बधावें,
झडकरि बहु माझ्या धांवण्या आजि धांवें. ॥ ४१ ॥

विविधविषयतृष्णादुर्निवारप्रवाहीं
पडति जन, तयाला नाठवे आजि कांहीं. ।
निजगुणसमुदायें यांस बोढून काढीं,
झडकरि अथवा ये नामनौकेस धाडीं. ॥ ४२ ॥

सहज घडुन आलें ये विदेशीं रहाणें. ।
तुजविण उगवी हे कोण माझीं रहाणें? ।
त्वरित बहुत आतां येकदां भेटि द्यावी,
उचलुन अथवा हे आपुली दासि न्यावी. ॥ ४३ ॥

स्मरण तुज, मुकुंदा, कां नव्हे आणि माझें?
  तुजविण मज माझा देह हा होय ओझें. ।
झडकरि अथवा हा नाशिना जीव देवा!
  रवितनयलुलायारूढ देखेन केव्हां ॥ ४४ ॥

महादैत्यश्रेणी अनुदिन असंख्यात वधिशी.
  प्रसंगीं ये कैसें अतिशयित ताटस्थ्य धरिशी?
जया सिंहा मत्तद्विरदकरटस्फोटन घडे,
  तयाला जंबूकापसददमनीं संकट पडे. ॥ ४५ ॥

गजेंद्रासाठीं तूं झडकरि कशी टाकिशि उडी?
  परामर्शी येशी द्रुपदतनयेच्या घडिघडि. ।
ध्रुवप्रल्हादादी प्रियतम महा होति तुजला:
  तयांपेक्षां कैसें निपट धरिशी दूर मजला? ॥ ४६ ॥

अनेका जन्मांचा परिचय जयासीं बहु असे,
  तया तूझें, कृष्णा, कठिण मन सर्वांहुन दिसे. ।
जगज्जीवा, किंवा दुरितचय माझा बहुतसा
  अकारुण्यें तूझ्या परिणत असा होय सहसा. ॥ ४७ ॥

सुराराध्या देवी मजवरि उदासीन सकला
  कशा झाली? मी तों निपटच पडें आजि विकला. ।
सहाकारी माझा यदुपति पहा आजिच अडे,
  कसा येकायेकीं मजवरि महापर्वत पडे! ॥ ४८ ॥

अवो बाळे, वाळे जडित तुज वाहेन बरवे.
  तिहीं लोकीं तूझें अतिशयित सामर्थ्य मिरवे. ।
मला तूं ये वेळे त्वरित जरि पावेसि जननी,
  मनोभावें तूझें अनिश यश गाईन वदनीं. ॥ ४९ ॥

अडे बंधुश्रेणी, सकल सचिवां मोहन पडे,
  धुडावे दुर्वृत्त, प्रबळ, शिशुपाला ज्वर जडे, ।
प्रभावें हें तूझ्या, जननि, जरि अद्यापिहि घडे,
  महाविद्ये, वंद्ये, तरिच घडलें कार्य विघडे. ॥ ५० ॥

त्वरित तूं, त्वरितें, जरि पावशी, । तरिच दैवतशी मज भावशी. ॥
विनवितें तुळजापुरवासिनी, । अभयदायिनि, शंभुसुवासिनी. ॥ ५१ ॥

फिरसि लोक तिन्ही वरयक्षिणी, । परम सावध हो हरिरक्षिणी. ॥
मटपिशी दमघोषसुता जयीं । पुरति सर्व मनोरथ हे तयीं. ॥ ५२ ॥

वदत वदत ऐसें सांज होयास आली,
दिनकरकरलक्ष्मी सर्व संक्षीण झाली. ।
मुखकमल तयेचें म्लान अत्यंत देखे,
म्हणवुनि कमलांचा बंधु बांधव्य राखे. ॥ ५३ ॥

सहज दिनमणी हा अस्त होतांच, एकी
प्रियतमविरहानें क्रंदती चक्रवाकी. ।
विधिविहितनियोगें वारुणी आदरीली,
म्हणुनि चरम संध्या काय आरक्त झाली ? ॥ ५४ ॥

तदुपरि उगवे हा चंद्रमा पौर्णिमेचा,
अनभिलषित अर्थी होय ये उत्तमेचा; ।
द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा,
कर पसरुन मागे वक्त्रलावण्यभीक्षा. ॥ ५५ ॥

हिमकरकर जैसे कांतिपूर स्रवेती,
हळुच तसतसे ते चंद्रकांत द्रवेती. ।
क्षुधिततर चकोरां पारणें थोर जालें,
मुकुलित कुमुदांला जन्मसाफल्य आलें. ॥ ५६ ॥

विलसित अवघें हें भीमकीला न सोसे.
अविरत मग टाकी निःसहांगी उसासे. ।
क्षणभरि सखियेचा हात घेऊन हातीं
ससलिल बहु केलीं बोलतां नेत्रपातीं. ॥ ५७ ॥

अमृतमय शरीरी, बोलती लोक सारे,
तदपि, कुमुदबंधू वर्तसी तूं कसा, रे ? ।
सहज विमल तूं तों बाळ रत्नाकराचें
असुनि, धरिसि कैसें नाम दोषाकराचें ? ॥ ५८ ॥

जिवलग सखये, तूं होसि सर्वा अपेक्षा?
तदपि करिसि कैशी आजि माझी उपेक्षा? ।
कळत कळत तों ही हातिंचें सोडिजेतें,
नियतच तरि काळें या मला वोढिजेतें. ॥ ५९ ॥

तुहिनकर, नव्हे, हें बीज चिंतालतेचें;
विकसित अथवा हें पुष्प उद्वेगतेचें; ।
अभिनव मदनाचें छत्र किंवा उभारे,
युवतिजन जयाच्या दर्शनें मात्र भारे. ॥ ६० ॥

नभ धवलित केलें, विश्व आनंदवीलें
परि विरहिजनाचें चित्त उन्मादवीलें, ।
क्षणभरि मज बाई याकडे पाहवेना
प्रलयदहनकल्प स्पर्श हा साहवेना. ॥ ६१ ॥

मज निज नलगे, हे वैरिणी शेज झाली,
तगमग सुटलोसे, राति मध्यास आली; ।
क्षणभरि सपनींही कृष्ण दृष्टीं पडेना,
नयनसलिलयोगें चित्रिचा सांपडेना. ॥ ६२ ॥

अवसर समजेना, सारिका फार बोले.
शुकवचनविलासें चित्त अत्यंत सोले. ।
अझुणिहि न वचे हा चंद्र अस्ताचलासी,
यदुपतिविरहाची वैसवीली कळाशी. ॥ ६३ ॥

बंधु देइन म्हणे शिशुपाला; । कां कृपा तुज नयेच कृपाला? ॥
दीनवत्सल, दयानिधि, ऐशीं । बीरुदें हरि गमाविशि कैशीं? ॥ ६४ ॥

पाव तूं त्वरित, नंदकिशोरा, । राधिकावदनचंद्रचकोरा. ॥
रातलें मन तुझे पदपद्मीं, । नित्य वीट उपजे निजसद्मीं. ॥ ६५ ॥

नंदगोपतनया, अनयारे, । या कसा विसरसी विनया, रे? ॥
व्यापिलें मज, मनोहरवेषा, । देवकीसुकृतसारविशेषा. ॥ ६६ ॥

अंतरीं सुख तुझें बहु दाटे, । हें वृथा सकल वैभव वाटे. ॥
एक वेळ मज सन्मुख यावें, । श्रीहरी, चरणदर्शन द्यावें. ॥ ६७ ॥

गोपिकांसि, हरि, दर्शन देसी, । भावपूर्वक अपूर्व वदेसी. ॥
घाणती घुरट ज्या कुलटा, रे, । पंथ हा, हरि, तुझा उलटा, रे. ॥६८॥

द्वारकानगरनीरजनेत्रा, । काय होति मजहून पवित्रा ? ॥
सुंदरा तरि, हरी, अथवा, रे । हा विवेक अवघाच निवारे. ॥ ६९ ॥

होय जें प्रकट गोवळवंशीं, । वाजवी मदनमोहन वंशी, ॥
वागवी निज सिदोरिस अंसीं, । ब्रह्म तें, सखि, सनातन गंसीं. ॥ ७० ॥

हा मनोगज अनावर मातें; । नांवरे मज, चराचरमाते, ॥
सिंहवाहिनि, शिवे, जगदंबे, । रक्षिं तूं, प्रणतभक्तकदंबे. ॥ ७१ ॥

वाक्यें इच्या दुःखित फार झाली; । सखी तिशीं स्पष्ट वदों निघाली. ॥
करहूयें ते उठवी तयेला, । जीणें असे उत्कट शोक केला. ॥ ७२ ॥

क्षणेक आतां तकवा धरावा, । स्वपत्रिका लेख तया करावा. ॥
मदीय शिक्षापन तूज तैसें, । नटापुढें नर्तन होय जैसें." ॥ ७३ ॥

हें आयके वचन कुंडिननाथपुत्री.
ते काय होय विदुषी मग दीर्घसूत्री ? ।
जे आणवी त्वरित रत्नजडीत दांती;
ते लेखणी, रुचिर कागद घेय हातीं. ॥ ७४ ॥

बाला, भीमकसार्वभौमदुहिता, जे गांजिली सोदरें,
पूर्वी पूर्वक पत्रलेखरचना केली तिणें आदरें. ।
स्वीयोदंतनिवेदनोक्तिपटनी, अत्यंत अध्यापिली
श्रीकृष्णानयनार्थ हे निजसखी किंवा असे योजिली. ॥ ७५ ॥

कथा हे कृष्णाची सकलजगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगीं श्रोत्यांचे सकलहि महादोष हरतीः
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ७६ ॥

॥ इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरण-
काव्ये पत्रिकालेखो नाम तृतीयः सर्गः ॥

---

# सर्ग चवथा.

ते भीमकी सर्व उपाय जाणे; । वैदग्ध्य तीचें तिस एक बाणे. ॥
सुदेव नामा द्विज सोमयाजी । स्वकीय दौत्यार्थ मनांत योजी. ॥ १ ॥
तो आणवीला अति गुप्त वाटे, । तथापिही साध्वस ईस वाटे. ॥
हळू हळू तीजसमीप आला, । तेणें नमस्कार तयास केला. ॥ २ ॥
बसावया आसन देववीलें, । सखीकरें अर्चन त्यास केलें, ॥
मंत्राक्षता हा द्विज तीस देतां । म्हणे, "वर स्वेच्छित पाव आतां." ॥ ३ ॥
अशांत आली तिजला त्रपा हे । सखीकडे किंचितमात्र पाहे. ॥
ते भाव तीचा समजोन गेली. । त्यासीं सखी वाक्य वदों निघाली. ॥ ४ ॥

विषयविषधरीं हे डंखिली आजि भारी.
कवण पुरुष येथें निश्चयें यास मारी? ।
झडकरि बहु आणी गारुडी द्वारकेचा,
त्वरित बहुत राखें प्राण ये दारिकेचा. ॥ ५ ॥

मुद्रामुद्रित पत्रिका करुनि ते विप्रापुढें ठेविली.
तेणें ते उचलून भीमकसुता सव्यें असे घेतली. ।
येकाकी अवघा त्यजून सुकृती जो द्वारके चालिला,
जेणें श्रीपतिपादपंकजयुगीं आत्मा असे वाहिला. ॥ ६ ॥

ते बोळवीत कितियेक तयास आली;
तेथेंच ते सहचरी मग राहियेली. ।
बाला विषण्ण तितक्यांतच फार भागे,
कृष्णास ते हळुच तोंडानिरोप सांगे. ॥ ७ ॥

"सर्वोत्तमा, उत्तम पाय तूझे । देखोन हे नेत्र निवोत माझे. ॥
पाहें तुझी वाट, अनाथनाथा. । सनाथ कैं हा परि होय माथा? ॥ ८ ॥

महाभुजा, राजकुलावतंसा, । मनोरमा, मानसराजहंसा, ॥
चातुर्य तूझें कवणांत आहे? । या क्षीरनीरा निवडोन पाहें. ॥ ९ ॥

सर्वत्र उच्चावच भेद आहे । बरें विचारून मनांत पाहें. ॥
दिसेत हें पांडुर तक्रदुग्धें । जाणोन घ्यावीं परि हें विदग्धें. ॥ १० ॥
मी तों नसें, रे, तुज पारखीसी. । पदोपदीं कां मज पारखीसी ? ॥
मी जाणतें केवळ जो हरीसा । तो आजि होसी मज जोहरीसा. ॥ ११ ॥
माझा जळो हा जिव वीसराळू ! । तूं तों जगन्नाथ महाकृपाळू. ॥
वाटे तुझें चित्त सहस्र ठायीं । हा चालला प्राण तुझेच पायीं. ॥ १२ ॥
तूझी कृपा पातळ फार झाली, । तेणें दशा हे मज आजि आली; ॥
गळेत नेत्रांतुनि वारिधारा । तूं पाव शोकार्णवकर्णधारा. ॥ १३ ॥
स्थळांतरीं देइल तात जेव्हां, । हा प्राण मी ठेविन काय तेव्हां ? ॥
घडो न माझी तुज आजि हिंसा, । या सोदराचा जिव होय हिंसा. ॥ १४ ॥
प्रसन्न, देवा, मुखचंद्र तूझा । ध्यातो सदा चित्तचकोर माझा. ॥
मी चातकी, तूं घन नीळ, कृष्णा; । तथापि, पाहें, नव जाय तृष्णा. ॥ १५ ॥
मी नंदिनी राजस भीमकाची । होईन दासी घरिंची फुकाची; ॥
पावेन तूझ्या चरणारविंदा । प्रसाद ऐसा करिजे मुकुंदा. ॥ १६ ॥
तूं आजिं माझी करिशी उपेक्षा । मी जीवनाची न धरी अपेक्षा ॥
जसा तसा केवळ काळ कंठीं; । प्रस्थान मत्प्राण करीत कंठीं. ॥ १७ ॥
फासां पडे केवळ मी कुरंगी, । ये पंजरीं, रे, अडके विहंगी, ॥
पंकीं पडे दुर्बळ गाय जैशी, । पदोपदीं व्याकुळ होय तैशी. ॥ १८ ॥
तूं सोडवीं जीवविहंग माझा, । होईल येणें पुरुषार्थ तूझा. ॥
त्वन्नाममुक्ताफळमात्र चारा, । तुझे पदीं केवळ यास थारा. ॥ १९ ॥
जैसें तुला मी नवरी न मानें, । करूं नको ज्येष्ठ कदापि मानें. ॥
मी धाकटी होइन धाकटींची । दासी करीं, रे, मज शेवटींची. ॥ २० ॥
करीन हे केवळ पादसेवा; । घरामधें हा न करीन हेवा; ॥
सेवीन पादोदक नित्य तूझें; । टाकीन देवा अभिमानवोझें. ॥ २१ ॥
लावीन तूझा पदरेणु भाळीं; । उच्छिष्ट सेवीन यथोक्त काळीं; ॥
त्वत्पादनिर्माल्य धरीन माथां; । गाईन, देवा, भवदीय गाथा. ॥ २२ ॥

मार्गी तुझे लोचनयुग्म लागे। त्वच्चिंतनीं मानस नित्य भागे ॥
झाली असे हे वचनीय सीमा; । तूं सर्व जाणेसि, गुणाभिरामा. ॥ २३ ॥

हा प्राणनाथास निरोप सांगें. । विप्रा, तुला आणिक येक मागें. ॥
हे गोष्टि कोणास कळों न द्यावी, । गुरूपदेशाहुनि गूढ घ्यावी. ॥ २४ ॥

ग्यां वांचणें हें त्वदधीन झालें, । हाता तुझ्या हें यश थोर आलें. ॥
धर्मांमधें उत्कट धर्म, पाहें, । परोपकारासम कोण आहे ? ॥ २५ ॥

अपार संसारसमुद्र पाहीं; । तरावया यास उपाय नाहीं ॥
तें द्वारकेचें घननीळ तारूं । येवोनि येथें, मज शीघ्र तारू. ॥ २६ ॥

तूं मायबाप कुळगोत समस्त माझें;
मी धाकटें निपट बाळक आजि तूझें. ।
तूं येकदा परमजीवन दान देई,
तो देवकीतनय घेउन शीघ्र येई." ॥ २७ ॥

नरेंद्रदुहिता असें हळुहळू जरी बोलते,
प्रभातसमयप्रभा तदपि दुष्ट डोकाविते. ।
चरित्र समजोनि हें स्तिमित राहिली भीमकी.
द्विजास म्हणते "द्विजा, परम शीघ्र तूं जाय," कीं. ॥ २८ ॥

विहंगमकुळें महाविटपिकोटरीं बाहतीं.
सुशीतल हळूहळू सुरभिवातही वाहतो, ।
विदर्भभवनीं उठे विविधवाद्यसंघोष तो,
अनेकनुतिपाठकस्तुतिभरेंच जो पोषतो. ॥ २९ ॥

कलकलति कपोती; पूर्वदिग्भाग हांसे,
हळुहळु मग तेणें चंद्र निःश्रीक भासे; ।
तशिच उडुगणाला तूटि येऊं निघाली;
तदुपरि तनुता हे दीपशोभेस आली. ॥ ३० ॥

गलबल बहु जाली दासिकांची पहांटे,
म्हणवुनि परते हे, मायचा धाक वाटे. ।
सकल निजसख्याही लागती जों उठाया,
झडकरि तंव आली भीमकी पूर्वठाया. ॥ ३१ ॥

चिरतर व्यवसायें भागली फार बाळा.
क्षणभरि तिस लागे जागृतीमाजि डोळा. ।
तदुपरि गरुडीं हे कृष्ण आरूढ देखे,
यदुतिलक जिचे हा गुंतला पूर्ण भाके. ॥ ३२ ॥
अति रुचिर विकासे कांस पीतांबराची,
प्रकट परम झाली मूर्ति त्या श्रीधराची. ।
निरुपम उमटे हे कुंडलांची झळाळी,
मणिमयमुगुटाची दीप्ति फांके निराळीं. ॥ ३३ ॥
अभिनव वनमाळा कंठदेशीं विलासे,
मुखकमल इचें जो देखतां देव हांसे. ।
यदुपति अवतारी, जो गदाचक्रधारी,
झडकरि इजसाठीं धाविलासे मुरारि. ॥ ३४ ॥
तदुपरि रव बाळा आयके सारिकेचा,
यदुपति मग तेणें हारपे द्वारकेचा. ।
खडबडुन उठे ते भीमकी नित्सुरीशी;
मुखकमलसुगंधें लाजवी कस्तुरीशीं. ॥ ३५ ॥
तदुपरि निजशय्या चांचपो जों निघाली,
हरिचरणवियोगें घाबरी फार झाली. ।
उठवुन सखियांतें दीप लावोन पाहे,
न लगत निधि हातीं, ते यथावस्थ राहे. ॥ ३६ ॥
पक्षद्वारें विप्र बाहेर आला, । क्षेमाशंसी त्याजला काक गेला; ॥
जैसा देखे पूर्णकुंभद्वयाला । तैसा त्याला पूर्ण आनंद झाला. ॥ ३७ ॥
सवत्स त्या सन्मुख गाय आली; । सुवासिनीची मग भेट झाली; ॥
देखोन सालंकृत कन्यकेला, । मुहूर्त तेणें अति धन्य केला. ॥ ३८ ॥
अनुपद मग तेथें पातली होमवेळा,
म्हणवुन मग तेणें घाबरा विप्र जाला; ।
अविदित निजगेहा ये महातांतडीनें;
विधि विहित तयाचा होय येके घडीनें. ॥ ३९ ।

उदयगिरिशिरीं हें भानुबिंब प्रकाशे,
रजनिजनित जेणें कोकशोकाग्नि नासे.।
मुकुलित कमलांचा भार उल्हास पावे,
मधुकरपटलीला बंधनिर्मुक्ति फावे. ॥ ४० ॥

द्विज सविनय वंदी सूर्यनारायणाला,
क्षणभरि मग ठेवी देवपारायणाला.।
वचन गृहपतीसीं व्यक्त बोले तपस्वी,
"मज गुरुतर कार्यीं तां करावें यशस्वी. ॥ ४१ ॥

प्रवासविधि आदरें त्वरित फार केला असे,
निदेश नृपनंदिनीविहित मानसीं हा वसे.।
कमंडलु करीं, धरी स्मरणमालिका आदरीं,
घरींहून निघे महामुदित होय जो अंतरीं. ॥ ४२ ॥

द्विजवर निजमार्गी नित्य येकांत सेवी,
सहज हरिकृपेच्या जो सिदोरीस जेवी.।
यदुपतिभजनाची लागली थोर गोडी,
हळुहळु विषयांची वासना यास सोडी. ॥ ४३ ॥

तदुपरि उपदेशी आपल्या या मनाला,
क्षणभरि परि नेदी ठाव जे कामनांला;।
सदनजनिताचिंता सर्वदा जें न साहे,
यदुकुलमणि जेथें नित्य येवोनि राहे. ॥ ४४ ॥

पुसत पुसत आली या शरीरा जरा हे,
परि हरिभजनाची वासना वांझ राहे.।
विषयबडिशलोभें गुंतसी मोहजाळीं;
कवण विषय आतां सोडवी अंतकाळीं? ॥ ४५ ॥

चलन वलन राहे, बोल भार्या न साहे;
जवळि कधिं न बाहे, नित्य सक्रोध पाहे;।
अझुणि तरि, मना, तूं सांडि येची करावी,
झडकरि उगली हे शांतिकांता वरावी. ॥ ४६ ॥

निशिदिनिं परनिंदास्वाद घेतां न राहे,
क्षणभरि हरिनामस्पर्श जीला न साहे, ।
अतिमधुर रसें हें सर्वदा तृप्त केली,
तदपि मज रसज्ञा काय उत्तीर्ण जाली ? ॥ ४७ ॥

अझुणि तुज मना हें काय कर्तव्य आहे ?
हरिचरणसरोजीं लीन होवोनि राहें ।
स्मरण करिं हरीचें, व्यर्थ आयुष्य वेंचें:
मरण जवळि आलें: काळ कोणास मेचे ? ॥ ४८ ॥

गोकुळीं प्रकटली द्युति सांवळी,
गोधनें द्रुमतळीं सहसा वळी, ।
जे सनातन जगत्त्रय सावली;
तत्पदीं हृदयवृत्ति विसांवली ॥ ४९ ॥

द्वारकापतिपदांबुजमार्गी
लागलें मन. विटे अपवर्गी. ।
वासुदेव मज कौस्तुभधारी
आठवे नलिननाभ मुरारी. ॥ ५० ॥

जो परात्पर अगोचर वेदां,
नातुडेच हरि जो मतभेदा, ॥
गोपवेष मुरलीधर ध्यावा,
तोच त्वां मुखिं अहर्निश गावा. ॥ ५१ ॥

कृष्णमूर्ति हृदयीं जडलीसे. । तत्पदा दृढ मिठी पडलीसे. ॥
विश्व हें सकळ तन्मय जालें, । द्वैतभान अवघेंच उडालें. ॥ ५२ ॥

हा भवाब्धि मजला न उलंघे । धुंडिता विषय मानस लंघे. ॥
सांवळा सगुण, जो अवतारी, । कर्णधार उतरील उतारीं. ॥ ५३ ॥

ओघ येति तुझिया स्तवनाचे, । भारती बहुत यास्तव नाचे. ॥
वेग जाय मुरडोन मनाचा, । नित्य उत्सव तुझ्या नमनाचा. ॥ ५४ ॥

मातलों धनमदें, जगदीशा, । नाठवेशि मज गोपतिवेषा. ॥
वेदवेद्यचरिता, भगवंता । येइं मी शरण तूज, अनंता. ॥ ५५ ॥

आयके द्विज अजामिळ नांवें, । त्याजला पतितराज म्हणावें, ॥
उद्धरे निधि अनाचरणाचा, । हा प्रताप तुझिया चरणांचा. ॥ ५६ ॥

रूप हें सहज सुंदर तूझें । नोळखे हृदय पामर माझें. ।
हे निरर्थक भरे बहु व्हावें; । या अनित्य विषयांवरि धांवे. ॥ ५७ ॥

खेळ हा सकळ मोडुन नेला, । थोर तां मज अनुग्रह केला; ॥
दावणीहुनि सुटे पशु जैसा । होय मी सहज मुक्तच तैसा. ॥ ५८

तूजवीण मन पांगुळ झालें, । आंधळेपण मतीसह आलें. ॥
ऊचलून कडिये मज घेई, । कृष्णरूपजननी स्तन देई. ॥ ५९ ॥

तूं असोनि जननी कनवाळु, । मी तुझें परमबाळ भुकाळू, ॥
काय होय अति वो रस तूझा, । प्राण जाय तुजवांचुन माझा. ॥ ६० ॥

मी विषण्ण विलपें परदेशीं, । तूं कसें मज अनुत्तर देशी ? ॥
वत्सले, त्यजुनि बाळक तान्हा । काय हा पळविशी निजपान्हा ?॥६१॥

बाळके रुसतसे जननींसीं, । काय माय रुसते परि त्यासीं ? ॥
वासुरां त्यजुन गाय खडाणी । काय जाय पशुजाति अडाणी ? ॥६२ ॥

श्वापदांत भयभीत वराकी । काय हे हरिणि पाडस टाकी ? ॥
चारया जरि विहंगिणि जाते, । ते फिरोन पिलियांप्रति येते. ॥ ६३ ॥

कोरडें मुख पडे बहु माझें । न द्रवे अजुनि मानस तूझें. ॥
म्यां किती तार हरी विलपावें ? । कोण काळ तरि तारिल पावें. ॥६४॥

कंठ हा गहिंवरें बहु दाटे. । लावि सत्वर मला निज वाटे. ॥
पंथ हा जरि तुझा उमगावा, । पाश हा तरिच रे, उगवावा. ॥ ६५ ॥

बहुविध महायासें ऐसें मनाप्रति बोलतां,
स्मरणहि शरीराचें ज्याला नसे पण चालतां; ।
तदपि करुणासिंधू पंथा स्वकाय न टाकवी,
जळनिधिमहासीमेमध्यें हळू हळु पाववी. ॥ ६६ ॥

नयनकमळें विप्राचीं ते क्षणेंच न्यहाळिती
कळस कनकप्रासादांचे जडीत झळाळिती. ।

तदुपरि पहा आलीं नामें तदीय मुखांबुजा.
जय जय कृपासिंधो, बंधो मदीय, अधोक्षजा. ॥ ६७ ॥
यदुपतिपुरी विप्रातें ते दिसों जंव लागली,
प्रणति भगवद्भक्तें तेव्हां असे मग घातली. ।
सजल नयनें झालीं, प्रेमें गळा बहु दाटला,
अतिशयित हा रोमांचाचा समूहहि थाटला. ॥६८॥
कथा हे कृष्णाची सकल जगदानंदजननी.
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकलही महादोष हरती;
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ६९ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये द्वारकादर्शनो नाम चतुर्थः सर्गः ।

---

# सर्ग पांचवा.

महापुण्यें राहे जलधिजठरीं हेमनगरी,
धरी जे सद्भावें त्रिभुवननिधानास उदरीं; ।
तिच्या द्वारा आला द्विजवर महासंभ्रमभरें,
कपाटें रत्नांचीं विलसति जयेलागिं रुचिरें. ॥ १ ॥

जे देखिली केवळ कांचनाची । कृतार्थता होय विलोचनांची. ॥
प्रवेशही ते नगरींत केला; । जन्मांतरीय श्रम सर्व गेला. ॥ २ ॥

वाहे जिचा उत्कट धाक लंका, । धरीत आहे अलका कलंका, ॥
जे लाजवीते अमरावतीला, । हा आदरी यादवराव तीला. ॥ ३ ॥

लोटांगणीं येति महासमृद्धि, । लोळेति दारीं अणिमादि सिद्धि. ॥
पावोनि अत्युत्कट संपदा या । चुकेतना जे निजसंप्रदाया. ॥ ४ ॥

बिदोबिदीं लोटति तें प्रवाळें;। खेळेत मुक्तागण विप्रवाळें. ॥
जेथें नसे आदर माणिकांचा, । विचार कैचा परि आणिकांचा ? ॥ ५ ॥

द्विज नगर पहातां भ्रांत होवोनि गेला;
चुकत चुकत दैवें राजचौकांत आला. ।
सभय यदुपतीच्या पावला द्वारपाळीं,
हरिजवळि जयाला नेइंजे द्वारपाळीं. ॥ ६ ॥

निरुपम तंव देखे बाग, पीयूषवापी;।
हरिगुण पिक गाती; नाचती ते कलापी:।
सहजच ऋतु साही होति येकत्र गोळा,
कधिंहि न समजे हा पाउसाळा, उन्हाळा. ॥ ७ ॥

तशी असे अंगणभू नृपाची, । बसेत जेथें अति सज्ज पाची. ॥
उठेत जेथें जलयंत्रधारा, । देवांगना नाचति निर्विकारा. ॥ ८ ॥
गंधर्व जेथें करितात गानें, । स्वर्लोकवासी धरिती विमानें, ॥
मेळा मिळे उत्कट किन्नरांचा, । करी महा आदर तो नरांचा. ॥ ९ ॥
झुलेत ऐरावतकोटि जेथें, । उच्चै:श्रवे काय नसेत तेथें ? ॥
स्थळीं स्थळीं युद्ध करीत जेठी, । नरेंद्रही घेउनि येति भेटी. ॥ १० ॥
चहूंकडे रत्नजडीत जोतीं; । गोपानशीला अगणीत मोतीं. ॥
अशी असे राजसभा विशाला; । चंद्रासही स्पर्शति चंद्रशाला.॥११॥
वातायनें शोभति इंद्रनीळीं, । दिगंतरें भासति सर्व नीळीं. ॥
तशा हिऱ्यांच्या घडितां चिऱ्यांच्या। परंपरा शोभति पायऱ्यांच्या.॥१२॥

तदुपरि जंव वेंघे विप्र सोपानपंक्ती,
झडकरि तंव चारी आडव्या येति मुक्ती; ।
ढकलुनि परत्या त्या, तो पुढें चाललासे.
हरिचरणसरोजीं जीव हा ठेविलासे. । १३ ॥

जय, विजय उभे हे त्या सभाद्वारदेशीं;
म्हणति, 'कवण येतो हा बिचारा विदेशी.' ।
क्षणभरि परि कांहीं त्यांकडेही न पाहे;
मुनिजनहृदयाचें लक्ष्य लक्षीत आहे. ॥ १४ ॥

सिंहासनीं श्यामल तेज भासे। देखोन जें यास निगूढ हांसे. ॥
द्विजागमाचा हरि हेतु जाणे । अक्रूरहस्तावरि हस्त हाणे. ॥ १५॥
विलक्षणा तेथिल राजरीती, । देवांसही मानव नादरीती ! ॥
हा विप्र येणें अति भीति वाहे, । मधें मधें थोकत येत आहे. ॥ १६ ॥
कृष्णास दृग्गोचर विप्र झाला, । तत्काल खालें उतरोन आला. ॥
सस्नेह वत्साप्रति गाय धांवे, । तसाच भक्तांप्रति देव पावे. ॥ १७ ॥
पीतांबराचा बहु घोळ लोळे, । आकर्णपर्यंत विशाल डोळे. ॥
आपाद कंठीं वनमाळ घाली; । ते सांवळी सन्मुख मूर्ति आली. ॥१८॥
द्विजास तेव्हां न सुचेच कांहीं । पडे महानंदरसप्रवाहीं; ॥
स्तवी चतुर्वक्र जयास वंदी । तो कृष्ण त्याचे मग पाय वंदी. ॥ १९ ॥
अर्धासनीं आणुनि बैसवीला, । यथाविधीनें मधुपर्क केला. ॥
ब्रह्मादिकां जो हरि वोचकेना, । तो आजि याच्या उचिता चुकेना ॥२०॥
अपूर्व वाटे सनकादिकांला, । तसें वसिष्टादिक वैदिकांला. ॥
एतत्कृपागर्व महा वहाती, । परस्परें ते वदनें पहाती. ॥ २१ ॥
सुदेव नामा द्विज माज सोडी, । तें भीमकीचें मग पत्र काढी. ॥
म्हणे तया श्रीहरि, 'राहवावें; । क्षणांतरीं हें मज दाखवावें.' ॥ २२ ॥

तदुपरि मग सायंकाळिचा तास वाजे,
विविध रुचिर वाद्यध्वान गंभीर गाजे. ।
अगणित मग येती दीपधारी, हिलाली,
यदुपतिनमनीं हे पंक्ति ज्यांची कलाली. ॥ २३ ॥

बहुत जवळि आली हे समुत्थानवेळा
म्हणउनि विनयें हा षण्मुखें अर्ज केला. ।
यदुपति उठतां हे वारि होऊं निघाली,
तदपि कितियकांची दाटि अत्यंत झाली. ॥ २४ ॥

कषति परम जेथें अंगदें अंगदांसीं,
अपरिमित तशीं हे आयुधें आयुधांशीं. ।
विलुठति पदपीठीं देव कोटीनुकोटी,
अहमहमिकतेनें धांवती वीर कोटी. ॥ २५ ॥

क्षणभरि तंव तेथें विप्र साशंक पाहे,
झडकरि कर त्याचा सात्यकी घेत आहे. ।
तदुपरि अवरोधद्वार किंचिद्विलंबे,
यदुपति मग पावे पार्थहस्तावलंबें. ॥ २६ ॥

संध्यामंडपमार्गे दावित असे मुख्य प्रतीहारिका.
'यावें, श्रीहरि! कृष्ण! यादवपते!' हें बोलती सारिका. ।
संध्यावंदन आदरें करुनि जों गेला असे भोजना,
विप्राची तंव नारदें हळुच ते केली असें सूचना.॥ २७ ॥

झडकरि जगदीशें विप्र तो आणवीला,
अति सुरभि फुलेलें आदरें न्हाणवीला; ।
तडप रुचिर लाखी उंच हा नेसवीला;
सविनय मग पंक्ती आपुले बैसवीला. ॥ २८ ॥

सुरभिसलिल देती कस्तुरी आंचवाया,
स्थविर तदपि लागे मृत्तिका चांचपाया. ।
अभिनव नवलें या हांसती देवदासी,
हळुच मग दटावी ते दरोगीण त्यांसी. ॥ २९ ॥

निजेल्याही रामायण अणि महाभारत पढे,
मधेमध्यें नामस्मरणमहिमा त्यावरि चढे. ।
महाध्यानाभ्यासीं स्थगित मग राहे क्षणभरी,
मनामध्यें येती हरिपदसुखांभोधिलहरी. ॥ ३० ॥

भरें हा निद्रेच्या द्विजपति निजेला जंव असे,
त्यव्हां, हा येऊन प्रभुवर तया संनिध बसे. ।
मनस्वी, विश्वात्मा, भुवनपति, विश्वंभर, हरी,
विसांवा भक्तांचा द्विजचरणसंवाहन करी! ॥ ३१ ॥

करस्पर्शें त्याच्या द्विजतिलक तत्काल उठिला,
म्हणे "हा श्रीकृष्णा परम मज अन्याय घडला!" ।
पदीं माथा ठेवी; झडकरि करें तत्कर धरी,
"प्रकार स्वामी हा सकल परलोकास अघरी. ॥ ३२ ॥

घडे हें प्रत्यक्ष प्रकटच तुझें दर्शन मला,
नसे कांहीं माझा तदपि असदुद्योग शमला;।
रहातां ही पाहें सुरपतितरूच्या तळवटीं,
जसा भिक्षेसाठीं निशिदिस करंटा कटकटी ! ॥ ३३ ॥
अहो या लोहाचा जिनस परिसेसीं जरि मिळे,
तयाच्या संसर्गे अखिल मग लोहत्व उधळे. ।
अकस्मात स्वामी, सकलहि अहंकार निरसे,
पदस्पर्शें तूझ्या सहज मजला मीपण नसे " ॥ ३४ ॥
सदा सद्भावाचा अतिशयित भोक्ता हरि असे,
मनामध्यें ज्याच्या स्वपरजनवैषम्य न वसे. ।
महा प्रेमें त्यासीं तदुपरि जगन्नायक वदे,
जयाचे भक्तीला मन यदुपतीचें बहु बधे. ॥ ३५ ॥
"चहूंमध्यें मुख्य प्रकटच गृहस्थाश्रम असे,
असें विश्रांतीचें निलय दुसरें आणिक नसे ।
प्रसंगें हें तेथें अतिथिपरिचर्या जरि घडे,
समारंभें अंतीं सुरपतिपुरद्वार उघडे. ॥ ३६ ॥
प्रसादें ज्यांच्या मी यदुपति जगन्नायक असें,
असे हे निर्वाहें अझुणि समजेना जग कसें ? ।
मदीया भक्तांचा अपसद तिरस्कार करिती;
अहो, ते दुष्टात्मे नियत मजशीं वैर धरिती. ॥ ३७ ॥
भल्याच्या संतोषें निरतिशय माझें मन निवे,
तयांच्या या दुःखें नियत बहुधा जीव दुखवे. ।
तयां भक्तांसाठीं विविध अवतारांस धरणें,
तदुद्देशें ऐसा विरस मज संसार करणें. ॥ ३८ ॥
अहो, सद्भक्तांचा परम मज दुष्काळ पडला,
अशामध्यें तूझा अवचट मला लाभ घडला ! ।
द्विजा तूझें आहे अनिश अनुसंधान मजशीं,
घडे कैसा तेथें क्षणभरि तरी भेद तुजशीं ? ॥ ३९ ॥

सदा सद्वांच्छेचें हृदयविवरीं बीज उगवे,
अहो, मद्भक्तीचा तरिच बरवा कोंब उघवे. ।
विवेकाचे पाले सहज फुटती कोमल नवे,
मनाचे वृत्तीला अभिनव कसा उत्सव नव्हे. ॥ ४० ॥
क्रमप्रार्मीनें हे तदुपरि फुले शांतिलतिका,
असें हें विश्रांतिस्थल परम जें जीवपथिका. ।
निजानंदामोदें सकल सुखदुःखादि विसरे,
पहातां अद्वैतामृतफळ रसोद्रेक पसरे. ॥ ४१ ॥
समस्तां शास्त्रांचें मथित कथितों सार तुजला,
नको आतां टाकूं क्षणभर मनांतून मजला. ।
कराया हे सेवा समुचित तुझी सिद्धच असें,
अभिज्ञा, विप्रद्रा, प्रकृत तुजला यावरि पुसें. ॥ ४२ ॥
समुद्रामध्यें हें स्थळ तरि महा दुर्गम असे,
तुम्हां लोकांचा तो अझुणिवरि संचारच नसे; ।
किमर्थ स्वामी, हा श्रमित बहु आत्मा श्रमविला ?
कळों द्यावें याचें झडकरि तुम्हीं कारण मला." ॥ ४३ ॥
घनःश्यामाचीं हें सरस वचनें विप्र परिसे,
महा आनंदाचे हुरुप उठती त्याजसरिसे. ।
तुरीयावस्थेचे अनुभवरसीं यद्यपि वसे,
तऱ्ही श्रीकृष्णाला प्रतिवचन हे देतच असे. ॥ ४४ ॥
"विदर्भी हे आहे प्रथित बहुधा कुंडिनपुरी,
तयेच्या राजाची चतुर विलसे आजि कुमरी. ।
मनोभावें कृष्णा, नियतच जिनें तूज वरिलें,
तुझे पायीं निष्ठा धरुनि तुजला पत्र लिहिलें." ॥ ४५ ॥
द्विजें श्रीकृष्णाचे तदुपरि करीं पत्र दिधलें,
तयानें लाखोटा उखळुनि असे जें उकलिलें. ।
तयाला वैदर्भी स्वलिखितमिषें भेटत असे.
जयेच्या प्रेमाचा अतिशय असाधारण दिसे. ॥ ४६ ॥

जेथें वठे रुचिर कुंकमबिंदु शोभा,
लाजे जिला कनककेतकिगर्भगाभा; ।
आली असे प्रकृत जे प्रतिमा प्रियेची,
ते पत्रिका हळुच यादवराव वाची. ॥ ४७ ॥
जैसी असे विमल वोवणि मोतियांची,
तैसी वसे सहज ठेवणि अक्षरांची; ।
ओजःप्रसादमधुरादिक सपदांची,
शोभा धरून विलसे रचना पदांची. ॥ ४८ ॥
"तीर्थस्वरूपचरणा, करुणानिधाना,
प्रौढप्रतापमिहिरा, प्रथिताभिमाना, ।
सौजन्यसिंधुसदना, मदनाभिरामा,
सर्वोपकारनिरता, समवाप्तकामा, ॥ ४९ ॥
राजाधिराज, यदुवंशशिरोवतंसा,
कंसांतका, मुररिपो, कमळानिवासा, ।
राजश्रियासह विराजित राजमान्या,
वंदी तुझे चरण भीमकराजकन्या. ॥ ५० ॥
विज्ञापना परिस यादववंशवीरा,
योगींद्रहृत्कमलपंजरगर्भकीरा; ।
ज्ञातास ये त्वरित आजि उडोन माझ्या,
वार्ता मला श्रवणगोचर होति तूझ्या. ॥ ५१ ॥
माझा मनोमधुप लुब्ध बहूत झाला,
तूझें पदांबुजयुगीं रहिवास केला. ।
काकूलती बहुत याजनिमित्त येतें,
कृष्णा, तुझे चरणपल्लव हे धरीतें. ॥ ५२ ॥
सर्वा गुणीं तुजसमान महा वदान्या,
ते कोण तूज नवरी न वरील धन्या ? ।
विद्यावयद्रविणरूपगुणौघधामा,
कृष्णा, नृसिंह नरलोकमनोभिरामा. ॥ ५३ ॥

या कारणें नियत त्यां वरिलास भावें,
   येऊनियां त्वरित त्वां मज आजि न्यावें.।
हा लागला जिव असे तुजवीण जाया,
   तूं आपुली हरि करी मज आजि जाया. ॥ ५४ ॥
हा वीरभाग शिशुपाळ जयीं विटाळी,
   वीरांमधें तुरुत होइल येकि टाळी.।
लज्जा त्यजून धिट आणिक येक बोलें,
   सिंहामिषा हरुनि नेतिल आजि कोल्हे ! ॥ ५५ ॥
यागादिदाननियमव्रतदेवपूजा,
   केली असे, तरिच होइल लाभ तूझा.।
येऊनियां त्वरित फार गदाग्रजानें
   पाणिग्रहास करिजेच चतुर्भुजानें. ॥ ५६ ॥
पर्वा असे लगिन निश्चित जाण भावें,
   सेनेसमेंत अति गुप्त बहूत यावें.।
मंथून चैद्यमगधेशबळासि धीरा,
   रक्षोविवाह विधिनें मज नेयिं, वीरा. ॥ ५७ ॥
अंतःपुरांतुन वधू न वधून बंधू,
   नेऊं कशी म्हणाशि तूं पुरुषार्थसिंधू ?।
यांचे कुळीं नववधूस असे विचित्रा
   लग्नास पूर्व दिवशीं कुलदेवियात्रा. ॥ ५८ ॥
ग्रामास संनिध निकेतन अंबिकेचें,
   जें हें असे निजमनोरथदायिकेचें;।
तेथें बसोन घटिकाद्वय वाट पाहें,
   मी ही नये तरि तुझी मज आण आहें. ॥ ५९ ॥
विज्ञापना शपथपूर्वक तूज केली,
   येथील तो सकळरीति कळोनि गेली.।
आणीक काय निपुणाप्रति त्यां लिहावें,
   त्वां एक वेळ सगुणा इकडे पहावें. ॥ ६० ॥

हेजीव हे जीभचि जाण माझी,
येथें नसो किमपि विप्रतिपत्ति तूझी. ।
पत्रांत लेख्य अवशिष्ट असेल कांहीं,
याच्या मुखें विदित होइल तूज तें हीं." ॥ ६१ ॥

हें भीमकीपत्र समाप्त जालें. । कृष्णास कांहीं यक हास्य आलें. ॥
जाणोनि हा आदर माधवाचा, । वदे प्रसंगोचित विप्र वाचा.॥ ६२ ॥
"चतुर्भुजा, नीरदनीळवर्णा, । परावरा, वीरकुलावतीर्णा, ॥
विशेष हा आइक शेषशाई । करीस लोकत्रयपातशाही. ॥ ६३ ॥
ते भीमकी पंकजपत्रनेत्रा, । कृशोदरी पूर्णसुधांशुवक्त्रा, ॥
उत्फुल्ल आरक्त सरोरुहांतें । जे लाजवीते करभोरु हातें. ॥ ६४ ॥
असेत हे सुंदर केश काळे, । विशाल तीचे विलसेत डोळे; ॥
जयांपुढें खंजन खंज जालें, । प्रत्यक्ष हे मीन जळीं लपाले. ॥ ६५ ॥
अत्यंत हे स्वच्छ कपोल दोन्ही, । सुवर्णशुक्तिभ्रम होय कानीं; ॥
नासा तिची हे उपमा न साहे, । तिलप्रसूनाहुन नीट आहे. ॥ ६६ ॥
असे गळा मंजुळ हा निसर्गे, । तथापि तीचीं वचनें महर्घे. ॥
तीच्या स्मिताचें जंव तेज फांके । तेणेंहि त्याचें मग ओज झांके. ॥ ६७॥
नसे मनांतून कदापि खोटी; । खोट्या करी तप्त सुवर्णकोटी. ।
गंगाप्रवाहोपम शील जीचें; । पवित्रतावर्णन काय तीचें ? ॥ ६८ ॥
पादादिमूर्धांत सुलक्षणांनीं । संपन्न सामुद्रिक लक्षणांनीं. ॥
लक्ष्मीच किंवा अवतीर्ण जाली । या भीमकाच्या उदरास आली.॥ ६९ ॥
तीचा सदा गद्गद कंठ दाटे, । नेत्रांबुजीं सागरपूर लोटे, ॥
तूझे कृपेच्या नसतां जिव्हाळा, । वांचेल कैसी सुकुमार बाळा ? ॥ ७० ॥
तूझ्या गुणांची जपमाळ केली । ते वीसरे भोजनही भुकेली. ॥
कृष्णा, तुझीं जें असती चरित्रें । चित्रीं पहा ते लिहिते विचित्रें.॥ ७१ ॥
पाहे तुझी वाट नरेंद्रपुत्री, । दिसेस तूं तो मज दीर्घसूत्री ! ॥
केली तिची घेउन हे अनुज्ञा, । आतां असे यावरि काय आज्ञा ? "॥७२॥
वाक्यें अशीं हे जंव आयकीलीं, । श्रोत्रें हरीचीं अति तृप्त झालीं. ॥
धरून हातें मग हात त्याचा । वदे तयासीं स्मितपूर्व वाचा. ॥ ७३ ॥

" रुक्मीच तो मद्विषयीं निषेधी, । कळोन गेलें तुजहून आधीं. ॥
आतां रणीं सर्व वधून वैरी, । हरीन ते कांचनगर्भ गौरी. " ॥ ७४ ॥
बोलोन ऐसें पणपूर्व शौरी । प्रस्थाननक्षत्र त्यव्हां विचारी. ॥
तों दैवयोगें गुरुपुष्य साधे, । मुहूर्त अत्युत्तम कृष्ण लाधे. ॥ ७५ ॥
उत्साह तेणें द्विगुणीत झाला. । तत्काळ तेव्हां रथ आणवीला. ॥
आनंदला नंदन देवकीचा, । तेथेंच केला विधि देवकाचा. ॥ ७६ ॥
धरून हातें द्विज बैसवीला. । विशेष हा आदर दाखवीला. ॥
त्यानंतरें आपण पाय टाकी. । तत्काळ तो दारुक अश्व हांकी. ॥ ७७ ॥
धांवेत ते तेथुन फार घोडे, । वाटेत हें ज्यांस दिगंत थोडें. ॥
तों कावळेही उजवे उडावे. । महा हटी चासहि जाति डावे. ॥ ७८ ॥
उल्लंघिलीं ग्राम, पुरें, सहारें, । प्राणप्रियाचारुकथाविहारें. ॥
आनर्तदेशींहुन येक रात्रें, । तें पाविजे कुंडिन पद्मनेत्रें. ॥ ७९ ॥

कथा हे कृष्णाची सकलजगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं; ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकलहि महादोष हरती,
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ८० ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये कुंडिनाऽऽगमनं नाम पंचमः सर्गः ॥ ५ ॥

---

## सर्ग सहावा.

याहून पूर्वी शिशुपाळ आला, । जेणें विवाहोचित वेष केला. ॥
चाले जयाची चतुरंग सेना, । रजोविशेषें रवि हा दिसेना. ॥ १ ॥
रुक्मी पुराबाहिर त्यास आला, । करून पूजा मिरवीत नेला. ॥
वाजेत भेरी, बरवे नगारे, । ते भीमकाची नगरी सवारे. ॥ २ ॥
चैद्येंद्र हा जानवशास आला, । नृपें पुरस्कार बहूत केला. ॥
चहूंकडे या प्रसरेत वार्ता. । आरंभलें मूळ महा अनर्था. ॥ ३ ॥

स्त्रीरत्न हें कृष्ण हरील जेव्हां । स्वकीय नाशे पुरुषार्थ तेव्हां. ॥
म्हणोनि हा मागध सिद्ध झाला, । सहाय या चैद्यनृपास आला. ॥ ४ ॥
या वेगळे आणिक येति राजे, । बलिष्ठ ज्यांचा दळभार साजे. ॥
कित्येक हे चैद्यनृपा सहाया, । कित्येक हे कौतुकही पहाया. ॥ ५ ॥
काश्मीर, पांचालक, गौड येती, । आवंत्य, बाल्हीक, अनेक जाती, ॥
कैकेय, गांधार अनेक आले, । सत्कार त्यांचे बहु फार केले. ॥ ६ ॥

झडकरि गणकांला भीमकें आणवीलें,
कनकमय विटांचें बोहलें घालवीलें. ।
दृढतर बसवीले अर्गजाचेच लेव,
वरिवरि करिजेती कस्तुरीचे गिलावे. ॥ ७ ॥

विविध मधुर वाद्यें, चौघडे वाजताती:
अगणित दरबारीं भाट हे गाजताती; ।
तदुपरि मग ल्याल्या नेसल्या नायकांचे
अगणित गण येती, सोयऱ्याधायऱ्यांचे. ॥ ८ ॥

सकळहि मग तेथें राजपत्न्या मिळाल्या,
धरुनि मुलिस हातीं स्नानशाळेस आल्या. ।
कुचित मन तयेचें होय, कांहीं न चाले,
यदुतिलकविलंबें घाबिरे प्राण झाले. ॥ ९ ॥

सुस्नात देवी मग ते सुशीला । प्रवेशली येउनि यज्ञशाळा. ॥
जे पीत खंबाइत उंच नेसे, । जे हेमपीठावरि सज्ज बैसे. ॥ १० ॥

पुण्याहवाचन करून बसेत दोघे,
आहेर घेत असती द्विजमंत्रयोगें. ।
बैसे पुढें अति सुलक्षण ते कुमारी,
नीरांजनें करिति तीस अनेक नारी. ॥ ११ ॥

अथर्ववेदें गृहयज्ञ केला. । ते भीमकीला अभिषेक झाला. ॥
हिरण्यगोभूतिलवस्त्रदानें । इच्छा परें देवविलीं नृपानें. ॥ १२ ॥

मिळति सकल तेथें ऋग्यजुःसामवेदी,
शतपुरुष जयांची हे अविच्छिन्न वेदी. ।

त्वरित बहुत केली मंडपादि प्रतिष्ठा,
धरणिपतिस देवीं ब्राह्मणीं थे.र निष्ठा. ॥ १३ ॥

कित्येक हे येति दशावधानी, । जे कुंडलें हालविताति कानीं. ॥
पदोंपदीं देति महापरीक्षा, । जाली असे सौमिक ज्यांस दीक्षा. ॥ १४ ॥

अपार ते दीक्षितभार येती, । समागमें जे पशु वागवीती. ॥
प्रत्यक्ष दंभप्रतिमाच जे कीं । अस्था नसे हे सदसद्विवेकीं ! ॥ १५ ॥

स्वधर्में गोदेच्या उभयपुलिनीं वास करिती,
सदा श्रीकृष्णाच्या चरणयुगुलीं जे विचरती, ॥
सदाचारी वेदाध्ययनरत वेदांत पढती,
तयांचे हे तेथें अतिशयित सन्मान घडती. ॥ १६ ॥

स्नानें करून मग विप्र समस्त आले.
सत्कारपूर्वक यथोचित बैसवीले. ।
पात्रें सुवर्ण रुचिरें मग मांडवीलीं.
गंधाक्षतें कितियकीं मग चालवीलीं. ॥ १७ ॥

जेव्हां घृतान्त परिवेषण सर्व जालें,
आपोशनादि मग कृत्य समग्र केलें. ।
पंक्ती अनेक बसती विविधप्रकारा
बाळा तथापि करिती बहु येरझारा. ॥ १८ ॥

कितियक सुख तेथें स्वीय जिव्हेस देती.
अनियत हरिनामें भक्त कित्तेक घेती. ।
विविध परम होतो नामसंतोष जेथें;
घडिघडि बहु देते भीमकी कान तेथें. ॥ १९ ॥

सहज निजजिवाचा जीव जो अंतरींचा,
निशिदिवसच लागे वेध त्या श्रीहरीचा. ।
अनिश हृदय तीचें तत्स्वरूपाभिलाषी;
मुखकमल तयेचें तद्गुणौघाभिलाषी. ॥ २० ॥

न वदति सखयाहो सर्वथा तत्प्रसंगीं.
अमित बहुत जाली अंग टाकी पलंगीं. ।
परम विकळ बाळा फार चिंता करी ते,
अनिश यदुपतीचे पाय जे आठवीते. ॥ २१ ॥

"अद्यापि वैकुंठनिवास येना; । तेथून त्याचें मन हें निघेना; ॥
लग्नास तों रातिच आड आहे; । करीच ना ईश्वर कां कृपा हे? ॥२२॥

हरून माझ्या जिवसावजाला, । तो आजि कैसा हरि साव जाला? ॥
आतां कशाची मज जीवनाशा? । जालें असें सन्मुख जीवनाशा.॥२३॥

जो द्वारके ब्राह्मण पाठवीला । अद्यापि नाहीं परतोन आला. ॥
जे भक्त कृष्णाप्रति पावताती । फिरोन ते काय घरा न येती? ॥२४॥

जेथें नसे आदर नारदाचा । कदापि या योगविशारदाचा, ॥
अद्यापि जेथें शुक बैसला, गे, । हा विप्र कोणे लगडेस लागे? ॥२५॥

तथापि तो बंधु अकिंचनाचा । प्रसिद्ध हे शास्त्रपुराण.वाचा ॥
हा येक विश्वास असे मला, गे, । परंतु मार्गीं हरि हा न लागे. ॥२६॥

त्या देवकी आदिकरून राण्या । निषेधिती काय महा शहाण्या? ॥
कृष्णार्थ कृष्णास पडेत गुंते? । कीं योगियांच्या हृदयांत गुंते? ॥२७॥

कीं पूर आला बहु आपगेला? । कीं आडवा येउनि साप गेला? ॥
किंवा रथाचें युग भग्न जालें? । कीं पांखरू आजि उडोनि गेलें ॥२८॥

येकीकडे लौकिक सर्व ठेवूं? । निर्लज्ज लोकांत म्हणोन घेवूं? ॥
कीं द्वारके धाडुन जीव देवूं? । कीं पक्ष लावून उडोन जाऊं? ॥ २९ ॥

पदीं श्रीकृष्णाचे अविरत मनोवृत्ति विवरे.
वियोगें त्याच्या हा क्षणभरि मला धीर न धरे. ।
रहावी हे माझी यदुनि अवघीं हीं व्यवसितें.
कितेकां या देवां विविध नवसातें नवासितें. ॥ ३० ॥

गणाधीशा जे जे स्मरति तुज संकष्टसमयीं,
पहा, ते ते होती मनुजजन आजन्म विजयी; ।

कुमारा गौरीच्या, म्हणुन विनवीतें तुज बरें
चतुर्थी तूझ्या मी करिन अवघ्या थोर गजरें. ॥ ३१ ॥

भुवननायक, कंजविलोचना, । गरुडवाहन, शोकविमोचना, ।
रुससि कां मुरलीधर, माधवा, । मदनमोहन, गोकुळबांधवा. ॥ ३२ ॥

उबगती सखिया निजजीविता; । न पवती कुळिंच्या कुळदेवता; ॥
जनक हे जननी मजला नसे; । यदुपती मज आस तुझी असे. ॥ ३३ ॥

अवस, रे, बहु होय मला तुझी. । परिणिसी नवरी अथवा दुजी, ॥
जऱ्हि असे नृपनायककन्यका । तऱ्हि तुझी हरि होइन दासिका." ॥३४॥

घडिघडी बरळे असि भीमकी, । चतुर जे सकळा गुणें नेटकी. ॥
यदुपुरीपथ साशय जे पुसे, । न कथितां सखियांवरती रुसे. ॥ ३५ ॥

सहचरीवचनें सलती जिला, । कवण आणिक हे शिकवी तिला ? ॥
घरिंहुनी क्षण येक न हालली । तदपि ते मग बाहिर चालली. ॥ ३६ ॥

अति चतुर वयस्या आढवी तीस आली,
धरुन हळुच हातीं भीमकी चालवीली; ।
तदुपरि पथ दावी माधवीमंडपाचा,
हरिविण बहुवारा होय ईच्या जिवाचा. ॥ ३७ ॥

प्रमदविपिनगर्भी वेदिका कांचनाची,
तिजवरि बसवीली कन्यका भीमकाची. ।
निजकरकमळीं जे वक्त्रचंद्रास ठेवी;
व्रत नवजलदाचें लोचनद्वंद्व सेवी. ॥ ३८ ॥

मुररिपु, अवतारी, जो महा मूढ तारी,
हरहृदयविहारी, केशव क्लेशहारी, ।
सकळजनविसांवा द्वारकाधीश आहे,
पुनरपि मग त्यासी वक्र बोलोन पाहे. ॥ ३९ ॥

" सकरुण विलपें मी, माधवा, केधवांची,
त्यजुन सकळ आशा आपल्या बांधवांची. ।

यदुपति अडल्यांचा सारथी तूंच होसी;
क्षणभरि परि येथें, श्रीहरी, कां न येसी ? ॥ ४० ॥
न समजत गजेंद्रें काय हें कार्य केलें ?
अढळपद ध्रुवातें काय जाणोन दिल्हें ? ।
दशविध हरि जन्में अंबरीषार्थ घेसी.
झडकरि गणिकेला स्वीय सायुज्य देशी. ॥ ४१ ॥
सकळ नृप पहातां पार्थसारथ्य केलें,
यदुपति तुज तेथें काय हातास आलें ? ।
क्षणभरि मजसाठीं येथपर्यंत येतां,
अभिनव पडलें, रे, थोर कोडें, अनंता. ॥ ४२ ॥
यदुपति तुजसाठीं मीच मासोण जालें;
अकथित कमठीच्या मीच पोटास आलें; ।
अति विकट वराहा मीच जालें वराही;
तदुपरि नरसिंहा होय मी नारसिंही. ॥ ४३ ॥
अभिनव तुज रामा मीच रामावतारीं;
प्रकृतहि तुजसाठीं भीमकाची कुमारी. ।
क्षणभरि मज, कृष्णा, आठव्या, नाठवीसी;
व्रजयुवतिसहस्रें अंतरीं सांठवीसी ॥ ४४ ॥
स्वकीयां भक्तांचे निरुपम महा वेड तुजला;
असे, हें, श्रीकृष्णा, अविदित असे काय मजला ? ॥
मदीय प्रारब्धें स्मरणहि फुकाचें तुज नव्हे,
कृपाळा, हे लागे अभिनव तुला कोठुन सवे ? ॥ ४५ ॥
पिता, माता, भ्राता, सखिनिवह वंचून, तुजला,
मुखें या विप्राच्या यथिल अवघा भेद दिधला; ।
अशी मी हे तूझी परम अपराधीणच असें,
न योजे हें, कृष्णा, अझुणि तुज पत्रोत्तर कसें? ॥ ४६ ॥
अति स्नेहाळें हे जनकजननी गहति उर्गीं,
भयें या बंधूच्या फिरति सुहृदें आजि अवघीं; ।

वृथा या एकांतीं सकळ सखिया गांजिति मला;
  अवस्था माझी हे यथिल समजे कोठुन तुला? ॥ ४७ ॥
सदा वेदाभ्यासी द्विजपति तुझा मार्ग चुकला?
  तुला नेतां मार्गीं गरुड अथवा काय थकला? ।
निषेधी हा किंवा हलधर तुझा सोदर तुला?
  कृपापारावारा, परम पडलें संकट मला. ॥ ४८ ॥

हरे कृष्णा, नारायण, नरहरे, आदिपुरुषा,
  तुझ्या तों पायांसीं वचन न वदे पापिणि मृषा. ।
प्रतापी हे राजे मिळति अवघे कुंडिनपुरीं;
  नृपव्याघ्रा, कां रे बससि उगला जाउनि घरीं? ॥ ४९ ॥
अवज्ञेनें बोलें कितियक हिणावून वचनें;
  अशा या बोलाचा अनुचित मनीं राग धरणें. ।
व्रजस्वामी, आम्ही कपट न पढों राजदुहिता.
  विलंबें या तूझ्या बहुत पडला जीव दुचिता. ॥ ५० ॥
तुझ्या या पायांसीं प्रथम सलगीनें वदतसें.
  मनामध्यें तूझ्या व्रजयुवति दाटींतहि धसे; ।
मसीं आतां, कृष्णा, तिळभरि दुजाभाव न धरीं.
  समीक्षाभिक्षेनें प्रणतजनसंभावन करीं. ॥ ५१ ॥
जिवें भावें कृष्णा, शरण तुज आलें यदुपती.
  न व्हावें हें हांसें म्हणुनि करितें तूज विनती. ।
तुझ्या वेडा लागे, सहज निजकर्तव्य विसरें.
  अकर्तव्याची हे प्रकृत पदवी ही अनुसरे. ॥ ५२ ॥
परित्याग स्त्रीचा कवण पुरुषार्थी नर करी?
  असें हें श्रीकृष्णा, अपयश शिरीं वीर न धरी. ।
उसासा हे टाकी, सुकृतरससारांश विघडे,
  अनेका हिंसाची सहज मुरकुंडी वरि पडे. ॥ ५३ ॥
अरण्यीं श्रीरामें अवगणुन सीतेस त्यजिलें,
  जगामध्यें कोणें समुचित असें त्यास म्हटिलें? ।

पदीं श्रीरामाच्या दृढतर महादोष विलगे;
  कसा या दोषाचा दशरथकुळा डाग न लगे ? ॥ ५४ ॥
सये, माझ्या दुःखें उपवन लता या दुखवती.
  पहा, हे पक्षी हा वदनगत चारा विसरती. ।
विलापें या माझ्या द्रवति बहु पाषाण, सखिये.
  शठांचा, हा बाई, मुकुटमणि अद्यापिहि न ये." ॥५५॥
इच्या वक्त्रांभोजापसुन सज वाग्बाण सुटती,
  मनीं श्रीकृष्णाचे अति तिखट जाऊन बसती ।
असे जाला तेणें क्षणभरि अति व्याकुळ हरी.
  प्रियेच्या आक्रंदें किमपि न सुचे ते असवरीं. ॥ ५६ ॥
कथा हे कृष्णाची सकळजगदानंदजननी,
  मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुमनीं; ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महादोष हरती,
  यदुत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ५७ ॥

इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरण-
काव्ये रुक्मिणीविलापो नाम षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

---

## सर्ग सातवा.

विदर्भाची कन्या, अति चतुर, लावण्यपुतळी;
  वियोगें कृष्णाच्या निशिदिवस जे हे तळमळी; ।
तयेची हे डावी अतिमृदुल बाहे फुरफुरी,
  शुभाशंसी तैसी तवुपरि लवे नेत्रशफरी. ॥ १ ॥

तों तीस नेत्रातिथि विप्र जाला, । किंवा तिचा प्राण फिरोन आला; ॥
भावार्थ हा केवळ भीमकीचा; । आकर्षिला नंदन देवकीचा. ॥ २ ॥
प्रसन्न त्याचा मुखचंद्र देखे, । तत्काळ चिंतातम दूर फांके. ॥
कदापि हा हर्ष न माय पोटीं; । विराजतें किंचित हास्य वोठीं. ॥ ३ ॥

तान्हेजल्यासन्मुख तोय आलें, । बुभुक्षिता भोजन हें मिळालें, ॥
अंधास आकस्मिक दृष्टि आली, । मृतास संजीवनसिद्धि जाली. ॥ ४ ॥

कीं होय चंद्रोदय हा चकोरा, । प्रसन्न वर्षागम येय मोरा; ॥
कीं वोळघे मेघ निदाघकाळीं, । मानी असें भीमकराजबाळी. ॥ ५ ॥

तत्काळ कृष्णार्पण देह केला, । तीचा अहंभाव गळोन गेला; ॥
अत्यंत निर्वासन चित्त जालें, । जेथील तेथें मन हें मुरालें. ॥ ६ ॥

निमग्न आनंदरसांत जाली, । सत्कार त्याचा विसरोन गेली. ॥
हे वेष्टिलीसे नृपकन्यकांनीं, । लागे तिचे विप्र म्हणोनि कानीं. ॥ ७ ॥

" जो आजि आहे पति द्वारकेचा, । यासारखा आजि उदार कैंचा ? ॥
हा वासवाचा हरि आजि भाऊ, । तूंही शचीची तरि होय जाऊ. ॥८॥

जें हें महादैवत दैवतांचें, । असें तसें जीवित जीवितांचें; ॥
तें दैवयोगें तुज सांपडावें; । निधान तूझें पदरीं पडावें. ॥ ९ ॥

सांगों नये कां तुजला भले गे ? । छत्तीसही हे गुण लाभले गे. ॥
अपूर्व हें गोत्र घटीत आहे. । बोलों नये हें; उगलीच राहें. ॥ १० ॥

तां भीमकी मज अनुग्रह थोर केला;
श्रीकृष्णदर्शनमहोत्सव दावियेला. ।
येथून हे सकळ निस्पृहवृत्ति जाली;
बेडी प्रपंचमय सर्व तुटोनि गेली. ॥ ११ ॥

वृत्तांत हा सकळ तूज निवेदिलाहे;
माझें प्रयोजन अतःपर काय आहे ? ।
आज्ञा मला त्वरित दे स्वगृहास जाया."
हें बोलतां वदतसे मग आदिमाया. ॥ १२ ॥

" अत्यंत बापा श्रमलास भारी, । स्वकीय हे वांचविली कुमारी. ॥
जामात हा श्रीपति आणियेला, । मदर्थ त्वां उत्कट यत्न केला. ॥ १३ ॥
उत्तीर्ण आतां तुज काय होऊं ? । प्राणेशदात्या तुज काय देऊं ? " ॥
बोलोन हे अंजाळि जोडियेला; । प्रणाममात्रें द्विज बोळवीला. ॥ १४ ॥

'त्रिभुवनपति दोघे रामकृष्णाख्य आले,'
नृपतिजवळि ऐसें दूत सांगों निघाले. ।
अभिनव हृदयीं हा थोर आनंद जाला.
अभिमुख मग त्याला सैन्य घेऊन गेला. ॥ १५ ॥

तदुपरि हरिपूजा हे यथायुक्त जाली.
प्रणति मग तयातें भूप साष्टांग घाली. ।
विनययुत उभा तो हात जोडून राहे.
विनउन नृहरीतें तो पुरामाजि बाहे. ॥ १६ ॥

"कळत कळत म्यां तों थोर अन्याय केला,
तदपि परम माझा हेतु तां पूरवीला. ।
सहज मज अनाथा नाथ तूं आजि होसी;
निजपदभजकांचा नित्य कैवार घेसी. ॥ १७ ॥

अलभ्य तूझा मज लाभ जाला. । पवित्र हा देश समस्त केला. ॥
यानंतरें या नगरांत यावें, । कृतार्थ कृष्णा, मज तां करावें." ॥ १८ ॥
त्यानंतरें सास्मित कृष्ण बोले, । " मार्गांल हीं लोक समस्त आले; ॥
पुरांत संमर्द बहूत जाला, । होयील कोठें अवकाश याला ? ॥ १९ ॥
याकारणें निश्चय हा करावा, । अंबालयासन्निध ठाव द्यावा. ॥
आणीकही हा यक हेतु आहे, । पुरांमधें तो शिशुपाळ राहे." ॥ २० ॥
भावार्थ याचा समजोन गेला, । राजा विदर्भेंद्र वदों निघाला. ॥
" अवश्य अंबालय आदरावें, । परंतु मार्गें तरि याच जावें. ॥ २१ ॥
स्थळीं स्थळीं सर्व उभ्या रहाती । पौरांगना, वाट तुझी पहाती. ॥
या कुंडिनाची रचना प्रसंगें । आलोकिजे किंचित हक्तरंगें." ॥ २२ ॥
विज्ञप्ति भूपें अनुरूप केली, । घडोन चित्तांतिल गोष्टि आली. ॥
रामाकडे कृष्ण तथापि पाहे, । तोही तया सम्मत देत आहे. ॥ २३ ॥
पुढें पुढें तो गजभार चाले, । त्याहून मागें रहवाळ आले. ।।
सर्वांत अग्रेसर भूप जाला; । हा द्वारकाधीश पुरांत नेला. ॥ २४ ॥
क्षणेकसा कृष्ण तटस्थ राहे, । त्या कुंडिनाचे रचनेस पाहे; ॥
कटाक्ष विक्षेप करी हरी तो, । पौरांगनांचीं हृदयें हरी तो. ॥ २५ ॥

धांवोनि येती कितियेक न्हातां, । बाळांस कोणी स्तनपान देतां; ॥
उगाळितां चंदन येति कोण्ही, । अर्धीच कोणी उकलून वेणी. ॥ २६ ॥

संभ्रांत अत्यंत कितेक जाल्या, । भूषा विपर्यास करून आल्या; ॥
घालून पायीं करकंकणांला, । पादांगदीं शोभविती करांला. ॥ २७ ॥

नाकीं बाळया, राखड्या कर्णदेशीं, । ताटंकातें गोविती केशपाशीं, ॥
देंडीं कंठे, बाजुबंदास कंठीं । लेती, माजी हार, नाईत पेटी. ॥ २८ ॥

मुखकमळें उटुनि कुंकुमानें, । नयनयुगें भरिजेति चंदनानें, ॥
अधर सजविताति अंजनानें, । कृतविपरीतदशा निरंजनानें. ॥ २९ ॥

म्हणेत " हा या समयास आला, । पूजाप्रसंगें मधुपर्क जाला; ॥
होणार हें काय असे कळेना, । दुर्बुद्धि रुक्मी सहसा वळेना. ॥ ३० ॥

दैवें मिळे हा यिज योग्य जोडा, । परंतु आहे अवकाश थोडा; ॥
हें आमचें पुण्य उभें रहावें, । दोघांजणां सत्वर ऐक्य व्हावें. ॥ ३१ ॥

हा कृष्ण काळा, अति गौर बाळा, । संयोग शोभेल अपूर्व यांला; ॥
रत्ना सुवर्णा जरि भेटि होते, । परस्परें कांति विशेष येते. " ॥ ३२ ॥

इत्यादि संवाद करीत नारी; । तटस्थ पाहेत पहा कुमारी; ॥
पुढें पुढें श्रीहरि चालियेला, । प्रासाद वैदर्भिक देखियेला. ॥ ३३ ॥

चढेत कोण्ही, उतरेत कोण्ही, । पडेत वाटेत गळोन लेणीं, ॥
सिंजारवें व्याकुळ सौध जालें, । निर्जीवही जीवदशेस आले. ॥ ३४ ॥

स्वरूपें कृष्णाच्या अविरत जिचें मानस रुधे,
तये वैदर्भीसी मग सहचरी येउनि वदे, ।
" महा रथ्यामार्गें अभिनव युवा जात असतां,
निजप्रासादाग्रीं चढति सकळा राजवनिता. ॥ ३५ ॥

न बोले कांहींही मुकुलितमुखी, कुंदरदना,
चमत्कारें बाळा झडकरि उठे मंदगमना; ।
निवारी सर्वांतें करकिसलयें वारिजमुखी,
तयेची हे हांसे पदर वदनीं लाउन सखी ॥ ३६ ॥

पहाया वैदर्भी मग उपरमाडीवरि चढे,
अनायासें प्रत्युद्गमनविधि किंवा तिस घडे. ।
करें छत्रच्छाया करुनि वदनीं चंद्रवदना
न्यहाळी कृष्णाचें मुखकमल सारंगनयना. ॥ ३७ ॥

समारंभे गेला मिरवत पुराबाहिर हरी,
न राहे पाहातां तदपि नृपमूर्धन्यकुमरी; ।
स्वरूपीं हा साक्षादनुभव महा होय जिजला,
अहो आला गेला म्हणुन म्हणणें काय तिजला ! ॥३८॥

अहो खासा राहे यदुतिलक अंबापरिसरीं,
अनुज्ञेनें सेनापति उतरती स्वस्वशिबिरीं. ।
विदर्भें सर्वांचें अतिशयित आतिथ्य करिजे,
पदीं श्रीकृष्णाचे दृढ परम हा भाव धरिजे. ॥ ३९ ॥

घालून सख्यें मग अंबिकेला, । राजा विदर्भेंद्र घरास आला; ॥
सक्रोध रुक्मी तंव फार जाला, । द्विजामधें वाक्य वदों निघाला.॥४०॥

जे जे पदार्थ उपयुक्त विवाहकर्मीं,
ते आणवी त्वरित राजकुमार रुक्मी; ।
जों ज्योतिषी त्वरित लग्नघडीस घाली,
तों सन्मुख प्रलयसूचय शिंक जाली. ॥ ४१ ॥

म्हणेत कोण्ही शुभलग्न पाहा, । म्हणेत कोण्ही उगलेच राहा; ॥
म्हणेत कोण्ही नवरी दिसेना, । कोण्हास कोण्ही मगहो पुसेना ! ॥ ४२ ॥

आयीकतां व्याकुळ फार जाली, । उठोन माडीवरि माय गेली; ॥
म्हणे तिला "चाल, विलंब जाला;। आली असे सन्निध लग्नवेळा."॥४३॥

प्रसुवचनविलासें होतसे त्रास तैसा,
अभिनव करिणीला अंकुशाघात जैसा; ।
तदुपरि जननीच्या ते गळां हात घाली,
अभिमत जनयित्री वाक्य बोलों निघाली. ॥ ४४ ॥

" उगी राहें आतां बहुत वदतां ओष्ठ सुकले,
नको बोलों कांहीं, अकथित मला ग्रंथ उकले. ।
अवो, तूं दैवाची ! प्रिय, परम अर्धांग हरिचें,
तुझ्या हातां आलें सहज निजसाम्राज्य घरिचें. ॥ ४५ ॥

तुम्हांस दोघांसर पाड आहे, । पूर्वींच हे गोष्टि कळोन राहे; ॥
येथें जर्यां हा चुकता विधाता, । येती तयाच्या अपकीर्ति हातां. ॥४६॥
माझ्या मनायोग्य घडोन आलें, । परंतु दुःखास्पद येक जालें; ॥
जाऊन तूं नांदसि सिंधुगर्भी । मी येकली राहिन ये विदर्भी ! ॥ ४७ ॥
मांगल आतां मज कोण जेऊं ? । कोणास मी उत्तर आजि देऊं ? ॥
वाटेस माझी करिसील खंती, । तूं लागसी आजिपसून तंती. ॥ ४८ ॥
कठीण आहे स्थिति सासुऱ्याची, । पडे मला गोष्टि तुझ्या जिवाची ॥
तूझे गुणीं न्यून कदापि नाहीं, । तथापि पाहें सिकऊंच कांहीं. ॥ ४९ ॥
घालाघाली घालिती नित्य सासा, । टाकूं बाई नेदिती हा उसासा; ॥
पोटागीची माय मी दूर जालें, । लागे आतां नांदणें त्याजखालें. ॥५०॥
प्राणेश्वराच्या अति मान्य माता । अलीकडे त्याहुन जाण आतां. ॥
तो सासरा साधु बहूत आहे, । आज्ञेंत त्याचे उगलीच राहें. ॥ ५१ ॥
असेत जे तूज बहूत जावा, । विरोध त्यांसी न करीत जावा; ॥
त्वां आपलीं आवरिजेत मूलें, । जे नित्य होती कलहास मूळें. ॥ ५२ ॥
ते स्वामिसेवा तुजला घडावी, । त्याची तुला आवडि आवडावी; ॥
त्याच्या मनासी मन मेळवावें, । त्वां नित्य त्याचे मिळणीं मिळावें. ॥५३॥
असे जरी तो प्रतिकूल तूसी, । तथापि राहें अनुकूल त्यासी; ॥
असेल गे पूर्विल पुण्यठेवा, । तरीच हा वल्लभ वश्य व्हावा ! ॥ ५४ ॥
घरामधें होतील सुष्टदुष्टें, । तथापि तूला अवघीं वरिष्टें; ॥
उगेच त्यांचे गुण नित्य घ्यावे, । ते बोलतां जाब कदा न द्यावे. ॥५५॥
टाकून बाई अभिमान द्यावा, । संसार हा गोड करून घ्यावा; ॥
मुखास येती जरि शब्द मोठे, । तूझ्या गुणांचें तरि मूळ तूटे. ॥ ५६ ॥
बोलोन जासी जरि वांकडेंसें, । पडल तूझें तुज सांकडेसें; ॥
येका तुझ्या या तरि गोड बोलें । ते वश्य होती, अवघींच कोल्हें ! ॥५७॥

संसार हा यद्यपि सज्ज आहे, । तथापि सांगें गुज येक पाहें; ॥
मिळोन जातें मन दंपतीचें । तरीच घेती सुख संपतीचें. ॥ ५८ ॥
प्रगल्भता येथुन आदरावी, । हे लोकलज्जा हृदयीं धरावी; ॥
लोकापवादास बहूत भ्यावें । टाकून चित्तांतुन पाप द्यावें. ॥ ५९ ॥
सर्वांपुढें सत्वर त्वां उठावें, । ते नीजल्या नंतर त्वां निजावें; ॥
आदासपर्यंतहि अन्न द्यावें, । त्यानंतरें भोजन त्वां करावें ॥ ६० ॥
त्वां वागतां पल्लव नीट घ्यावा, । पाचारिल्या मंजुळ जाब द्यावा. ॥
तूं खालती पाहुनि नित्य चालें । तूं बोलवील्याविण गे, न बोलें. ॥६१॥
लावीत जा कुंकुम नित्य भाळीं, । सौभाग्य सूचक सर्वकाळीं; ॥
घालीत जा कज्जळ नित्य डोळां, । सिकें बरा तोथिल सर्व मोळा. ॥६२॥
सदा शुचिष्मंत तुवां असावें, । सदा सतीसन्निध, गे बसावें. ॥
जे उंबऱ्याबाहिर पाय टाकी । ते आपला लौकिक काय झांकी ? ॥ ६३ ॥
घालीं गळां रत्नजडीत गांठी, । देऊं नको भ्रूयुगुळास गांठीं. ॥
प्रसन्नता हे वदनीं असावी, । तरीच लक्ष्मी सदनीं वसावी. ॥ ६४ ॥
सन्मान सर्वां वडिलांस द्यावा, । कुलीन हा शब्द म्हणोन घ्यावा; ॥
न घेंसि पैशून्य कदापि कानीं, । तरीच तूझें यश लोक वानी. ॥ ६५ ॥
तूं संकटीं हा निजधर्म राखें, । कदापि संसारसुखें न माखे; ॥
तत्काळ घालीं अतिथींस भिक्षा, । पतिव्रतांची तरि हेंच दीक्षा. ॥ ६६ ॥
त्वां सासुरां उत्तम नांदिजे ते, । पतिव्रतासाधन साधिजे तें; ॥
असी तुझी येइल कीर्ति जेव्हां, । मला महाभूषण होय तेव्हां. ॥ ६७ ॥

अये, ये लक्ष्मीची तिळभरिहि तृष्णा न धरिजे,
यिच्या त्वां या वेंचकरुनच यिची वृद्धि करिजे;
सुते, जों जों हातें करुन विहिरा हा उपसिजे,
पहा तों तों तेणें पुनरपि यथापूर्ण भरिजे. ॥ ६८ ॥

समस्तां भूतीं त्वां निरुपम दया नित्य धरिजे,
भुकेले, तान्हेले, शशिमुखि, विशेषें समजिजे. ।
विलासें लक्ष्मीच्या स्वसुहृदवर्गा विसरिजे
अनाथा दीनांचा निशिदिन परामर्ष करिजे. ॥ ६९ ॥

प्रपंचीं ये देवद्विजचरणनिष्ठा, तुज असो,
असत्याचा, बाई, तिळभरि घरीं संग्रह नसो. ।
असत्यें हें पाहें अखिलहि महापातक जडे,
जगांमध्यें तैसा सहज निज विश्वासहि उडे. ॥ ७० ॥

उपेक्षाबुद्धीनें विचर, चतुरे, संसृतिसुखीं
नको लागों देऊं किमपि, विमळे, पातक नखीं; ।
नको राहों देऊं परुषवचनोच्चारण मुखीं,
अये, या दुर्वादेंकरुन तुटती सर्वहि सखी. ॥ ७१ ॥

तुला ये स्वप्नींही क्षणभरि असत्संगति नको,
सदा या सत्संगें करुनच अहोरात्र उरको ! ।
अवो, ये संसारींहुन हळुहळू चित्त विरमे,
रमेच्या भर्तारीं तरिच उगलें जाउन रमे. ॥ ७२ ॥

मदें तारुण्याच्या कुळवति अहंकार न करीं,
विनीतें वैदर्भी पतिवचन हातावरि धरीं; ।
पतीची हे सेवा नीरुपम महा साधन तुझें,
कुळस्त्रीला बाई पतिविण नसे दैवत दुजें. ॥ ७३ ॥

तूं आजि रोडेजुन हाड होसी, । चिंतातपें फार सुकोन जाशी; ॥
अक्रोश अत्यंत करूं नये गे, । प्रणाम अंबेस करून ये, गे." ॥ ७४ ॥
हा तूज शिक्षाविधि मात्र केला, । सर्वांस बाई उपदेश जाला; ॥
वर्तोत ऐशाच समस्त मूली, । घरोघरीं मृण्मय जाण चूली ' ॥ ७५ ॥
बोले तिची ते तिजसी कुमारी, । " मोठ्या बळें येय पहा मुरारी; ॥
हा सर्व कारुण्य कटाक्ष तूझा । येथें नसे किंचित यत्न माझा. ॥ ७६ ॥
जें जें मला तूं सिकवीस कांहीं, । वर्तेन तैसी अनुमान नाहीं; ॥
तूं सर्व माते समजेसि तत्त्वं, । नसेत तूझीं वचनें कवित्वें. ॥ ७७ ॥
माते चमत्कार अपूर्व पाहें । जगामधें वर्तत एक आहे; ॥
मूर्धापुढें काढुनि ठेवियेला । तथापि नाहीं यश ये सुनेला. ॥ ७८ ॥
कल्पद्रु हा कल्पित मात्र देतो, । चिंतामणी चिंतित पूरवीतो; ॥
अकल्पितां चिंतित अर्थदाई । समर्थ लक्ष्मीपति शेषशायी. ॥ ७९ ॥

यदुपति-पदपद्मीं माय माहेर माझें,
मज निमित न व्हावें चित्त हें व्यग्र तूझें; ।
सहजच बळरामासारिखा पाठिराखा
म्हणउनि कवणाचा हा असे आजि लेखा॥ ? ८० ॥

दयानिधि श्रीहरि शीघ्र आला, । म्हणोन माझा वरि बोज जाला. ॥
होणार तो होउन अर्थ जातो, । मागें पुढें हा उपहास होतो. ॥ ८१ ॥
हे सर्व बाहेरिल सिद्धि जाली, । घरामधें यावरि गोष्टि आली. ॥
त्यां, काय, मातें उगळून द्यावें ? । कळेल ते यावरि त्वां करावें." ॥८२॥

तेव्हां ते मातेनें सकरुणकरें क्कारि धरिली,
तयेचे ते मांडीवरुन मग खालें उतरिली; ।
भुजिष्येच्या वक्रेंकरुन विनवी प्राणपतिला,
करावें देवीचें झडकरि तुम्हीं दर्शन यिला. ॥ ८३ ॥

सभेमध्यें राजा प्रकट मग हें बोलत असे,
"यिला तेथें नेणें परम मज आवश्यक दिसें. ।
न केल्या हें ऐसें नियतच कुळस्वामिनि खिजे,
अहो जाल्या आतां तुरुत नव तें विश्व उपजे." ॥८४॥

पित्याचें हें जालें वचन गरळप्राय तनया,
हरिद्रोहें मोठा उपजत पढे नित्य अनया; ।
हरिद्वेषें ज्याला जनकजननीद्रोहच घडे,
तयासाठीं कैसें विविध निरयद्वार उघडे ? ॥ ८५ ॥

कथा हे कृष्णाची सकळ जगदानंदजननी,
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।
प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महा दोष हरती;
यदुत्तंसप्रेमें विषयरस गोडी विसरती ॥ ८६ ॥

॥ इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये रुक्मिण्युपदेशो नाम सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

# सर्ग आठवा.

रुक्मी पित्यासन्मुख नीट बैसे, । निघेत वक्रांतुन शब्द तैसे; ॥
स्फुलिंग जे केवळ पावकाचें, । उठोति किंवा गण सायकांचे. ॥ १ ॥
" लग्नप्रसंगीं, जगदेकपाळा, । हें वोड ये काय यिच्या कपाळा ? ॥
देवी स्वदेशांतुन आजि जाते, । किंवा पुढें दर्शनही न देते? ॥ २ ॥
हा कृष्ण काळा अति कूडमंत्री । आसक्त जाली नरवीरपुत्री, ॥
बोला फुला गांठि पडेल जेव्हां, । तूं काय तेथें करिसील तेव्हां? ॥ ३ ॥
जळामधें लोटुनि कां न द्यावी? । हुताशनीं आहुति वा करावी. ॥
परंतु बाहेर न पाठवावी, । हे गोष्टि माझी यक आयकावी. ॥ ४ ॥
बोलाविल्यावांचुन येय पाहें, । कसा बकध्यान धरून राहे: ॥
कदापि यांचें मत हें कळेना; । अंबालयापासुनि हा ढळेना. ॥ ५ ॥
व्याघ्रापुढें आपण गाय जाते, । ते मागुती काय फिरोन येते? ॥
जे सांपडे व्याधकरीं कुरंगी, । मिळे कशी ते निजयूथसंगीं? ॥ ६ ॥
राजा म्हणे " निंदिसि आदिदेवा । जळो तुझी पातकरूप जिव्हा, ।
उगाच तूं जासिल नित्य गर्वें, । कर्में तुझीं हे विपरीत सर्वें. ॥ ७ ॥
असेस तूं तो पितृमातृहंता, । अद्यापि तूझी न जळे अहंता. ॥
दाऊं नको तोंड कदापि आतां, । लज्जा न वाटे मज जाब देतां? ॥ ८ ॥
तूं देवतादर्शनविघ्नकारी । होसी कसा पैत्र्यपदाधिकारी ? ॥
ये पुत्रहत्येस कदा न भीतों, । राडीकडे केवळ, रे, पहातों." ॥ ९ ॥
उठोन तो जाय, पडे विचारीं, । पाचारिले स्वीय मतानुसारी. ॥
मुख्यप्रधानाप्रति काय बोले । " हे आमही लोक अनाप्त जाले. ॥१०॥
घरामधें हा गृहभेद जाला, । प्रयत्न हा वाहत सर्व गेला. ॥
जेथें घरांतूनच आगि लागे । कोणापसीं जाउन कोण सांगे? ॥ ११ ॥
कृशोदरी, सुंदर, सोदरी ते । जे सांवळा गोवळ आदरीते, ॥
सुलोचना कांचनवेदिमध्या । नव्हेल कैसी मज आजि वध्या? ॥ १२ ॥

दैवें पुराबाहिर गोप राहे; । पुरांमधें हा शिशुपाळ आहे. ॥
आतां कपाटें अवघींच देऊं, । बळें तिला आणुन लग्न लाऊं. ॥ १३ ॥
सहाय हा मागध आजि आहे, । आम्हाकडे यावरि कोण पाहे ? ॥
जो नित्य खासा तरवार मारी, । तयापुढें काय टिके मुरारी ? " ॥ १४ ॥
विचार हा सांगति चार तेथें, । राजा बसे राजसभेस जेथें; ॥
विषाद निःसीम नृपास आला, । सेनापतीसी मग बोलियेला. ॥ १५ ॥
" सेना सर्व हे अवघीच ध्यावी, । अंबालया रुक्मिणि शीघ्र न्यावी ॥
सेनेमधें सावधरूप राहें, । ईला घरांतीलच शत्रु आहे. ॥ १६ ॥
आज्ञा तयानें बहु वंदियेली, । समग्र सेना मग सिद्ध केली. ॥
चहूंकडे दुंदुभिघोष गाजे, । सेनासमूहें दरबार साजे. ॥ १७ ॥
राजांगना वाट पहात होती, । फिरोन आली तंव तेच दूती. ॥
वृत्तांत जो तेथिल देखियेला, । तो चीजपाशींच निवेदियेला. ॥ १८ ॥
न माय हर्ष, मग माय कोठें । तीच्या रुख्यांचें उठऊन जोठें, ॥
येऊन तीच्या श्रवणास लागे, । हळूच बीजाक्षर मंत्र सांगे. ॥ १९ ॥

निजानंदें बाळा थबथबित निःसीम निथळे,
अस जाला तो तों अनुभव तिचा तीरुच कळे ।
त्रपेनें मातेसी प्रतिवचन किंचिन्न वदली
स्ववस्त्रप्रांतीं हे त्वरित शकुनग्रंथि दिधली. ॥ २० ॥

तत्काळ ते राजस सिद्ध जाली, । सुवर्ण वृंदावन सव्य घाली. ॥
सुदेवपत्नीयुत पूजियेला, । प्रणाम मातापितरांस केला. ॥ २१ ॥
दुर्वामयी मंगलपुष्पमाळा, । जे आणवी संवरणार्थ बाळा; ॥
करांबुजीं ते अतिगुप्त घेते, । आगुल्फ माता तिस बुंथि देते. ॥ २२ ॥
स्मरोन विश्वेश्वरमूर्ति तेथें, । सवत्स गोदान करून हातें, ॥
पायींच विश्वेश्वरि चालियेली, । दौवारिकीं दाटणि वारियेली. ॥ २३ ॥
जांबूनदच्छत्र शिरीं विराजे, । मुक्ताफळस्तोम जयास साजे. ॥
दोहींकडे चामरधारिणीचा । संचार मध्यें गजगामिनीचा. ॥ २४ ॥
अंतःपुराबहिर शीघ्र आली । सिकेत जीच्या कळहंस चाली. ॥
तथापि हे चंचळ दृष्टि पाहे, । अत्यंत दोलाचलवृत्ति आहे. ॥ २५ ॥

तों हा गृहासन्निध चैद्य आला, । होणार आहे मधुपर्क ज्याला, ॥
वार्ता जसी ये मग आयकीली, । तत्काळ बाळा उतरोन गेली. ॥ २६ ॥
हा घाबिरा राजकुमार जाला, । कपाट बंधा विसरोन गेला. ॥
सहाय जेथें भगवंत आहे, । तेथें कदा विघ्न शिरो न लाहे. ॥ २७ ॥
त्या पाठिसी चालति राजदारा, । कदापि ज्यांला न लगेच वारा. ॥
अधिष्टितीं सुंदरि पालख्यांला, । न देति वागों जन पारख्यांला. ॥२८॥
जे लोक खासे जवळील भारी, । आरूढ ते ज्यांवरि शस्त्रधारी. ॥
सभोंवते चालति ते शिपायी, । हे चाललीसे सुकुमार पायीं. ॥ २९ ॥
त्याभोंवता सज्ज पदातिफेरा । त्या भोंवता स्वारसमूहघेरा. ॥
त्याभोंवते हे रथ थाट चाले, । त्याभोंवते मत्त गजेंद्र काळे. ॥ ३० ॥
अपार सेनार्णव चालिलासे, । सेनाभरें शेषहि हालिलासे. ॥
महापुरद्वारहि टाकियेलें, । तत्काळ अंबालय पावियेलें. ॥ ३१ ॥
माता तिच्या तीजसमीप आल्या, । प्रणाम देवींस करूं निघाल्या. ॥
सुवासिनी दाटति त्या अपारा । करींत दासी बहु वेरझारा. ॥ ३२ ॥
शुभासनीं रुक्मिणि बैसलीसे । जे पीतपीतांबर नेसलीसे.
सख्या उभ्या राहति पृष्ठभागीं, । कुरंगनेत्रा, कुशला, कृशांगी. ॥३३॥
संभार देवीपदपूजनाचे । आणीत अध्यक्ष वधूजनाचे; ॥
आरंभिजे अर्चन अंबिकेचें; । सौभाग्य मोठें नृप कन्यकेचें. ॥ ३४ ॥
देवालय स्त्रीमय सर्व जालें, । स्त्री राज्य एकत्रच वा मिळालें. ॥
पुन्नाम कोठें श्रवणीं पडेना, । कोण्हीकडे मानस वावडेना. ॥ ३५ ॥
पदांबुज ध्यान मनांत केलें, । सुवर्णसिंहासन अर्पियेलें. ॥
सुगंधि पायावरि पाद्य घाली, । अनर्घ्य अर्घ्योदक सिद्धि जाली. ॥३६॥
समर्पिलीं आचमनीय तोयें, । संपादिलीं जे गुरुसंप्रदायें. ॥
मळापकर्षस्नपनीय वारी । निवेदिते त्यावरि राजकारी. ॥ ३७ ॥
सुवर्ण गंगालय आणवीलें, । सुगंधि उष्णोदक सारियलें. ॥
करांगुलीच्या अवकाश मार्गें, । त्या तोयधारा पडती निसर्गें. ॥ ३८ ॥

तदुपरि तिस अर्पी पीत चंडातकातें,
परम रुचिविशेषें लाजवी हाटकातें. ।

भरजर अवघी हे शाटिका नेसवीली,
धरुन करसरोजीं आसनीं बैसवीली. ॥ ३९ ॥
झळकति सज जेथें गोठ हे सोनियांचे,
विलसति जव जाणे हे तसे मोतियांचे; ।
हरित तिस असी हे कंचुली लेववीली,
मणिखचित नगांची पेटिका आणवीली. ॥ ४० ॥
उघडुन मग काढी जे अळंकार यत्नें,
वसति बहुत जेथें हे अमोलीक रत्नें. ।
तदुपरि तिस अर्पी ते यथास्थानदेशीं
पदयुग जननीचें आदरीजे जिवेंसी. ॥ ४१ ॥
कर्पूर, नीरांजन होय जेव्हां, । सहस्रघंटाध्वनि होति तेव्हां; ॥
सुवर्णपुष्पांजाळि वाहियेला, । प्रणाम साष्टांग तयेस केला. ॥ ४२ ॥
प्रदक्षिणा तीस करून आली; । पुढें उभी सन्मुख राहियेली. ॥
पुनःप्रणामांजाळि जोडियेला, । संपूर्ण पूजाविधि अर्पियेला. ॥ ४३ ॥
अहो, लोपामुद्राप्रभृति अनसूयावधि सती,
जयेच्या लक्षांशेंकरुन तुळने येत नसती; ।
अशी हे जे बाळा मुनिवरमहामुद्गलवधू,
वदे ते अंबेसी घवघवित जीचा मुखविधू. ॥ ४४ ॥
नृपाची हे कन्या पदयुग नमस्कारित असे.
मनीं हा आनर्ताधिप हरि इचे येउनि बसे. ।
भवानी, हा अस्मद्विधहृदयसंदेह तुरवीं,
जगन्माते आतां झटकरिं इचा हेतु पुरवीं. ॥ ४५ ॥
विनंतीनें जाली किमपि जगदंबा स्मितमुखी,
स्मितज्योत्स्नाजाळें निजनिलय जीचें लखलखी. ।
ऋषीचे पत्नीला नियत तदभिप्राय कळला.
म्हणे, " बाळे, तूझा सकळ मनिचा हेतु कळला."॥४६॥
भवानीचे कंठींहुन बकुलमाळा उपलिली.
इचे कंठीं घाली अतिमृदुळ जे हे मिरवली. ।

वहाती तन्माता त्वरित जंव घेऊन अभिधा,
अनुज्ञा अंबेची झडकरि निघे येउनि तदा. ॥ ४७ ॥
परोभागीं जो हा अतितत सभामंडप असे,
अहो, बाळा तेथें हळुच मग हे येउनि बसे. ।
चिरंटींचा नानाविधनिवह तेथें घनवटे;
कुमारींचा कोळाहळ बहळ तैसा मग उठे. ॥ ४८ ॥

तो घाबिरा होय भरोन धापे, । महाभयें ब्राह्मण फार कांपे. ॥
तो तांतडी धांवत वृद्ध आला. । म्हणे, "मुली, काय विलंब केला.॥४९॥

प्रसंग जाणोन न वर्तसी, गे. । असार कर्मींच प्रवर्तसी, गे. ॥
टाकून गोविंदपदारविंदा । आरंभिला हा नसताच धंदा. ॥ ५० ॥

अद्यापि चित्तावरि गोष्टि घ्यावी, । माया तुवां सोडुनि सर्व द्यावी. ॥
हे लाविल्यानें लिगटोन येते; । हे सांडिल्या दूर सुटोन जाते. ॥ ५१ ॥

स्वभाव तूझा बहु फार भोळा. । बाळे, विवेकांजन घालि डोळां. ॥
येथें उदासीनपणें रहातां । चढेल अद्वैत निधान हाता. ॥ ५२ ॥

पडेल पायांवरि दृष्टि जेव्हां, । कृतार्थ तूं होसिल जाण तेव्हां. ॥
भाग्यास तूझ्या तरि पार नाहीं, । फिटेल हे लोचन पारणाही. ॥ ५३ ॥

हे क्रोध, लोभ, मद, मत्सर बोळवावे. । वाचेकरून भगवद्गुण बोलवावे.॥
आशादिकां सहचरींस त्यजून, बाई, । तूं येकली त्वरित जाउनि लाग पायीं.५४

आणीकही परम विस्मय थोर जाला । तो क्षत्रियाधम नरेंद्रगृहास आला.॥
रुक्मी तयास मधुपर्क करीत आहे. । चाटीत तो दधि हताश तसाच राहे. ५५

नरपतिसमुदायीं नेणसी श्रीपतीला.
त्वरित करून जासी आपले व्युत्पतीला. ।
सहज नृप समाजामाजि जो देखणा, गे;
तदपि तुज तयाच्या सांगतों या खुणा, गे. ॥ ५६ ॥

मुररिपु वळखें जो कंद नीळया नभाचा,
उदय हृदयदेशीं होय तो कौस्तुभाचा, ।
परम विमळ जेथें वैजयंती विराजे,
त्वरित वरिं तयातें, सर्व टाकूनि राजे. ॥ ५७ ॥

ध्वजस्तंभीं ज्याचे खगपति सदा राहत असे,
भुजद्वंद्वीं तैसें अविरत गदा, चक्र विलसे, ।
शिरीं पिच्छें वाहे, कटितटिस पीतांबर धरी,
जसा हा लक्षावा यदुपति, जगन्नायक हरी. ॥ ५८ ॥

माता म्हणे, " नृपसुते, परतोन पाहें. ।
लोकांत हा विधि पुरातन, उक्त आहे. ॥
धाडीन मी मुळ दिवाळिस तूज, बाई. ।
हा प्राण होय मजला तुजवीण कायी? ॥ ५९ ॥

तो तों करील तुजला तळहातछाया,
माझी कसी मज सुटे परि आजि माया? ।
वृत्तांत दूरिल कसा मजला कळे, गे?
याकारणें परम हा जिव जाकळे, गे. ॥ ६० ॥

तूं आत्मजे, मज मनांतुन मोकलीसी.
जाऊं कसी स्वसदना परि येकलीसी ? ।
ये कातरींत जिव आजि पडोन राहे.
'माते' म्हणोन तुजवांचुन कोण बाहे ? " ॥ ६१ ॥

हें आयकोन पृथिवीपुरुहूतपुत्री
कोमेजली विकचपद्मपलाशनेत्री. ।
बाहेर ये तदपि धीर धरून बाळा.
टाकी पदें हळुच कोमळ चारुशीला. ॥ ६२ ॥

दोहीं करीं सहचरीस धरून चाले.
चालेत वीर अतिदूर धरून भाले. ।
दाटेत त्या निजसमीप अनेक दासी,
ज्या सर्वदा वसति केवळ तीजपासीं. ॥ ६३ ॥

ते भीमकी सकळलोकमनोभिरामा,
वैकुंठनाथपदपंकजबद्धकामा, ।
सौंदर्यसाररसनिर्मित मूर्ति जीची,
उत्कृष्टता परम याहुन काय तीची? ॥ ६४ ॥

वक्त्रेंदु हा सहज सिंधु सुधारसाचा.
याचा धरी नियत इंदु उधार साचा. ।
आहे असाच बहुधा अपवाद लोकीं.
हा अन्यथा हरिणलांछन कां कलंकी ? ॥ ६५ ॥

अत्यंत निर्मळ, अमोलिक, ज्या अभुक्ता,
सीमंतसीमपदवीस बसेत मुक्ता, ।
साजे वरा बिजवरा तिजला ललाटीं.
येकावळीयुत मनोहर हार कंठीं. ॥ ६६ ॥

कृशोदरी, कुंडलमंडितेक्षणा,
शुचिस्मिता, सुंदरि जे सुलक्षणा. ।
जे पक्वबिंबीफळसोदराधरा,
ते होय वीरां मग दृष्टिगोचरा. ॥ ६७ ॥

वारून वामकरजीं अलकांस, बाळा;
तैसें अपांगविशिखीं अपरां नृपाला; ।
आलोकिते सभय सादर अच्युतातें.
सव्रीड साचिवदना, पुरुषोत्तमातें. ॥ ६८ ॥

तें सांवळें, सगुण ब्रह्म कृपाकटाक्षीं.
सस्मेर तन्मुखसरोरुह हें अवेक्षी. ।
दृष्टीस दृष्टि जंव नीट मिळोन गेली,
ते भीमकी हळुच त्याजसमीप आली. ॥ ६९ ॥

कल्पद्रुमाजवळि जंगम कल्पवल्ली
कीं येय हे हळुच चालत पायचाली. ।
कीं चातकप्रणयिनीच निदाघ तप्ता
धांवोन ये नवघनाभिमुख तृषार्ता ! ॥ ७० ॥

हे भीमकी सहचरींसहित त्रिवेणी;
प्रत्यक्ष हा वटमहीरुह चक्रपाणी. ।
जेणें सुटे सहज हा भवबंध, राया;
तो तीर्थराज प्रकटे जग उद्धराया. ॥ ७१ ॥

चतुर्भुज श्यामळरूपधारी,
जो शंखचक्राब्ज गदा उभारी, ।
उभा असे जो रणभूमिभागीं,
घेऊनियां चंदनऊटि अंगीं. ॥ ७२ ॥

कंठस्थळीं कौस्तुभ दिव्य भासे
मुखेंदुसानुग्रह मंद हांसे ।
उत्फुल्लकंजोपमनेत्र दोन्ही
ते कुंडलें हो झळकेति कानीं. ॥ ७३ ॥

धम्मिल्ल शोभे मृदु कुंडलांचा;
संवेष्टिला हार असे फुलांचा. ।
किरीट माथां जडित प्रकाशे.
रत्नावतंसद्युति हे विकासे. ॥ ७४ ॥

पीतांबराचें परिधान साजे, । कटिप्रदेशीं रशना विराजे, ॥
त्या किंकिणीचा समुदाय वाजे, । वांकी पदीं तोडरयुग्म गाजे. ॥ ७५ ॥

पहातसे विश्वमनोभिरामा. । कदा न पावेच विराम रामा. ॥
जो हारि हा दुर्लभ योगियांला । प्रत्यक्ष तो दर्शन लाभ झाला. ॥७६॥

मिळे शशांकास अहो विशाखा; । किंवा अशोका सहकारशाखा; ॥
हे साधकासन्निध सिद्धि आली, । किंवा विरक्तान्वित शांति जाली.॥७७॥

जाला इला चरणदर्शनलाभ जेव्हां, ।
प्रेमार्द्र लोचन यदूद्वह होय तेव्हां. ॥
तिर्यङ्मुखी सभय लज्जित फार जाली. ।
कृष्णास ते नमनपूर्वक माळ घाली ॥ ७८ ॥

न देखे वैदर्भी जवळिसखियांतें सुनयना;
नवोढत्वें लाजे, किमपि परते हंसगमना; ।
जयाचें हें ईणें सहज फिरतां चित्त हरिलें,
तया या श्रीरंगें त्वरित पदरीं तीस धरिलें. ॥ ७९ ॥

कपोळीं बाळेच्या अपरिचित रोमांच उठती.
तयेच्या चोळीचे सकळ जवदाणे उतटती. ।

गळां दाटे भारी, सहज सलिलें नेत्र भरले,
महर्षांचें घर्मोदकण मुखचंद्रीं उमटले. ‖ ८० ‖
वियोगें कृष्णाच्या अनवरत तापत्रय धरी
हृदीं आनंदाचे अतिशयित ते मज्जन करी. ।
निवाडे स्वामीच्या चरणनलिनातें अनुसरे. ।
तयेच्या क्लेशांचा पृथुतर कसा भार नुतरे ? ‖ ८१ ‖
प्रतापें श्रीकृष्णें त्वरित हरिली प्राणदयिता
मिळाल्या तेथेंही सकल सुर दिक्पालवनिता. ।
तया त्या दोघांतें विविध कुरवंडीम करिती.
प्रणामांतीं ज्याला घडति निज नीराजन रिती. ‖ ८२ ‖
विनीतत्वें ब्रह्मादिक सकळ बद्धांजळि उभे,
प्रभावें गर्जेत प्रमुदित महा यादव शुभें; ।
पहाया हे येती अगणित वसिष्ठादिक मुनी
जयांची हे जाली अतिशयित दाटी प्रणमनीं. ‖ ८३ ‖
भुकेला भक्तीचा हरुन तिजला होय विजयी.
धरावी हे याची त्वरित बरवी मूर्ति हृदयीं. ।
निजांभक्तांसाठीं यदुपति कसा धांवत असे
त्रिलोकी मध्ये ये सदन दुसरा याहून नसे. ‖ ८४ ‖
जगामध्यें जेणें अनवरत याचें म्हणविलें,
निजप्रामीसाठीं अतिविनय याला विनविलें; ।
मनीं, ध्यानीं, स्वप्नीं, निशिदिवस जेणें निरखिला
तयाचा हा शौरी नियतच अहो होय विकला. ‖ ८५ ‖
सखा हा दीनांचा, पतितनिवहोद्धारक महा;
अनाथांचा नाथ, प्रणतजन बंधूत्तम पहा; ।
विसांवा श्रांताचा, जनकजननी हाच भजका;
करीना हे कैसी यदुतिलक संसारसुटका ? ‖ ८६ ‖
कथा हे कृष्णाची सकळ जगदानंदजननी
मनोभावें ईचें श्रवण करिजे नित्य सुजनीं. ।

प्रसंगें श्रोत्यांचे सकळहि महादोष हरती;
यदूत्तंसप्रेमें विषयरसगोडी विसरती. ॥ ८७ ॥

स्वस्यंदनीं वाहुन राजकन्या,
तो वाजवी श्रीपति पांचजन्या. ।
त्या वीरवृंदातुन जाय तैसा,
शृगालसंघातुन सिंह जैसा. ॥ ८८ ॥

॥ इति श्रीमद्भगवद्भक्तपदानुरक्तकविसामराजविरचिते रुक्मिणीहरणकाव्ये रुक्मिणीहरणोन्नाम अष्टमः सर्गः ॥

शके १६६६

समाप्त.

# सामराजकविविरचित रुक्मिणीहरण.

## टीपा व स्पष्टीकरण.

### सर्ग पहिला.

**पृष्ठ१. श्लोक १.** 'उपजाति;' इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा यांच्या मिश्रणानें उपजाति वृत्त बनतें. **कल्पद्रुमकाननांचे सिंधु;** कल्पवृक्षांचीं असंख्य अरण्यें. 'सिंधु' शब्द केवळ बाहुल्य दाखवितो. **विघ्न;** विघ्नें. प्रस्तुत काव्यांत वृत्तसुखास्तव ऱ्हस्वदीर्घ, मात्रा वगैरेंची पुष्कळ ओढाताण केलेली दृष्टीस पडते. **कवित्वजाती;** काव्यप्रकार. **श्लोक २.** 'इंद्रवज्रा.' **घेय;** घेते, घेई. **चरण २** ब्रह्मदेवानें आपली कन्या सरस्वती इच्यापासूनच हें अखिल जग निर्माण केल्यामुळें, तिच्या योगानेंच तो प्रपंची, संसारी, झाला असा भाव. **तीचे;** वृत्तसुखास्तव 'ती' दीर्घ घातली आहे. 'ती' ऱ्हस्व घातल्यास 'उपजाति' वृत्त होईल. **श्लोक ३. लाविं कांसे;** कांसेला लाव; ज्ञानरूपी दुग्धाचें प्राशन करीत. **चरण ४**—तुझा आधार घेऊन तुझ्या मागोमाग येऊन ज्ञान साध्य करून घेईन. **श्लोक ४. अससील;** आहेस; भविष्यकाळाचा वर्तमानकाळीं उपयोग. **हें पांगुळें;** हा दीनदुबळा. नपुंसकलिंगीरूप दुर्बलता दाखवून मनांत दया उत्पन्न करितें. **पोटीं वागविणें;** एखाद्याला सतत आपल्याबरोबर वागवून त्याची काळजी वाहणें. **द्रौपदीचा साहकारी;** वस्त्रहरणादि अनेक प्रसंगीं भगवान् श्रीकृष्णांनीं द्रौपदीची लाज राखल्याचें वर्णन भारतांत अनेकदां आलेलें आहे.

**श्लोक ५. तां;** त्वां, तूं. 'तां' हें द्वितीय पुरुषी सर्वनाम सामराजानें अनेकदां वापरलें आहे. **धुरूचा;** ध्रुवाचा. ध्रुव हा उत्तानपाद राजाचा मुलगा. हा बालवयांत प्रेमानें आपल्या वडिलांच्या मांडीवर बसला असतां त्याची सावत्र आई सुरुचि इनें त्याला लत्ताप्रहार करून राजापासून दूर केलें व त्याला दुरुत्तरें बोलली. यामुळें फार वाईट वाटून तो अरण्यांत

परमेश्वरास भेटण्यास गेला. श्रीविष्णूनीं त्याला त्याची अढळ भक्ति पाहून दर्शन दिलें, व आकाशांत अढळपद दिलें. हाच आपल्याला दिसणारा ध्रुवाचा तारा होय. चरण २–गुरूचा, सांदीपनीचा. सांदीपनी हा कृष्ण व बलराम यांचा गुरु. याच्या मुलाला पंचजन नांवाच्या राक्षसानें समुद्रांत कोंडून ठेविलें होतें. तो आपल्याला परत मिळवून द्यावा ही गुरुदक्षिणा सांदीपनीनें कृष्णाजवळ मागितल्यावरून कृष्णानें त्या राक्षसाचा वध करून गुरुपुत्राची मुक्तता केली, अशी विष्णुपुराणांत कथा आहे. चरण ३–गजेंद्र. हाहा आणि हूहू हे दोन गंधर्व देवल ऋषींच्या शापामुळें अनुक्रमें एक त्रिकूट पर्वतावर गज व दुसरा सरोवरांत नक्र असे झाले होते. गजेंद्र तृषार्त होऊन सरोवरावर पाणी पिण्याकरितां आला असतां त्याला नक्रानें पाण्यांत ओढलें. त्यावेळीं गजेंद्राच्या धाव्याने प्रसन्न होऊन श्रीकृष्णानें त्याची सुटका केली, अशी कथा आहे. उपेंद्र; विष्णु; इंद्राचा धाकटा भाऊ. श्लोक ६. कृपासागर; दयेचा समुद्र. दुरदृष्ट; अदृष्ट, दैव. श्लोक ८. चरण ३।४–तूं मला संसाराच्या बेडींतून मुक्त तरी कर, किंवा दीनांचें रक्षण करण्याची प्रतिज्ञा तरी सोडून दे.

श्लोक ९. असेत; असती, आहेत. 'स्फुरेत' 'करेत' वगैरे तृतीय पुरुषीं वर्तमानकाळाचीं अनेकवचनीं रूपें या कवींत अनेकदां आलेलीं आहेत. वोंटी पसरणें; पदर पसरून याचना करणें. मागें, मी मागतों. या क्रियापदाचें कर्म अध्याहृत घ्यावें. 'क्षमा मागें'. बेडीं; 'पांगुळें' (श्लोक. ८) वरील टीप पहा. तूझे; तुझे. 'तु' ऱ्हस्व असूनही चाललें असतें. इंद्रवज्राच्या ऐवजीं उपेंद्रवज्राचा चरण झाला असता येवढेंच. पण तेवढ्यानें हा ऱ्हस्वदीर्घाचा दोष टळला असता. अशा प्रकारचे ऱ्हस्व दीर्घाचे दोष या काव्यांत अनेक आहेत. या श्लोकाच्या शेवटच्या दोन चरणांत 'प्रश्नालंकार' आहे. बोलणारा जेव्हां अशा रीतीनें प्रश्न करितो कीं त्याचें उत्तर काय येणार हें उघड ठाऊक असतें किंवा तेंच उत्तर दिल्याशिवाय गत्यंतर नसतें, तेव्हां त्या ठिकाणीं 'प्रश्नालंकार' होतो. श्लोक १०. अजामिळ; हा कनोज, प्राचीन 'कान्यकुब्ज,' देशांतील एक विद्वान् अग्निहोत्री ब्राह्मण. याचें एका शूद्रस्त्रीवर प्रेम बसून तिच्यापासून याला दहा मुलें झालीं. शेवटचा मुलगा 'नारायण' या नांवाचा होता.

त्यानें त्याला अंतकालसमयीं पुत्रस्नेहानें 'नारायण' म्हणून सहज हांक मारिली. पुत्राच्या निमित्तानें कां होईना, पण अंतकालीं त्याच्या मुखांतून परमेश्वराचें नांव आलें म्हणून विष्णुदूत त्यांस वैकुंठास नेण्यास आले. इकडे हा महापातकी म्हणून यमदूत त्याला अगोदरच घेऊन चालले होते; पण विष्णुदूतांनीं त्याला सोडविलें. यानंतर अजामिळाला पश्चात्ताप होऊन, त्यानें आपलें अवशिष्ट आयुष्य गंगातीरीं भगवच्चिंतनांत घालविलें, व शेवटीं उत्तम लोकाची प्राप्ति करून घेतली. **पावन करणें**; पापमुक्त करणें. **व्याध**; ही कथा 'शिवलीलामृतांत' आहे. एक गरीब व्याध रानांत बेलाच्या झाडावर सावजाची पाळत राखण्याकरितां बसला असतां, त्या झाडाचीं पानें त्याच्या दृष्टीआड येऊं लागलीं. त्यानें तीं तोडून खालीं टाकिलीं व त्या वृक्षाखालींच शिवलिंग असल्यामुळें त्यावर तीं पडलीं. तेवढ्यानें भोळा सांब प्रसन्न त्यानें होऊन व्याधाचा उद्धार केला. **गणिका**; पिंगला. ही मिथिला नगरींत राहणारी एक वेश्या होती. हिला कांहीं कारणानें एकें दिवशीं विरक्ति उत्पन्न झाली, व तेव्हांपासून ती परमात्मा परमेश्वरच आपला पति असें समजून राहिली. तिनें आपला निंद्य व्यवहार सोडून दिला व ती आत्मरूपीं रममाण झाली. **श्लोक ११. खरदूषण**; खर हा रावणाचा सावत्र भाऊ व दूषण हा रावणाचा सेनापति. या दोन्ही दैत्यांना रामानें ठार मारिलें. **बिभीषण**. रावणाचा भाऊ. **चरण ३, ४**—यांतील दोन्ही कथा महाभारतांतील आहेत. १ अर्जुनाचें सारथ्य करीत असतां श्रीकृष्णाला आपल्या भक्ताचे घोडे धुवावे लागत. २ श्रीकृष्ण द्रौपदीच्या धाव्याला धांवल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. **श्लोक १२. चरण १.** अन्वय; अजामिळ इत्यादिक अनेक उद्धरीसी. **अंतरेति**; अंतरतात, तुझ्या चरणकमलांस मुकतात. **श्लोक १३. आयुःपयाचा**; आयुष्यरूपी दुधाचा. **काळबिडाल**; काळरूपी बिडाल म्हणजे मांजर. चरण १ व २ यामध्यें 'रूपकालंकार' फार सुंदर साधला आहे. उपमेय व उपमान यांच्यामध्यें अभेद आहे असें मानून वर्णन केलेलें असतें तेव्हां 'रूपक' होतें. **त्वद्योग**; तुझा योग. तुझ्याभेटीचा योग. **या समयांत**; या वेळीं, या समयाला. **श्लोक १५. मोहजाळीं**; मायेच्या योगानें संसारांत उत्पन्न होणाऱ्या मोहाच्या जाळ्यांत. **चरण २**—सकाम कर्में हातून

घडत असल्यामुळें मला तीं जन्ममरणापासून मुक्त होऊं देत नाहींत; त्यांच्यामुळें मी संसाराशीं अधिक अधिक निगडित होतों. **वासनाबंध;** वासनेचा बंध. निष्काम कर्म घडत नाहीं हा अभिप्राय. **जन्मावळी;** (जन्म+आवळी. आवली=पंक्ती.) नानाप्रकारच्या जन्मांचा फेरा. **चरण ४;** जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होत नाहीं हा भाव. **श्लोक १६. वोढी** ( चरण १ ) ओढणें, पार पाडणें. **वोढी** (चरण२); ओढ. समुद्राप्रमाणें संसाराला ओढ असते; त्यांत वारंवार संकटें उत्पन्न होतात, व तो तरून जाण्यास कठीण पडते. **श्लोक १७. येथें;** यासंसारांत. **महार्घ;** महाग, दुष्प्राप्य. **परमार्थ;** ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान. **चरण ३ व ४**—संसारांत विषयसुखांत मन गुंतून गेल्यामुळें आत्मज्ञान पारखें होते व विचार नाहींसा होतो. चरण ४ मध्यें 'पर्यायोक्त' अलंकार आहे. उजू व सरळ वर्णन न करितां तीच गोष्ट पर्यायानें सांगतात तेथें 'पर्यायोक्त' अलकार होतो. **श्लोक. १८.** या श्लोकांत 'तृष्णा' किंवा 'वासना' यावर पिशाचीचा आरोप करून फार सुंदर रूपक साधलें आहे. **तृष्णापिशाची;** वासनारूपी डाकिनी. **वाढे;** प्रबल होते. **चरण ४.** वासनाडाकिनीनें सर्व विश्व व्यापून टाकिलें आहे. **श्लोक १९. पदानुसंधान;** तुझ्या पदकमलावरचें लक्ष. **सजेना;** जमेना. **चरण ३ व ४**—प्रपंचरूपी सर्प निवृत्तीला दंश करीत असतां ती मला कशी पचणार ? प्रपंचांत माझें मन सतत गुंतून राहिल्यामुळें त्या ठिकाणीं वैराग्याचें बीं रुजत नाहीं हा भाव. चवथ्या चरणांत 'रूपक' अलंकार आहे. **श्लोक २०. क्रोधचांडाळ;** क्रोध हाच कोणी चांडाळ. **चरण १ व २**—रूपकालंकार. **श्लोक २१. स्थावरजंगमाचा,** चराचर जगताचा. **भुजंगमाचा;** ( १ ) महासर्प जो शेष त्याचा. याच्यावर श्रीविष्णु शयन करितात. ( २ ) कालियामर्दनाच्या कथेचाही उल्लेख असेल. यमुनेच्या डोहांत कालिया नांवाचा एक विषारी महासर्प रहात असे. त्याच्यापासून ब्रजवासी गोपांना फार त्रास होई. त्याचा भगवान् श्रीकृष्णानीं पराजय केला अशी कथा आहे. **श्लोक २२. चरितें विचित्रें;** जुन्या मराठींत नामाच्या वचनाप्रमाणें विशेषणाचें रूप बदलतें; हल्लींच्या मराठींत बदलत नाहीं. हल्लीं आपण "विचित्र चरितें" असेंच म्हणूं. **इळा न वसे रिकामें,** इळा, जिभेला, स्वस्थ बसवत नाहीं.

'वसे' हें रूप मूलभेदी असतांना त्याचा शक्यभेदासारखा उपयोग केला आहे. वसे; बसवते.

पृष्ठ ३ श्लोक २३. परापवादें; दुसऱ्याच्या निंदेनें. महानृतानें; अत्यंत असत्य भाषणानें. श्लोक २४. चरण १—तुझ्या स्वरूपाचें यथार्थ आकलन न झाल्यामुळें सर्व शास्त्रें मौन धारण करतात. शुक; भगवान् व्यासांना घृताची अप्सरेपासून झालेला मुलगा. हा मुलगा उपजत ज्ञानी असून महानिग्रही व योगी होता. याच्या योगसाधनानें इंद्रास भय वाटून त्यानें रंभा नांवाच्या अप्सरेला त्याला योगभ्रष्ट करण्याकरितां पाठविलें, पण तिला निराश होऊन परत यावें लागलें. चरण २—शुकादिकांसारख्या महाज्ञान्यांना सुद्धां तुझ्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान होत नाहीं. श्लोक २५. कथा बांधणें; पद्यमय रचनेंत चरित्र किंवा कथा लिहिणें. ईस; या कथेच्या रचनेला. श्लोक २६. जे; जी रुक्मिणीस्वयंवराची कथा. विस्तारिली; विस्तार करून लिहिली. पुरुषीं पुराणीं; प्राचीन कवींनीं. श्लोक २७. त्वद्वर्णनीं; तुझें वर्णन करीत असतां. विवेकवीचि, विचारतरंग. वंचलासे; वंचिला जातो, फसतो. श्लोक २९. निरंजन; निर्विकल्प, शुद्ध असा परमेश्वर. ३०. भीमकी, भीमक राजाची कन्या रुक्मिणी. नव्हसी; न होसी. वर पंगतीचा; चरण ३—वरकांती वरपांगी. वरपंगतीचा (चरण ४); वराच्या पंक्तीचा. श्लोक ३१. निजसोयरा; आपला नातेवाईक, प्रेमळ मित्र. अवतारधारी; अवतार धारण करणारें. हें ब्रह्म; परमात्मा परमेश्वर, श्रीहरि. श्लोक ३३. परीक्षिती; अभिमन्यूचा मुलगा व अर्जुनाचा नातू. सुधांशु; चंद्र. चरण २—ज्याची कीर्ति चंद्राच्या कीर्तीस कसोटीला लावण्यासारखी होती; चंद्राच्या कीर्तीची परीक्षा करण्यासारखी होती. सारांश तो चंद्रापेक्षां कीर्तिमान् होता. शुक; यानें परीक्षितीला भागवत सांगितलें. श्लोक ३४ द्वैपायन; व्यासाचा मुलगा. 'द्वैपायन हें वास्तविक व्यासाचें नांव असून तें शुकाला उद्देशून योजिलें आहे. योगिवर; योग्यांमध्येश्रेष्ठ. द्विजेंद्र; ब्राह्मणश्रेष्ठ. सर्वकथासमुद्र; सर्व कथांचा सागर, ज्याला सर्व कथा माहीत आहेत असा. मनोविकार, कामक्रोधादि मनाचे सहा विकार. श्लोक ३५. कथारस; भगवत्कथारूपी अमृत. गोरसादिकांनीं मन विटतें,

पण कथामृतानें मन केव्हांही विटत नाहीं. **चरण ४**–ही कथा ऐकून आपलें शंकासमाधान कां करून घेऊं नये. पुढील श्लोकांत शंका निवेदन केल्या आहेत. **श्लोक ३६. देववर**; देवश्रेष्ठ श्रीकृष्ण. **वरोरु**; सुंदर स्त्री. **द्वारवती**, द्वारावती, द्वारका. **चरण ३–सावरीतें**; 'सावरी तें' अशीं निरनिराळीं पदें पाहिजेत. **अर्थः**—('तें' या ठिकाणीं मुळांत अनुस्वार आहे तो नको. 'तें'=ती रुक्मिणी.) श्रीकृष्णानें जें साहस केलें तें त्यानें कसें सावरलें; म्हणजे त्यांतून तो कसा पार पडला?

**पृष्ठ ४ श्लोक ३७. तो विप्र**; वरच्या श्लोकांत वर्णिलेला द्विजश्रेष्ठ शुक. **राक्षितीसी**;रक्षील अशी,रक्षण करणारी. **श्लोक ३८.साहित्यस्वारस्य**; साहित्य शास्त्रांतील मर्म किंवा उत्तम भाग. **साहित्य**; साहित्यशास्त्र. या शास्त्रांत काव्य, काव्यगुणदोष, रस, अलंकार इत्यादिकांचें विवेचन होतें. **चरण १**–ही कथा वर्णन करण्यांत सर्व साहित्यशास्त्रांतील सार खर्ची पडलें आहे. **वेंच (चरण)** १; खर्च होई.**(चरण)** २ निवडक भाग, उतारे.**रसाला**;रसाळ, सुरस. **श्लोक ३९. वोघ**; ओघ, प्रवाह. **चरण १ व २ अर्थः**–ज्या कृष्ण-कथेचा असा गंगेसारखा प्रवाह चालला आहे त्या ठिकाणीं 'हा काय म्हणजे हें सर्व शरीर कसें वाहून जाणार नाहीं? याला उत्तम गति कशी मिळणार नाहीं? **सावधानें**; सावधान, जागृत. विशेष्याच्या वचनाप्रमाणें विशेषणाचें रूप. **हरिसंन्निधानें**; हरिसंन्निध. मनांत हरीचें सांनिध्य ठेवून भक्तियुक्त अंतःकरणानें. **श्लोक ४०. विराटरूपी**; विराटाचें स्वरूप धारण केलेला. **चराचर**; जंगम व स्थावर. **देवईला**; देवकीला. प्राकृत भाषेंत क्, ग्, च्, ज्, त्, द्, प्, य्, व् हीं व्यंजनें शब्दाच्या मध्यें आलीं असतां प्रायः त्यांचा लोप होतो. जसें:—नकुल=णउल, सागर=साअरो. याच नियमानें जुन्या मराठींत 'देवई' असें रूप झालें. **श्लोक ४१. व्यक्तदशा**; दृश्य साकाररूपाची अवस्था. **चरण १**–निराकार अदृश्य अशा परमात्म्यानें सगुण साकाररूप धारण केलें. **कारागृह**; तुरुंग. श्रीकृष्ण परमात्म्यानें देवकीच्या उदरीं कारागृहांत जन्म घेतला या कथेला उद्देशून लिहिलें आहे. **अवतीर्ण झालें**; अवतार घेतला. **श्लोक ४२. कवाड**; (सं. कपाट), दरवाजा. **आगळा (चरण २)**; (स. अर्गला), अडसर. **श्लोक ४३. भूतसृष्टि**; उत्पन्न झालेलें अखिल चराचर जग. **पूतनास्तन्यविष**; पूतनेच्या स्तनांतील

विष. **पूतना**; कंसाची अनुचर राक्षसी. एका तरुण स्त्रीचें रूप धारण करून ती नंदाच्या घरांत गेली व कृष्णाला मांडीवर घेऊन पाजूं लागली. स्तनांत दुधाच्या ऐवजीं विष होतें. हें जाणून कृष्णानें विष प्राशन करून त्याबरोबर तिच्या प्राणांचेंही आकर्षण केलें, अशी कथा आहे. **बहु फार दृष्टी**; या ठिकाणीं 'बहु' व 'फार' या शब्दांनीं विनाकारण द्विरुक्ति झाली आहे. **श्लोक ४४.** वृत्त शिखरिणी. **श्वशुरसदनीं**; सासऱ्याच्या घरीं, समुद्रांत. (समुद्रमंथनसमयीं निघालेल्या चवदा रत्नांत विष्णुपत्नी लक्ष्मी ही होती, म्हणून समुद्र हा सासरा होतो.) **योगींद्र**; योग्यांमध्यें श्रेष्ठ, उत्तम प्रकारचा योगी. ('इंद्र' शब्द 'उत्तम', 'श्रेष्ठ' अशा अर्थीं वापरतात. जसें–नरेंद्र, गजेंद्र वगैरे.) **पयःपानीं**; दूध पाजण्याचें वेळीं. **करयुगुलतल्प**; (कर+युगल+तल्प); दोन हाताच्या अंथरुणावर. **श्लोक ४५. प्राग्जन्मीं**; पूर्वजन्मीं. **नंदगृहिणी**; नंदस्त्री यशोदा. **श्लोक ४६. घनरुचिर**; १ अतिशय सुंदर. २ मेघासारखी कांति आहे ज्याची असें. **निजच्छंदें**; स्वेच्छेनें. **चरण ४**–श्रीकृष्णाला उखळाला बांधून यशोदा घरांत गेली, इतक्यांत कृष्ण उखळ ओढीत ओढीत जवळच असलेल्या अर्जुनवृक्षाकडे गेला. त्यांना त्याचा स्पर्श होतांच ते उन्मळून पडले. नारदमुनीच्या शापानें वृक्षरूप झालेल्या कुबेरपुत्रांचा अशा रीतीनें उद्धार झाला. **श्लोक ४७. यदुदरदरी-माजि**; ज्याच्या पोटाच्या आंतील (विशाल) भागांत. **चरण २**–त्या ब्रह्मस्वरूपाचें वर्णन वेदांनासुद्धां करवत नाहीं. **व्रजकुळीं**; गोकुळांत.

**पृष्ठ ५. श्लोक ४८. चरण १**–अर्थः—निर्गुण निराकार परमात्मा असून त्यानें सगुण लीला धारण केल्या असा अर्थ. **प्रत्यह**; दररोज. **माती** (चरण ३); मावती. **श्लोक ४९. श्यामलरूपधारी**; श्यामरूप, सांवळें रूप धारण करणारा. **सवेत्रवंशीकर**; हातांत काठी व वेणु असलेला. **श्लोक ५०.** (**कृत्यस्त्य?**). **श्लोक ५१. चरण १** अर्थः–श्रीकृष्ण परमात्मा वास्तविक खाण्यापिण्याविषयीं उदास असतांना आपल्याबरोबर शिदोरी बाळगीत असे. **कंस**; हा कृष्णमाता देवकी इचा भाऊ व कृष्णाचा मामा. **श्लोक ५२. चाणूर**; हा कंसाच्या दरबारांतील एक मल्ल होता. याला मल्लयुद्धांत कृष्णानें ठार केलें. **श्लोक ५३. मायबापें**; देवकी व वसुदेव. **श्लोक ५४.** वृत्तः—शिखरिणी. **सकलजगदानंदजननी**; अखिल जगाला आनंद देणारी. **विसरति**; 'विरसति' ही छापण्याची चूक आहे.

# सर्ग दुसरा.

श्लोक २. **विदर्भदेशाधिप**; विदर्भदेशाचा (वऱ्हाड) राजा. **उदारधामा**; उदार आहे धाम म्हणजे तेज ज्याचें असा, तेजस्वी. **लोकपाल**; अष्टदिक्पाल. **श्लोक २. चरण २**–तो राजा कराच्या रूपानें प्रजेचें हेम ( सुवर्ण, द्रव्य ) हरण करीत नसे. **चरण ३–प्रजा**; १ मुलें, अपत्ये २ प्रजाजन; ('प्रजाः प्रजाः स्वा इव तंत्रायित्वा. शाकुंतल, अंक. ५ ) **निजान्वयीं**; आपल्या वंशांत.

**पृष्ठ ६. श्लोक ५. ऋणानुबंधें**; पूर्वजन्मींचा संबंध. **श्लोक ८. नव**; नच. **संबंध पाडणें**; संबंध ठेवणें. **श्लोक ९. ऊर पिकविणें**; अतिशय त्रास देणें, छळणें. **चिंतावली**; 'चिंतावणें' हें चिंता या नामापासून क्रियापद. चिंता उत्पन्न होणें. **श्लोक १२. देवी**; राणी, रुक्मिणीची आई. **श्लोक १४. कमलनिळये**; हे कमलांच्या ठायीं वास करणारे लक्ष्मी. **स्वसा तूं धेनूची**; समुद्रमंथनसमयीं जीं चवदा रत्नें बाहेर पडलीं त्यांत धेनु व लक्ष्मी हीं होतीं; यास्तव लक्ष्मी धेनूची बहीण असें म्हटलें आहे. **सिंधुदुहिता**; समुद्रकन्या. **चरण ४**–हे माते, मी गरीब बिचारी तुझी शक्ति, थोरवी काय ओळखणार ? **श्लोक १५. निर्वाहें**; कार्यक्षमता दाखवून. ( निर्वाह; कार्यक्षमता ). **चरण १**–तुझें भजन करणें हें माझें कर्तव्य; पण तें पार पाडण्याचें सामर्थ्य माझे अंगीं नाहीं. **चरण ३, ४**; तुला बालकें पुष्कळ आहेत, पण मला मात्र तुझ्यावांचून माता नाहीं हा भाव.

**पृष्ठ ७. श्लोक १६. प्रसंगें**; प्रसंगोपात्त; माझ्यावर हा प्रसंग आल्यानें. **मनोवाक्कायें**; मनानें, वाचेनें व शरीरानें. **प्रतिपद**; प्रत्येक पावलाला, प्रत्येक क्षणीं. **श्लोक २०. देवी**; भीमकीची आई. **रतीचें**; रतिमात्र, तिळमात्र. **श्लोक २१. चरण ३, ४**–ब्रह्मदेवानें सर्व सुंदर व रमणीय वस्तु ( उपमेस योग्य अशा वस्तु ) गोळा केल्या असाव्यात, व म्हणूनच त्याला ही सुंदर मूर्ति निर्माण करितां आली असावी. **श्लोक २२. आकारलें**; आकाराला आलें. **श्लोक २३. वर्ग्य**; बांधव, भाऊबंद. **मतीचें**; बुद्धिवान. **श्लोक २५. प्रत्यह**; दररोज.

**पृष्ठ ८. श्लोक २७. पुत्रें करिं**; पुत्राच्या हातून. **श्लोक २८. दारुणाची**; दुष्ट भावाची, रुक्मीची. **चरण ३**–ब्रह्मदेवानें मनुष्य प्राण्यांत

राहणारें प्रत्येक व्यंग तिच्यांतून नाहींसें केलें होतें. ती सर्वतोपरी अव्यंग होती हा भाव. श्लोक २९. चरण २—रुक्मीच्या दुरुक्ती तिला शल्यासारख्या बोंचत. चरण ४- ती त्याला कधींही उलटून किंवा त्याच्या विरुद्ध बोलत नसे. श्लोक ३०. केशवाचा गुण; कृष्णाचें परमेश्वरत्व, ब्रह्म. श्लोक ३३. चरण ३—द्वारकेच्या दिशेकडून वाहणारा वायू जर कृष्णाच्या अंगावरून येत असेल तर तोसुद्धां तिला प्रिय होता. श्लोक ३४. तत्प्रापक; श्रीकृष्णाची प्राप्ति करून देणारें. श्लोक ३५. कृशतनु; कृश आहे तनु म्ह० शरीर जीचें अशी 'तनु'.

पृष्ठ ९. श्लोक ३७. गेहवापी; घरांतील अंघोळीचा हौद; पुष्करणी. अनियत; भलत्या वेळीं, अनियमित वेळीं. चरण ३—डोक्यांत नीट चांगले अगवळ घालून केंस सुंदर न बांधतां कांहींतरी जाड्या भरड्या दोऱ्या ( नाडे ) घालून कसे तरी केंस बांधून फिरसी. अनाडे; हे अडाणी मुली. श्लोक ३८. मनिसि; मानिशी, मानतेस. अन्नभूली; अन्नद्वेष. श्लोक ४०. प्रतिगृहीं; प्रत्येक घरांत, घरोघरीं. श्लोक ४१. नवासिले; नवस केले. ( नामापासून क्रियापदाचें रूप. ) चरण ४—इच्या प्रकृतीला गुण देऊन म्हणजे आराम पाडून माझे सर्व संकल्प ( नवस ) फेडून घ्यावे. श्लोक ४२. विभूति;(चरण) ३—रक्षा, राख; (चरण) ४—ऐश्वर्य. ललाटीं विभूति करणें; कपाळाला अंगारा लावणें. श्लोक ४३ चरण ३—आपल्या विविध ( हृदयंगम ) कृत्यांनीं श्रीकृष्ण हांसला, म्हणजे त्यानें तिचें मन मोहून टाकलें. चित्तचैतन्य; चित्त हेच चैतन्य, किंवा प्राण, चित्तसर्वस्व.

पृष्ठ १०. श्लोक ४६. चरण ३—सर्पीण चावल्यामुळें लहरी येत आहेत कीं काय ? चरण ४—पापिणीचा पदर लागला काय ? म्ह० पापिणीचा पदरसंपर्क झाल्यामुळें तुझी अशी अवस्था झाली काय ? श्लोक ४८. चरण २—वास्तविक पाहतां 'कोणा शरीरीला ( पुरुषाला ) हें लावण्य लाधेल' असें पाहिजे. श्लोक ४९. त्रिवेणी; 'त्रिवेणीं' असें पाहिजे; गंगा, यमुना, सरस्वति यांच्या संगमामध्यें. तुझ्या प्राप्तीकरितां प्रवेश करून कोणी तपश्चर्या केली ? पिलाकपाणी; 'पिनाक पाणी' असें पाहिजे. 'पिनाक'हें शिवधनुष्याचें नांव आहे. हुताशनप्राशन; अग्निकाष्ठभक्षण. श्लोक ५०.

**चरण २**—ज्याची इच्छा परिपूर्ण झाली आहे. **खड्गधाराव्रत;** असिधाराव्रत, अतिशय प्रखर तपश्चर्या. **श्लोक ५२. तटस्थ;** उदासीन वृत्तीनें; उदास मनानें.

**पृष्ठ ११. श्लोक ५४. नियमितच;** खरोखर. **श्वास निश्वास;** श्वासोच्छ्वास. ( मी तुझा बहिश्चर प्राणच आहे; मी तुला प्राणाइतकी प्रिय आहे हा भाव ). **चरण ४**—तूंच माझा प्राण आहेस. **श्लोक ५५. हें स्त्रीजन्म;** 'जन्म' मराठींत पुल्लींगी असतांही येथें संस्कृताप्रमाणें नपुंसकलिंगी वापरला आहे. **श्लोक ५७. शंबरारी;** शंबरासुराचा शत्रु मदन ( प्रद्युम्न. ) **चरण २**—त्याचा ( प्रद्युम्नाचा ) तात ( कृष्ण ) तुला कसा माहीत नाहीं. ( प्रद्युम्न हा कृष्ण व रुक्मिणी यांचा मुलगा. या ठिकाणीं लग्नाच्या पूर्वींच कृष्णाचा मुलगा असा उल्लेख व तो स्वतः रुक्मिणीनें केल्यानें अनुचित असा कालविपर्यास झाला आहे.) **श्लोक ५८. ईज लाहे बुजावी;** ('बुजणें' घाबरणें या क्रियापदापासून 'बुजावी' हें नाम ) ही मुलगी घाबरून गेली. **श्लोक ६०. वरविषयक;** वरासंबंधीं.

**पृष्ठ १२. श्लोक ६१. पदयुगुल;** चरणद्वय. **आदान आहे;** स्वीकारावयाचें आहे. **श्लोक ६२ विदर्भाधीश;** विदर्भ देशाचा राजा. **चरण २**—माझें सर्व पुण्य आज चांगलें फळास आलें. **अघटितघटणेनें;** असंभाव्य किंवा विलक्षण तऱ्हेनें. **उदेलें;** उदय पावलें, भाग्योदय झाला. **श्लोक ६३. कर्णमूलास;** कानीं. **श्लोक ६४. चरण २**—याचे दोष कोण नाहींसे करील. **हुतवहवदनीं;** अग्नीच्या ज्वालांत. **चरण ४**—उपमा अलंकार. **श्लोक ६५. विचाराकारणें;** विचार करण्याकरितां. **श्लोक ६६.** रुक्मीच्या मुखांतून निघालेली कृष्णनिंदा त्याच्या उत्तम प्रकारच्या किंवा परमेश्वरी गुणांमुळें अतिस्तुतिपरच झाली.

## सर्ग तिसरा.

**पृष्ठ १३. श्लोक २. विचारल्यावीण;** विचार केल्यावांचून. **श्लोक. ३. चरण १ व २**—हिमालयानें आपली कन्या पार्वती स्मशानवासी नरकपाल धारण करणाऱ्या शंकराला देण्याचा अविचार केला, त्याचें फळ तसेंच झालें. **कपाळी;** शंकर. नरकपाल ( कवटी ) धारण करणारा. **श्लोक ४. चरण १**—तूंही त्या हिमालयासारखाच वागत आहेस. **श्लोक ६. गुणग्राहक**

**रानटांचा**; रानटी माणसांचे, गोवळ्यांचे, गुण घेणारा; त्यांची स्तुति करणारा. **श्लोक ७. मातुल**; मामा ( कंस ). **मावशी**; पूतना. **श्लोक ८. वक्षस्थळ**; छाती. **चरण २**–पूर्वीं एकदां सर्व ऋषीमंडळींत ब्रह्मा, विष्णु व महेष, यांत श्रेष्ठ कोण असा वाद पडल्यामुळें भृगु नांवाचा एक ब्राह्मण ऋषि या तिन्ही देवांची परीक्षा पहाण्यास निघाला. ब्रह्मदेव व शंकर यांच्याकडे जाऊन त्यांना वंदन वगैरे न करतां त्यांना त्यानें शिव्या देण्यास आरंभ केला, तेव्हां ते देव त्याच्यावर फार क्रुद्ध झाले. त्यांचा राग शांत करून तो विष्णूकडे गेला व ते शांतपणें निजले असतां त्यांच्या छातीवर त्यानें लत्ताप्रहार केला. परंतु ते त्याच्यावर न रागावतां उलट 'आपल्या पदकमलाला कांहीं इजा झाली नाहींना ?' म्हणून चौकशी करूं लागले.

**पृष्ठ १४. श्लोक ९. अकर्मी**; कुकर्म करणारा, दुराचारी. **चरण ४**,–मानवधर्म काय आहेत, मनुष्याची आवडनिवड काय असते इकडे त्यांचें लक्ष नसतें. ( अशा पतीच्या संगतींत रुक्मिणीला कोणतें सुख लागणार ?) **श्लोक१०. सबाह्य अभ्यंतर**; आंत बाहेर शरीरानें व मनानें. **चरण २**–केव्हांही बोलण्यांत बोल नाहीं. **पाटश्चरवृत्ति**; ( 'पाटच्चर' असा मूळ संस्कृत शब्द आहे, त्याचा अर्थ 'चोर' ); चोराची वृत्ति. **श्लोक १२.** ह्या व पुढील तीन श्लोकांत कृष्णावतारापर्यंत झालेल्या परमेश्वराच्या आठ अवतारांचा उल्लेख आला आहे. **अमासा**; दुबळा ( ? ) **विरूपी**; कुरूप. **श्लोक १३. चरण १** व **२**–वामन अवतारीं परमेश्वरानें बळीजवळ त्रिपाद भूमीची याचना केली अशी कथा आहे. **भार्गव**; भृगूचा ( जमदग्नीचा ) मुलगा परशुराम. **चरण ३**–जमदग्नीची पत्नी रेणुका इच्यावर तो एकदां कांहीं कारणानें फार क्रुद्ध झाला असतां त्याने आपल्या मुलांस तिला ठार मारण्यास सांगितलें. चार मुलांनीं त्याची ती आज्ञा पाळली नाहीं, पण परशुरामानें आपल्या हातांतील परशूनें आईचा शिरच्छेद केला व बाप प्रसन्न झाल्यावर, ती पुन्हां सजीव व्हावी असा वर मागून त्यानें तिला सजीव केलें. **श्लोक १६. पुंसृष्टि**; पुरुषांची जात. **श्लोक १९. विचारिलीं**; विचारांत घेतलीं; त्यांच्याविषयीं विचार केला. **श्लोक २१. चरण ३**–लग्न लवकर उरकून घेण्याकरितां त्यानें जोशीबुवांकडून कसा तरी लग्नमुहूर्त **काढविला.**

**पृष्ठ १५. श्लोक २३. महासंच चरण २**–मोठ्या पुढ्याचे किंवा बांध्याचे. **तख्तरावा;** बैलाच्या गाडीवर फळ्या टाकून त्यावर कलावतिणीचा गांवांतून फिरता नाच करितात त्याला 'तख्त (क्त) रावा' असें म्हणतात. **श्लोक २७. हृदयेश** हृदयाचा ईश म्ह० स्वामी; पति. **श्लोक २८. चित्त बसणें;** मन रमणे. **श्लोक २९. चरण १;**–येणाऱ्या आपत्तीची (शिशुपालाशीं होऊं घातलेल्या लग्नाची)फार घाई होत होती.**मायसीं;** मातेशीं.

**पृष्ठ १६. श्लोक ३१. हृदयकमलकोशीं;** हृदय कमलाच्या म्ह०हृदयाच्या आंत. **श्लोक ३५. मूर्च्छेयेलागिं जातां;** मूर्च्छा जात असतां, मूर्च्छा गेली तेव्हां. **चरण ४**–तिच्या मृदु भाषणाशीं अमृताची काय तुलना होणार ! त्याच्यापुढें अमृतही फिकें पडेल. या ठिकाणीं उपमानापेक्षां उपमेयाचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे म्हणून 'व्यतिरेक' अलंकार झाला.

**पृष्ठ १७. श्लोक ३७. अघटित घटना;** न घडून येणारी विलक्षण गोष्ट. **निजकुलपुरुषार्थी;** आपल्या कुलाचा पराक्रम किंवा महत्त्व गाजविण्याची इच्छा करणारा. **श्लोक ३९. श्रुतिनिवह;** अखिल वेद, किंवा सर्व श्रुति. **चरण १**–अखिल वेद ज्याचें वर्णन करतांना अमूक एक वस्तु म्हणजे परमेश्वर किंवा ब्रह्म असें न सांगतां नकारार्थी, म्हणजे ब्रह्म काय नाहीं तें, सांगतात. **निजहृदयनिकेतीं;** आपल्या हृदयाच्या ठिकाणीं; हृदयांत. **चरण ३**–ज्याचें नामस्मरण करणें हाच श्रीशंकराचा रात्रंदिवस धंदा आहे. **श्लोक ४१. धांवण्या धांवणें;** रक्षण किंवा सहाय्य करण्याकरितां धांवणें. **बधावें;** घडावें (?). **श्लोक ४२. चरण १**–नानाप्रकारच्या सुखोपभोगाच्या वासनेच्या दुस्तर प्रवाहांत.या श्लोकांत पहिल्या चरणांत विषयोपभोगाची तृष्णा हीच कोणी एक दुस्तर नदी अशा सुंदर रूपकाची योजना करून तें रूपक शेवटपर्यंत फार चतुराईनें पार पाडलें आहे. **श्लोक ४३. विदेशीं;** श्रीकृष्णाच्या चरणकमलापासून फार लांब असल्यामुळे तिला आपली जन्मभूमी परकीच वाटूं लागली असा भाव. **चरण २**–तुझ्याशिवाय माझ्या हल्लींच्या चमत्कारिक राहण्याचा ( वागण्याचा ) कुणाला उलगडा होणार आहे ! **रहाणें;** वागण्याची पद्धत; रहाटी.

**पृष्ठ १८ श्लोक ४४. चरण ४**–रवितनय म्ह० सूर्यपुत्र यम; त्याचा **कुलाय म्ह० रेडा;** त्याच्यावर मी स्वतःला आरूढ झालेली केव्हां पाहीन !

मला मृत्यु केव्हां घेऊन जाईल ? ही एवढी साधी गोष्ट पर्यायानें विचारली आहे म्हणून या ठिकाणीं 'पर्याय' किंवा 'पर्यायोक्त' अलंकार होतो. **श्लोक. ४५ मत्तद्विरदकरटस्फोटन;** माजलेल्या हत्तीच्या गंडस्थलाचें विदारण. **जंबूकापसददमन;** क्षुद्र अशा कोल्ह्याचा पराभव; **श्लोक ४६. द्रुपदतनया;** द्रौपदी; **प्रल्हाद;** प्रल्हा ( ह्रा.) द. हिरण्यकशिपु राक्षसाचा मुलगा. हा बालपणापासून विष्णुभक्त असल्यामुळें बापाचा त्याच्यावर फार रोष असे. एकदां तुझा ईश्वर कोठें आहे तें सांग असे विचारल्यावरून तो सर्वत्र आहे असें प्रल्हादानें उत्तर दिलें. तो या खांबांतसुद्धां आहे असे त्यानें सांगितलें. तेव्हां हिरण्यकशिपूनें त्या खांबाला लाथ मारतांच त्यातून नृसिंहाचें रूप धारण करून विष्णु प्रगट झाले व त्यांनी त्या दैत्याला ठार मारले अशी कथा आहे. **श्लोक ४७. दुरितचय;** पापांचा सांठा. **चरण ३, ४**—माझा पापसंचय तुझ्या या निष्ठुरपणाच्या रूपानें फलद्रुप होत आहे कीं काय ? **श्लोक ४८. सुराराध्या;** देवांनींसुद्धां जिची आराधना करावी अशी.

**पृष्ठ १९. श्लोक ५१. त्वरिता;** त्वरा करणारी. **श्लोक ५२. वरयक्षिणी;** उत्तम यक्षस्त्री. **श्लोक ५३.** ह्या व पुढील श्लोकांत उत्तम प्रकारचें सृष्टिवर्णन दृष्टीस पडतें. संध्याकाल, तदनंतरचा चंद्रोदय वगैरे वर्णनें निःसंशय फार बहारीचीं आहेत. **दिनकरकरलक्ष्मी;** सूर्यकिरणांचे ऐश्वर्य. **कमलांचा बंधु;** चंद्र. **चरण ३, ४**—आपल्या इतर कमलबांधवा-प्रमाणेंच हे मुखकमल म्लान झालें आहे असें पाहून चंद्र तिला सुख देण्याच्या हेतूनें त्या ठिकाणीं आला (उगवला). या दोन चरणांत 'समासोक्ति' अलंकार आहे. अचेतनावर चेतनासच योग्य अशा क्रियेचा आरोप करण्यांत आला म्हणजे 'समासोक्ति' अलंकार होतो. **श्लोक ५४. चरण २**—सूर्यास्तानंतर रात्रीं चक्रवाक व चक्रवाकी या पक्षांचा नेहमीं वियोग होऊन दिवसां पुन्हां समागम होतो असा कविसंकेत आहे. **चरण ३, ४**—ब्रह्मदेवाच्या योजनेप्रमाणें ( विधिविहितनियोग ) सूर्यानें वारुणीचा ( पश्चिम दिशेचा ) अंगीकार केला म्हणून सायंसध्येला ( संधिकालाला ) राग येऊन ती आरक्त झाली आहे काय ? येथेही 'समासोक्ती'च होते. **श्लोक ५५. चरण २, ३ व ४**—चंद्र स्वतः निरिच्छ असून त्यानें या

सुंदरीशीं याचकवृत्ति स्वीकारली. ब्राह्मणाची नेहमींची भिक्षा मागण्याची वृत्ति (द्विजपति=१ ब्राह्मणश्रेष्ठ, २ चंद्र) न विसरतां त्यानें आपले किरणरूपी हात (कर—१ किरण, २ हात) पसरून तिच्याजवळ तिचें मुखलावण्य मागितलें. या ठिकाणीं 'समासोक्ति' तर होतेच; शिवाय उपमानापेक्षां उपमेयाचें श्रेष्ठत्व दाखविल्यामुळें 'व्यतिरेक' अलंकारही होतो. **श्लोक ५६. कांतिपूर**; चंद्रप्रभेचे पूर. **चंद्रकांत**; हा मणि चंद्रकिरणांच्या सान्निध्यानें पाझरूं लागतो असा कविसंकेत आहे. **चरण ३**—चकोर पक्षी केवळ चंद्रकिरणांवर आपली उपजीविका करितात, असा कविसंकेत. **श्लोक ५८ बाल रत्नाकराचें**; समुद्रमंथनाचे प्रसंगीं निघालेल्या चौदा रत्नांतील चंद्र हा एक आहे. **चरण ३, ४**; हें चंद्रा, तूं रत्नाकराचें (समुद्राचें) सुंदर अपत्य असतांना 'दोषाकर' असें नांव कसें धारण करतोस. 'विरोध' किंवा 'विरोधाभास' अलंकार.

**पृष्ठ २०. श्लोक ६०.** 'अपन्हुति' अलंकार. उपमेय तें उपमेय नव्हे तर उपमानच आहे असें वर्णन असतें तेथें हा अलंकार होतो. **भारे**; पीडित होतो. **श्लोक ६१. प्रलयदहनकल्प**; प्रलयाग्निसारखा. **श्लोक ६३. सोले**; दुःखित होते. **वचे**; जाई, जातो. **श्लोक ६५. चरण २**—राधिकेच्या मुखचंद्राचा चकोर. चकोरपक्षी जसा चंद्रकिरणांचा भुकेला असतो तसा तूं राधिकेच्या मुखचंद्राचा भुकेला असतोस. 'रूपक' अलंकार.

**पृष्ठ २१. श्लोक ७१. मनोगज**; मनरूप हत्ती. **प्रणतभक्तकदंबा**; भक्तसमूहांनीं नमस्कारिलेली. **श्लोक ७४. चरण २**—मग ती काय पत्र लेखनाला विलंब करणार ? **श्लोक ७५. स्वीयो...पटनी**; आपल्या हकीगतीची कथा सांगण्यांत कुशल. **अध्यपिली**; सुशिक्षित, शिकलेली.

## सर्ग चवथा.

**पृष्ठ .२२ श्लोक १. दौत्यार्थ**; दूताचें काम करण्याकरितां. **श्लोक ५. विषयाविषधर**; विषय (काम) रूपी सर्प. **भारी** (चरण २); 'मारी' असें पाहिजे असें वाटते. **श्लोक ६. मुद्रामुद्रित**; अंगठीची मुद्रा (छाप) करून. **चरण २**—भीमकसुतेला उजवी घालून गेला. **श्रीपातिपादपंकजयुगीं**; श्रीकृष्णाच्या चरणकमलाच्या ठिकाणीं. **श्लोक ९ चरण ४**—हंसक्षीरन्यायानें तूं मनामनांत निवड कर.

**पृष्ठ २३. श्लोक १०. उच्चावच;** उच्च व हलके. **श्लोक १३ शोकार्णवकर्णधारा;** शोकसमुद्रांतून पार वाहून नेणारा सुकाण्या. **श्लोक १८. फांसा पडे;** पाशांत ( जाळ्यांत ) सांपडे. **श्लोक १९. चरण ३**—तुझ्या नाममुक्तांचा ( नांव हेंच मोती ) चारा.

**पृष्ठ २४. श्लोक २३. वचनीय सीमा;** बोलण्याची सीमा. **श्लोक २९. बाहृती;** एकमेकाला बोलावतात. **नुतिपाठक;** स्तुतिपाठक. या श्लोकापासून पुढील तीन श्लोकांत प्रातःकाळचें फार सुंदर वर्णन आहे. जुन्या मराठी काव्यांत निसर्गाचें वर्णन नाहीं असें म्हणणारांनीं हे श्लोक, व तसेच तिसऱ्या सर्गातील ५३ पासून पुढील श्लोक अवश्य वाचावेत. **श्लोक ३०. चरण ४**—प्रातःकाळच्या प्रकाशामुळें तारे कमीकमी होऊं लागले.

**पृष्ठ २५. श्लोक ३२.** ध्यानी वसें तें स्वप्नीं दिसें या म्हणीप्रमाणें रुक्मिणीला स्वप्नांत कृष्णभेट होते. **श्लोक ३६. निधि;** कृष्णरूपी द्रव्यसंचय. **श्लोक ३७. पक्षद्वार;** मागील दरवाजा. **क्षेमाशंसी;** क्षेम (हित किंवा कल्याण) सुचविणारा. काकपक्षी, पाण्यानें भरलेल्या घागरी, सवत्स धेनु, सुवासिनी वगैरे शुभसूचक शकून होत.

**पृष्ठ २६. श्लोक ४०. मधुकरपटली;** भृंगसमूह. **चरण ४**—कमलदलें रात्रीं मिटल्यामुळें त्यांत सांपडलेल्या भुंग्यांची आतां सुटका झाली. **श्लोक ४२.** पृथ्वीवृत्त. **स्मरणमालिका;** जपमाळ, स्मरणी. **४६. शांतिकांता;** शांतिरूप कांता.

**पृष्ठ २७ श्लोक ४७ चरण ४**—या रसज्ञ जिव्हेनें माझे उपकार अशा रीतीनें हरिनाम घेतां परनिंदा करून फेडले काय? **श्लोक ४९. जगत्रय सावली;** 'जगत्रयसावली' असा एक समास पाहिजे. **विसावली;** शांत झाली; हृदयांत उत्पन्न होणारे विचार व विकार शांत झाले. **श्लोक ५२. द्वैतभान;** परमेश्वर व जीव हे भिन्न मानणें. **श्लोक ५४ चरण ३**—विषयांकडे धांवणारें मन मागें परतते.

**पृष्ठ २८. श्लोक ५८. खेळ;** संसाररूपी खेळ. **श्लोक ६१. परदेशीं;** संसाररूपीं परदेशांत. **श्लोक ६५. पाश;** मोहपाश. **उगवावा;** मोकळा करावा व सोडावा. **श्लोक ६६.** 'हरिणी'वृत्त.

## सर्ग पांचवा.

**पृष्ठ २९. श्लोक १. हेमनगरी**; द्वारका. **त्रिभुवननिधान**; तिन्ही लोकांना निधीप्रमाणें वाटणारा श्रीकृष्ण. **श्लोक ३. अलका**; कुबेराची राजधानी. **अमरावती**; इंद्राची राजधानी. **श्लोक ४. सिद्धि**; अष्टसिद्धि—अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व.

**पृष्ठ ३०. श्लोक ७. पीयूषवापी**; अमृताच्या विहिरी. **श्लोक १०. उच्चैःश्रवे**, इद्राच्या घोड्यासारखे (उच्चैःश्रव्यासारखे) घोडे. **श्लोक १३. चार मुक्ती**; सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता. **श्लोक १४. जय-विजय**; वैकुंठ लोकचे विष्णूचे द्वारपाल. **चरण ४**—मुनिजनांचें मन ज्याकडे लागलें असा जो श्रीकृष्ण त्याला पहात आहे.

**पृष्ठ ३१ श्लोक १५. निगूढ**; त्याला न दिसेल अशा रीतीनें एकीकडे. **अक्रूर**; कृष्णाचा मित्र. **श्लोक १८. आपाद**; पायाला लागणारी, पायाला पोहोंचणारी. **श्लोक २२. चरण १ व २**- धोतरानें कंबर कसली होती ती सोडून रुक्मिणीचें पत्र काढलें. **राहवावे**; राहूं द्यावें, बाजूला ठेवावें. **श्लोक २३. वाद्यध्वान**; वाद्यांचा आवाज. **कलाली**; कलली; वांकली. **श्लोक २४. समुत्थानवेळा**; उठण्याची ( कचेरी बरखास्त होण्याची ) वेळ.

**पृष्ठ ४० श्लोक ४१. लाखी तडप**; लाखी रगाचें उंची वस्त्र. **श्लोक ३०. हरिपद**; कृष्णाच्या चरणकमलांपासून उत्पन्न होणाऱ्या आनंद-सागराच्या लाटा.

**पृष्ठ ३३ श्लोक ३३. असदुद्योग**; दुष्कर्मांचा व्यवसाय. **सुरपतितरु**; कल्पवृक्ष. **श्लोक ३५. स्वपरजनवैषम्य**; आपपराविषयीं विषमभाव. **श्लोक ३६. चहूंमध्यें**; चार आश्रमांत. १ ब्रह्मचर्य, २ गार्हस्थ ( गृहस्थाश्रम ), ३ वानप्रस्थ, ४ संन्यास. **विश्रांताचे**; 'विश्रांती'चें असें वाचावें. **सुरपतिपुर**; इंद्राची नगरी, अमरावती. **श्लोक ३८. तदुद्देशें**; त्यांच्यासाठीं.

**पृष्ठ ३४. श्लोक ४० व ४१.** यांत फार सुंदर रूपक साधलें आहे. **जीवपथिक**; जीव हाच प्रवासी. **श्लोक ४४. तुरीयावस्था**; सुषुप्ति, स्वप्न, जागृती व तुर्या (किंवा तुरीया) या चार अवस्थांपैकीं ब्रह्माशीं तादात्म्य होण्याची एक स्थिति.

पृष्ठ. ३५ श्लोक ४९. तीर्थस्वरूपचरण; तीर्थाप्रमाणें पवित्र चरण असलेला. प्रथिताभिमान; अतिशय अभिमानी. समवाप्तकाम; सर्व इच्छा पूर्ण झालेला. श्लोक ५०. शिरोवतंसा; शिरोमणि. चरण ३–मराठी पत्रांत नेहमीं येणारा मायना 'सह' खेरीज करून असाच असतो. श्लोक ५१. चरण २–योगिश्रेष्ठाच्या हृत्कमलरूपीं पिंजऱ्यांत राहणारा पोपट. श्लोक ५३. चरण ३–विद्या, तरुण वय, संपत्ति, सौंदर्य व सद्गुण यांचें स्थान.

पृष्ठ ३६. श्लोक ५५ वीरभाग; वीरालाच योग्य असा भाग. चरण २–वीरांमध्यें तुझी तत्काळ फजीती होईल; ते निंदाव्यंजक टाळ्या पिटतील. तुरुत; (सं. त्वरित), तत्काळ. सिंहामिष; सिंहाचा भाग. आमिष; मांस. श्लोक ५६. पाणिग्रहास करिजे; पाणिग्रहण कर, लग्न कर. श्लोक ५८. पुरुषार्थसिंधु; पराक्रमाचा सागर. श्लोक ५९. निजमनोरथदायिकेचें; आपले मनोरथ पूर्ण करणारीचें.

पृष्ठ ३७. श्लोक ६३. परावर; अत्यंत श्रेष्ठ. श्लोक ६४ करभोरु; (करभ=हाताच्या मनगटापासून बोटांपर्यंतचा भाग. ऊरु=मांडी.) जिच्या मांड्या सुंदर आहेत अशी स्त्री. श्लोक ६६. चरण २–कान पाहिले म्हणजे सुवर्णाच्या शिंपल्याच आहेत कीं काय असा भ्रम होतो. तिलप्रसून; तिळाचें फूल. श्लोक ६९. सामुद्रिकं लक्षणानीं; (सामुद्रिक; हातांपायांवरच्या रेषा पाहून भविष्य सांगण्याचें शास्त्र). हातांपायांवरील रेषा.

पृष्ठ ३८. श्लोक ७५. पणपूर्व; शपथ घेऊन. प्रस्थाननक्षत्र; प्रवासास निघण्याकरितां अनुकूल नक्षत्र. श्लोक ७६. देवक; लग्नमुंज इत्यादि कार्यांचे सिद्धयर्थ देवतास्थापन. श्लोक ७७. दारुक; कृष्णाचा सारथी. श्लोक ७९. सहारें; (सं. सहार=आम्रवृक्ष) आंबराया. चरण २–प्राणप्रियेच्या सुंदर कथांनीं करमणूक करून. आनर्त; एक प्राचीन देश. हल्लींचा काठेवाड त्याची द्वारका राजधानी होती. हिलाच आनर्तनगरी असें प्राचीन नांव होतें.

## सर्ग सहावा.

श्लोक १. चतुरंग सेना; हत्ती, घोडे, रथ व पायदळ हीं चार अंगें ज्यांत आहेत असें सैन्य. रजोविशेषें; धुळीच्या लोटांनीं.

पृष्ठ ३९. श्लोक ११. पुण्याह्वाचन; विवाहादि मंगलकार्यांतील प्रारंभीं-चें कर्म. नीरांजन करणें; औक्षण करणें, ओवाळणें.

पृष्ठ ४१. श्लोक २७. कृष्णार्थ; द्रौपदीकरितां. श्लोक २८. पांखरूं; गरुड, विष्णूचें वाहन.

पृष्ठ ४२. श्लोक ३४. चरण १—सूर्याशिवाय मनुष्यांस रात्र कंठावी लागते तशी तुझ्याशिवाय माझी स्थिति झाली आहे. तुझ्याशिवाय मला सुखाचा प्रकाश मिळत नाहीं. अवस; अमावास्या. श्लोक ३७. चरण ४ --कृष्णाशिवाय तिच्या जिवाची उलघाल होत होती. श्लोक ३८. प्रमद विपिनगर्भीं; क्रीडोद्यानाच्या मध्यभागीं.

पृष्ठ ४३. श्लोक ४१. ध्रुव व गजेंद्र; (सर्ग १—श्लोक ५, टिपा पहा). अंबरीष; हा एक विष्णुभक्त राजा होता. त्याचें सत्त्व पहाण्याकरितां एका द्वादशीचे दिवशीं पहाटेंच दुर्वास ऋषि त्याचेकडे गेले व 'स्नान करून भोजनास येतों' असे सांगून नदीतीरावर गेले व सूर्योदयापर्यंत परत आले नाहींत. इकडे सूर्योदयाला एकादशीचें पारणें फेडावयाचें असल्यामुळें राजाला मोठी अडचण पडली. अतिथीला टाकून आपण भोजन करणें योग्य नसल्यामुळें त्यानें एक तुलशीपत्र तोंडांत टाकून पारणें फेडलें, पण दुर्वास परत आल्यावर त्याला तेंही खपलें नाहीं, व त्यानें राजाचा फार छळ केला. शेवटीं, परमेश्वरानें आपलें सुदर्शन चक्र ऋषीच्या पाठीस लावून त्याला अंबरीषापुढें शरण जावयास भाग पाडलें. श्लोक ४४. आठव्या; कृष्णावतार आठवा होता.

पृष्ठ ४४. श्लोक ५१. व्रजयुवति दाटींतहि; 'व्रजयुवतिदाटींतहि' असा एक समास घ्यावा. गोपींच्या दाटींत. श्लोक ५३. मुरकुंडी पडणें; गर्दी होणें.

पृष्ठ ४५. श्लोक. ५६. असवरीं; 'अवसरीं' असें वाचावें.

## सर्ग सातवा.

श्लोक १. शुभाशंसी; शुभ दर्शविणारी. नेत्रशफरी; माशाप्रमाणें दिसणारे नेत्र.

पृष्ठ.४६.श्लोक ४. संजीवनसिद्धि; पुनर्जन्माची प्राप्ति. श्लोक ५. निदाघकाळ; (निदाघ, उष्णता), उन्हाळा. श्लोक १०. छत्तीस गुण; वधुवरांच्या

पत्रिकांत दिसून येणारे गुण. हे गुण एकंदर छत्तीस असतात. त्यांत कांहीं अनुकूल, कांहीं प्रतिकूल असे असतात. कृष्णाच्या व रुक्मिणीच्या पत्रिकेंत सर्वच गुण अनुकूल आहेत हा भाव.

**पृष्ठ ४७. श्लोक १५. अभिमुख;** सामोरा. श्लोक २४. **रह्वाळ;** राऊत, घोडेस्वार.

**पृष्ठ ४८ श्लोक २७. भूषा विपर्यास;** एक समास पाहिजे; दागिन्यांची अदलाबदल; भलता दागिना भलत्या जागीं घालणें, **पादांगद;** (पाद+अंगद) पायांतील भूषण. वास्तविक 'अंगद' शब्द मनगटांतील भूषणाला लावतात. **श्लोक २९. कृतविपरीतदशा;** ज्यांची मनाची स्थिति चमत्कारिक केली आहे, बदलून टाकली आहे, अशा. **निरंजनानें;** श्रीकृष्णानें. **श्लोक ३६ मुकुलितमुखी;** जिचें तोंड मिटलें होतें, जिच्या मुखांतून एकही शब्द निघत नव्हता.

**पृष्ठ ४९. श्लोक ३७. प्रत्युद्गमनविधि;** सामोरे जाऊन भेटण्याचा आचार. **श्लोक ३८. नृपमूर्धन्यकुमरी;** राजाधिराजाची कन्या. चरण ३ व ४—श्रीकृष्ण परमात्म्याच्या परमेश्वरी स्वरूपाची, सर्वत्र अणुरेणुसुद्धां व्यापून उरणाऱ्या स्वरूपाची, ओळख झाल्यामुळें,जिला 'कृष्ण आला, कृष्ण गेला' वगैरे सांगण्यांत कांहीं अर्थ नव्हता.

**पृष्ठ ५०. श्लोक ४५. ग्रंथ उकले;** या गोष्टीचा धागा लागला; कोडें उलगडलें. श्लोक ४६. **दोघांसर पाड;** 'दोघां सरपाड' असें पाहिजे. **सरपाड;** सारखी योग्यता, समानगुणता. श्लोक ४७. **दुःखास्पद;** दुःखाचें स्थान, दुःखदायक. श्लोक ४८. या व पुढील श्लोकांत रुक्मिणीच्या आईनें तिला सासरीं कसें वागावें याविषयीं फार उत्तम उपदेश केला आहे. श्लोक ४८. **तंती लागसी;** ओळीला, मार्गाला लागलीस. **तंती;** ओळ. **श्लोक ४९. चरण २**—मला तुझ्याविषयीं फार काळजी वाटते. **श्लोक ५०. पोटागीची माय;** जिच्या पोटांत मुलीविषयीं कालवाकालव होते अशी; आंतड्याला पीळ पडणारी. **श्लोक ५६ चरण ३ व ४**—जर तुझ्या मुखांतून अभिमानाचे उद्दाम शब्द आले तर तुझ्या सद्‍गुणांचें मूळच नाहींसें झालें असें समज.

**पृष्ठ ५१ श्लोक ६४. भ्रूयुगुळास;** भुंवयांस. **श्लोक ६५. चरण ३**—

हलक्या कानानें जर कोणाच्या चहाड्या ऐकणार नाहींस. श्लोक ६८. **वेचेंकरून**; खर्च करून.

पृष्ठ ५२ श्लोक ७१. चरण१–तूं या संसारांत आसक्ति न धरतां त्याच्याकडे दुर्लक्ष करून ( उपेक्षा बुद्धीनें ) रहा ( विचर ). **परुषवचनोच्चारण**; कठोर शब्दांचा उच्चार. श्लोक७३. **नीरुपम**; ऱ्हस्व 'नि' पाहिजे. श्लोक ७५. **शिक्षाविधि**; शिक्षण, उपदेश, शिकवण.

पृष्ठ ५३. श्लोक ८२. **उगऊन द्यावें**; स्पष्ट करून सांगावें. श्लोक८३ **तेव्हां**; (चरण १). 'शिखरिणी'वृत्त असल्यामुळें पहिला 'य' गण पाहिजे. या दृष्टीनें 'तव्हां' किंवा 'त्यव्हां' असें पाहिजे. **वक्रेंकरुनि**; 'वक्त्रें करुनि' असें पाहिजे; मुखानें.

## सर्ग आठवा.

पृष्ठ ५४ श्लोक ३. **कूडमंत्री**; कपटाचा सल्ला देणारा; दगलबाज.

पृष्ठ ५५. श्लोक १९ **जोठें**; (?). श्लोक २०. **शकुनग्रंथि**; शुभ शकुनाची गांठ. श्लोक २२. **संवरणार्थ**; 'संवरण' याचा अर्थ लपविणें असा आहे; पण तो प्रस्तुत चरणांत चांगलासा लागत नाहीं. स्वयंवराकरितां लग्नाच्या वेळीं माळ घालण्याकरितां, असा अर्थ असावा. **आगुल्फ** पायांच्या घोट्यांपर्यंत. श्लोक २३. **विश्वेश्वरि**; विश्वस्वामिनी रुक्मिणी श्लोक २४. **मुक्ताफळस्तोम**; मोत्यांचे घोंस. श्लोक २५. **झोंपाळ्याप्रमाणें** अस्थिर वृत्ति. **दोला**; झोंपाळा, झुला.

पृष्ठ ५६. श्लोक ३०. **पदातिफेरा**; पायदळाचा घेर. श्लोक ३५. **पुन्नाम**; पुरुषाचें नांव. श्लोक ३७. **मळापकर्षणापनीय**; मळ धुवून काढण्याकरितां.

पृष्ठ ५७. श्लोक ४१. **यथास्थानदेशीं**; अवयवांच्या योग्य ठिकाणीं. श्लोक ४४. **लोपामुद्रा**; अगस्त्य ऋषीची पत्नी. **अनसूया**; अत्री ऋषीची पत्नी. **तुलने**; तुलनेला, बरोबरीला. श्लोक ४५. **आनर्ताधिप**; आनर्त देशाचा ( काठेवाड, यालाच 'सौराष्ट्र' असें पूर्वीं नांव असे ) अधिपति कृष्ण. **अस्माद्विधहृदयसंदेह**; आमच्या सारख्यांच्या मनांतील ( श्रीकृष्णाशीं इचें लग्न होईल कीं नाहीं याविषयींचा) संशय. श्लोक ४६. **स्मितज्योत्स्नाजाळें**; सर्वत्र पसरलेल्या हास्यरूपी चांदण्यानें. **निजनिलय**; तिचें

स्थान, देऊळ. **कळला**; 'कळला'याच्या जागीं 'फळला' ( फलद्रूप झाला ) असें असावें.

**पृष्ठ ५८. श्लोक ४८. पुरोभागीं**; देवळाच्या पुढें. **अतितत**; अतिशय विस्तृत. **चिरंटी**; नायकीण. **नानाविध निवह**; नाना प्रकारचे समुदाय. **घनवटें**; दाटी करी. समुदायांनींदाटी झाली होती. **श्लोक ४९. भरोन धापे**; धाप किंवा दम लागल्यामुळें **श्लोक ५०. चरण २**–शुष्क, गौण गोष्टीच करीत बसली आहेस. **श्लोक ५१ चरण ४**–ही माया लावीत गेल्यानें लगट करून चिकटते; लावावी तितकी लागते, व सोडावी तितकी सुटते. **श्लोक ५२. विवेकांजन**; विचाररूपी काजळ. **उदासपणें** निरासक्तवृत्तीनें. **अद्वैत**; श्रीकृष्ण परमात्मा. **श्लोक ५३. पारणा फिटणें**; समाधान होणें. 'लोचन पारणा' एक सामासिक शब्द. **श्लोक ५५. क्षत्रियाधम**; शिशुपाल. **हताश**; निराश. **श्लोक ५६. व्युत्पत्तीला**; मूळ स्थानाला, उत्पत्तिस्थानाला; रुक्मिणी ही आदिमाया प्रकृति असून परमेश्वरापासून प्रकृति उत्पन्न झाल्यामुळें, श्रीकृष्ण परमात्मा हा तिचें मूलस्थान होय. श्रीकृष्णाला जाऊन मिळशील हा भाव. **श्लोक ५७. कौस्तुभ**; श्रीकृष्णाचा मणी. **वैजयंती**; कृष्णाची माला.

**पृष्ठ ५९. श्लोक ५८. खगपति**; गरुड. **श्लोक ५९. मुळ**; मूळ, बोलवणें. **श्लोक ६२. पृथिवीपुरुहूतपुत्री**; पृथिवीपतीची, राजाची कन्या. **विकचपद्मपलाशनेत्री**; प्रफुल्ल कमलदलाप्रमाणें जिचे नेत्र आहेत अशी. **चारुशीला**; सुशील. **श्लोक ६४. सकळलोकमनोभिरामा**; सर्व लोकांच्या मनाला सुंदर दिसणारी, आवडणारी. **चरण २**–वैकुंठनाथ श्रीकृष्ण, त्याच्या पदकमलाशीं आसक्त झालेली किंवा मन गुंतलेली. **सौंदर्यसारसनिर्मित**; उत्कृष्ट सौंदर्याच्या रसाची तयार केलेली.

**पृष्ठ ६० श्लोक ६५. चरण १**–मुखचंद्र हा अमृताचा सिंधु. **चरण ४**–नाहीं तर हा चंद्र हरिणांकित (हरणाचे चिन्ह असलेला) किंवा डाग असलेला असा कां ? **श्लोक ६६. अभुक्ता**; न वापरलेल्या कोऱ्या ( मुक्ता= मोतीं ). **सीमंतसीमपदवी**; केंसांतील भांगाचें स्थान. **येकावळीयुत**; एकावलीसहित. **श्लोक ६७. कुंडलमंडितेक्षणा**; कुंडलांनीं शोभायमान होणारे नयन असलेली. (वास्तविक 'कुंडल' हा कानांतील दागिना आहे.)

**शुचिस्मिता**; शुभ्रहास्याची. (हास्याचा रंग पांढरा असतो असा कविसंकेत आहे.) **पक्व...धरा**; पिकलेल्या तोंडल्याचे भाऊच असे ओंठ असलेली; तिचे ओंठ तोंडल्यासारखे लाल होते हा भाव. **दृष्टिगोचरा होय**; दृष्टीस पडली. **श्लोक ६८. चरण १ व २**—डाव्या करकमलाने केशपाश सांवरून, व कटाक्षांच्या बाणांनीं (अपांगविशिखीं) इतर राजांना दूर करून. **श्लोक ६९.तन्मुखसरोरुह**; तिचें मुखकमल. **श्लोक ७०.चातकप्रणयिनी**; चातकाची स्त्री. **निदाघतप्ता**; उन्हानें संतप्त झालेली. **नवघनाभिमुख**; नवीन मेघाकडे. **तृषार्ता**; तहानेनें पीडित होऊन. **श्लोक ७१**. प्रयागतीर्थावरील गंगा, यमुना, व सरस्वती या तीन नद्यांच्या संगमाला 'त्रिवेणी संगम' म्हणतात. या संगमावरील वटवृक्षावर पिंड दिला म्हणजे मोक्ष मिळतो अशी समजूत आहे. या श्लोकांत भीमकी व तिच्या सख्या यांचा त्रिवेणी संगम कल्पिला असून श्रीकृष्ण परमात्मा हा (वट महीरुह) वटवृक्ष कल्पिला आहे. हें फार सुंदर रूपक आहे.

**पृष्ठ ६१ श्लोक ७३. मुखेंदुसानुग्रह**; 'मुखेंदु' व 'सानुग्रह' हे दोन निरनिराळे शब्द घ्यावेत. **सानुग्रह**; अनुग्रहपूर्वक. **श्लोक ७४. कुंडलांचा**; या ऐवजीं 'कुड्मलांचा' (फुलांच्या कळ्यांचा) असा शब्द असता तर अर्थ लागता. **धम्मिल्ल**; केशकलाप. **संवेष्टिला**; गळ्याभोंवतीं घातला. **रत्नावतंसद्युति**; रत्नखचित दागिन्यांची प्रभा. **श्लोक ७६. विश्वमनोभिरामा**; अखिल विश्वाच्या मनाला मनोहर वाटणारा. **श्लोक ७८. यदूद्वह**; यदुवंशोद्भव कृष्ण. **तिर्यङ्मुखी**; वाकड्या नजरेनें किंवा चोरून पहाणारी; एकीकडे तोंड फिरलेली. **श्लोक ७९. नवोढत्वें**; नवीन लग्न झाल्यामुळें. **श्लोक ८०. जवदाणें**; (?). **उतटती**; तुटती. **घर्मोदकण**; घर्मबिंदु.

**पृष्ठ ६२. श्लोक ८१. निवाडें**; हौसेनें. **श्लोक ८२. कुरवंडी करणें**; ओवाळून टाकणें. **श्लोक ८३. विनीतत्वें**; नम्रपणानें. **बद्धांजळि**; हात जोडून. **श्लोक ८४. सदन**; घर, आधार. **श्लोक ८६. पतितनिवहोद्धारक**; पतितजनांचा उद्धार करणारा. **निवह**; समुदाय.

परिशिष्ट

# संस्कृत काव्यांतील कांहीं थोडे समानार्थक उतारे.

## सर्ग दुसरा

| | |
|---|---|
| संपूर्ण प्रत-श्लोक ३.<br>शालोपयोगी प्रत-श्लोक २. | प्रजाः प्रजाः स्वा इव तन्त्रयित्वा ।<br>(शा. ५.) |
| सं. प्रत-श्लोक-६.<br>शा. प्रत-श्लोक ५. | एकमेव नौ जीवितं द्विधास्थितं पुनःशरीरम् ।<br>(शा. ६.) |
| सं. प्रत-श्लोक २७. | १ तदीयमानीलमुखं स्तनद्वयम् । (रघु. ३-८.)<br>२ मुखेन सालक्ष्यत लोध्रपांडुना । (रघु. ३-२.) |
| सं. प्रत-श्लोक ३०-३२. | न मे ह्रिया शंसति किंचिदीप्सितं<br>स्पृहावती वस्तुषु केषु मागधी ।<br>इति स्म पृच्छत्यनुवेलमादतः<br>प्रिया सखीरुत्तरकोसलेश्वरः॥१॥ (रघु. ३-५.) |
| सं. प्रत-श्लोक ३४. | नहीष्टमस्य त्रिदिवेऽपि भूपतेरभूदनासाद्यमधिज्य धन्वनः । (रघु. ३-६.) |
| सं.प्रत-श्लोक ३८.<br>शा.प्रत-श्लोक २१. | सर्वोपमाद्रव्यसमुच्चयेन । यथा प्रदेशं विनिवेशितेन ॥<br>सा निर्मिता विश्वसृजा प्रयत्नात् । एकस्य सौंदर्य दिदृक्षयेव ॥ १ ॥ (कुमारसं.) |

## सर्ग तिसरा

सं. प्रत–श्लोक ३७. पटुपटहध्वनिभिर्विनीतनिद्रः। ( रघु. ९ )

सं. प्रत–श्लोक १००. हला पश्य नलिनीपत्रांतरितमपि सहचरमपश्यंती आतुरा चक्रवाक्यारटति। ( विक्रमो० )

सं. प्रत–श्लोक १०९. प्रजागरात् खिलीभूतस्तस्याः स्वप्ने समागमः ॥
बाष्पस्तु न ददात्येनां द्रष्टुं चित्रगतामपि ॥ १ ॥

सं. प्रत–श्लोक १२३. न पुनरेति गतं चतुरं वयः। ( रघु. ९. )

## सर्ग पांचवा

सं. प्रत–श्लोक ८. संक्रीडन्ते मणिभिरमरप्रार्थिता यत्र कन्याः ॥ ( मेघ. )

संस्कृत काव्याशीं परिचय असलेल्या वाचकांना आणखी असे अनेक उतारे सांपडतील. स्थलसंकोचास्तव त्या सर्वांचा या ठिकाणीं उल्लेख करतां येत नाहीं. केवळ उदाहरणें म्हणून कांहीं थोडीं स्थळें वर दाखविलीं आहेत.

सामराजविरचित 'रुक्मिणीहरण'

# कठिण शब्दांचे अर्थ.

अ

अकिंचन—गरीब, दीन
अगरु—चंदन
अगोचर—न दिसणारा
अग्रज—ज्येष्ठ, वडील भाऊ
अग्रणी—मुख्य, पुढारी
अग्रण्य—पुढारी
अंग—अवयव
अंगद—एक बाहुभूषण,
अंगना—स्त्री
अचर—स्थावर
अंचल—पदर
अजान—अडाणी
अजिर—अंगण
अंजन—काजळ
अटाळा—माळा
अत्यय—शेवट; नाश
अत्याहित—अत्याचार
अद्वैत—जीव व ब्रह्म यांचें ऐक्य
अधमत्व—हीनता, कमीपणा
अधिप—राजा
अधीर—उतावीळ
अधोक्षज—विष्णु
अध्यपर्णे—शिकविणें
अंधकारि—अंधक दैत्याचा शत्रु, शंकर
अंधंतम—तमोमय प्रदेश
अनय—अन्यायाचें वर्तन
अनंग—मदन, काम
अनन्य—दुसरीकडे लक्ष जाऊं न देतां
अनभिमत—अप्रियकर, त्रासदायक
अनभिलषित—निरिच्छ
अनभिज्ञ—अडाणी
अनया—श्रीकृष्ण
अनर्घ्य—मूल्यवान
अनर्ह—अयोग्य, अनुचित कर्म
अनवरत सतत
अनाप्त—परका, शत्रु
अनार्य—उद्धट, असंभावित
अनिमिष—एकसारखी, पुष्कळ वेळ
अनियत—भलत्या वेळीं
अनिश—एकसारखा, रात्रंदिवस
अनुग्रह—कृपा
अनुपद—पाठोपाठ, तत्काळ
अनुपयोग—निरुपयोग
अनुरक्त—प्रेमबद्ध
अनुराग—प्रेम
अनुसंधान—लक्ष, चित्त
अनुज्ञा—आज्ञा, परवानगी

अनृत—असत्य, खोटें
अन्वय—वंश
अपत्रप—निर्लज्ज
अपर्णा—पार्वती
अपवर्ग—वाईट गोष्टी
अपवाद—निंदा
अपशब्द—दुरुक्ति, शिवी
अपसद—दुरात्मा, दुष्ट नीच
अपांग—कटाक्ष
अपार—अनंत, अमर्यादित
अपूर्त—अपूर्ण
अंबर—वस्त्र
अंबुज—कमल
अभिधा—नांव
अभिलषित—आवडती गोष्ट, इच्छा
अभिनव—नवीन, अपरिचित
अभिराम—सुंदर
अभिज्ञ—कुशल, शहाणा
अभिज्ञान—खूण
अंभोधि—समुद्र
अमासा—दुबळा
अमूप—अमोप, पुष्कळ
अमोघ—न चुकणारा
अयोनिज—विष्णु, ईश्वर
अरवार—हलका
अर्चन—पूजा
अर्णव—समुद्र
अर्थी—याचक
अलक—केंस
अलगट— स्वतंत्र, फाजील
अलिंद—ओटा
अवकाश—रिकामी जागा, पोकळी
अवचट—अकस्मात्
अवतीर्ण—उत्पन्न झालेला
अवद्य—निंदा, निंदास्पद भाषण
अवधारणें-खात्री बाळगणें, लक्षांत ठेवणें
अवरोध—अंतःपूर
अवलंब—आश्रय
अवहेळणें—अवहेळणा, हेटाळणी करणें
अविचारिका- अविचारी स्त्री
अविच्छिन्न—निवळ
अविदग्ध—मूर्ख
अविदित—अज्ञात
अविनय—उद्धटपणा
अविरत—सतत, एकसारखा
अविवेक—अविचार
अविवेकी—मूढ, अविचारी
अविषय—अगोचर, अज्ञेय
अविहित—संपूर्ण, अविभागलेला
अव्यक्त—निराकार, निर्गुण परमात्मा
अव्हाट—आडमार्ग
अशन—खाणें
अंशुक—वस्त्र
अशेष—सर्व
अंस—खांदा
असाधारण—अलौकिक
असार—निःसत्त्व, फोल
असाली—राक्षसीण, कृत्या

असीम–अपरंपार
असोशी–उत्कट इच्छा
अहाळणें–पोळणें
अक्षवाण–ओंवाळणें, औक्षण

आ

आक्रोट–अक्रोड
आकळणें–समजणें, ताब्यांत ठेवणें
आकारणें–आकार देणें, आकार येणें
आखंडळ -इंद्र
आगळा–मोठा, श्रेष्ठ, अधिक
आगळा–अर्गळा, अडसर
आचमनीय-चूळ भरून टाकण्याचें पाणी
आतपत्र–छत्री
आतळणें–भेटणें, स्पर्श करणें
आतुडणें–भेटणें
आतंक–भीति
आत्मज–मुलगा
आदरणें–मान देणें, स्वीकारणें
आदर्श–आरसा
आनन–तोंड
आनाय–जाळें
आंदोलणें–हेलकावणें
आंदोलिका–पालखीसारखें एक वाहन
आपगा–नदी
आपण–बाजार
आपती–आपत्ति, संकट
आभा–तेज, कांति
आयु–आयुष्य
आयुध–शस्त्र
आरातिक--आरती
आराधक- पूजा करणारा, भक्त
आराधन–पूजा, प्रसन्न करून घेणें
आलय–घर
आलोडणें–पारंगत होणें, हस्तगत करणें
आवरणें–आवरतें घेणें, आटोपतें घेणें
आवर्त--पाण्यांतील भोंवरा
आवळी--पंक्ती, ओळ
आसक्त–अनुरक्त, मन गुंतलेला
आसक्ति–अनुराग.

इ

इंगळ–निखारा
इंद्रनील–एक प्रकारचें रत्न
इष्ट–यज्ञयागादि कर्म

ई

ईशान–शंकर

उ

उगंड-डा–सुटका, उद्धार
उगवणें–उलगडा करणें
उगला–उगाच, व्यर्थ
उच्छ्रून–फुगलेला, उंचावलेला
उजवणें–लग्न लावणें
उज्ज्वल–चकचकित, प्रकाशमान
उटणें–स्वच्छ करणें, लेप देणें
उटाळणें–उत्पन्न होणें, उठणें, निघणें
उठाण–उन्नतता, उठावदारपणा
उडु–नक्षत्र, तारा
उतटणें–फाटणें
उतती–उदबत्ती

उत्कट—अतिशय, मोठा
उत्पल—कमल
उत्तीर्ण—उतराई
उदधि—सागर, समुद्र
उदन्त—वार्ता
उदास—तटस्थ, निरपेक्ष
उद्धत—उद्धट
उद्योत—प्रकाश
उद्वर्तणें—उटणें वगैरे अंगाला लावणें
उद्वस—उध्वस्त
उद्विग्न—खिन्न
उधंटा—उद्धट आचरणाची
उधार -कमीपणा
उन्नत—उच्च, श्रेष्ठ
उन्माद—कैफ, गर्व
उन्मूळणें—मुळापासून उपटणें
उपकंठ—आसपासच्या प्रदेश
उपचडा—उमाळा, आवेग
उपधान—उशी
उपन्यास—विवरण
उपवन—बाग
उपस्थान—जवळ आणणें, पूजा, सेवा
उपायन—नजर, भेट
उपासना—सेवा
उपेक्षणें—दुर्लक्ष करणें, अनादर करणें
उपेक्षा—हेळसांड, दुर्लक्ष
उपेंद्र—विष्णु
उबगणें—कंटाळणें, त्रासणें
उबाळा—त्रास
उमळणें—मुळापासून उपटणें
उमाधव—शंकर
उमासा—उसासा
उल्का—आकाशांतून तुटलेला तारा
उसंत—विश्रांति

ऊ

ऊरु—मांडी
ऊर्मिका—अंगठी

ऋ

ऋजुत्व—सरळपणा
ऋणानुबंध—पूर्वसंबंध, पूर्वजन्मींचा योगायोग

ओ

ओज—तेज
ओदन—भात

औ

औद्धत्य -उद्धटपणा

क

कटकटी—त्रास, श्रम
कटि—कंबर
कदंब—कळंबाचा वृक्षसमुदाय
कनक—सोनें
कपाट—दरवाजा
कपाळी—शंकर
कपोत—कबूतर, पारवा
कपोल—गाल
कबरी—केशकलाप
कमला—लक्ष्मी
करट—गंडस्थल

करनाल–वाद्यविशेष
करपत्र–करवत
करि–करणी
करिणी–हत्तीण
करीणा–हकीगत, इतिहास
कर्णपिशाच्चिका–गुप्त गोष्ट सांगणारी
कर्णभूषा–कानांत घालण्याचा दागिना बुगड्या, कुडीं वगैरे
कर्पूरमाळा–कापराची माळ
कलाधर–चंद्र
कलापी–मोर
कल्पद्रु–कल्पवृक्ष
कल्पद्रुम–इच्छित वस्तु देणारा वृक्ष, कल्पवृक्ष
कवाड–दरवाजा
कषणें–घासणें
कलि–भांडण
काटणें–कीट चढणें, मलीन होणें
काठी–आधार
कानन–अरण्य
कामना–इच्छा
कामुकी–इच्छा करणारी, लोभी
काश्मीर–केशर
कारुक–चितारी, कारागीर
कार्पण्य–कंजुषपणा
किर्मीरित–नानारंगांची, चित्रविचित्र
किली–किल्ली
किशोर–लहानपोर
किसलय–पालवी, कोमल पल्लव
कीर–पोपट
कुच–स्तन
कुचकुच–कुजबूज
कुमार–कार्तिकेय
कुरंगी–हरिणी
कुड्मल–कळी
कूर्पास–चोळी, काचोळी
कूर्पासक–चोळी
कोक–चक्रवाक पक्षी
कोठी–कोठार, साहित्य ठेवण्याची खोली
कोरकें–कोरान्न, कोरडें अन्न
कोरदार–कंगणीदार
कंज–कमल
कांचन–सोनें
कांची–कंबरपट्टा
किंकिणी–लहान घंटा
कुंतल–केस
कोचकी–पागोटें
कृतांत–यम
कृपाणी–खंजीर, खड्ग
कृशानु–अग्नि
कृष्णसार–हरीण
क्रंदणें–ओरडणें
क्रम–वेदपठणाचा एक प्रकार
क्लीब–नपुंसक
क्वारी–मुलगी

**ख**

खडाणी–लाथ मारणारी गाय

खदिर—कात, खदिरसार
खासा—मुख्य सरदार
खिरणी—एक लहान फळ
खिसमिस—बेदाणा
खोती—मक्ता
खंज—लंगडा
खंजन—पक्षि विशेष
खोंचली—खोंच झाली, दुःखी झाली

ग

गणक—ज्योतिषी, जोशी
गदाग्रज—कृष्ण
गद्य—वृत्तबद्ध रचना नसलेलें लेखन
गंभीर—खोल
गरळा—कडु कारळें किंवा दुसरें एखादें औषध चावून त्याचा तान्ह्या मुलास रस घालतात तो.
गरिमा—पुष्टपणा, मोठेपणा
गाढी—मोठी
गाणेश—गणपतिभक्त
गाथा—गीत; गाणें
गार्हपत्य—अग्नि
गुडी—पताका
गुण—धर्म, भाव
गुह्यक—यक्षकिन्नरांसारखे कुबेर सेवक
गेह—घर
गोडंबी—बिब्याच्या आंतलि बी
गोधूम—गहूं
गोपानशी-सी—सज्जाच्या खांबाखालीं येणारा तुळईचा भाग
गोमायु—कोल्हा
गोमेद—एक रत्न
गोसी—गोष्ट
गंगालय—घंगाळ
गंमणें—गवसणें, शोधून काढणें
गोंडाळ—गोंडस
गोंवणें—घेरणें, गुरफटणें, बांधणें
ग्रंथी—गांठ
गृहपति—अग्नि

घ

घट—घागर
घटिका—प्रत्येक घटकेला
घडीत—घडण
घाट—आकार
घालफेडी—गडबड, घालमेल
घालाघाली—गोंधळ, धांदल
घुरट—घाणेरडी
घोंग—मोठें

च

चतुरानन—ब्रह्मदेव
चतुर्वक्त्र—ब्रह्मदेव
चय—समुदाय
चर—जंगम
चलथ—चवड, रास, चळथ
चार—चपळ, उनाड
चामर—चवरी
चार—हेर
चिकसा—उटणें, सुगंधी द्रव्य
चित्तांक—गळ्यांतील एक दागिना

चिरीटी–चिरडखोर
चूचुक–स्तनाचें अग्र
चूडा–बांगड्या
चेडें–चेटुक
चैतन्य–परमात्मा, ब्रह्म
चोवा–चंदनाची उटी
चौकी–लहान, चौरंग
चौढाळणें–गोलंकार करणें
चंडातक–चोळी, काचोळी
चंद्रशाला–गच्ची
चिंतामणी–इच्छित वस्तु देणारा मणी
चिंतावणें–चिंता करणें
च्छांदस–च्छांदिष्ट, लहरी

छ

छमीना–शामियाना, डेरा
छाया–कांति, टवटवी, सावली
छुरिका–सुरी

ज

जगती–पृथ्वी
जघन–ढुंगण
जडता–मंदपणा
जनयित्री–माता
जयीं–जेव्हां
जरा–म्हातारपण
जलयंत्र–कारंजें
जव–हातांतील बांगड्यांसारखा
दागिना
जवन–वेगवान
जाकळणें–पोळणें, कळवळणें
जानु–गुढगा
जाया–पत्नी
जिववणें–जिवंत ठेवणें, जगविणें
जिव्हार–अंत:करण, काळीज
जिव्हाळा–झरा, अंत:करण
जेठी–मल्ल, पैलवान
जोहरी–रत्नपारखी
जंगम–चल, एका ठिकाणाहून दुसरी-
कडे हलवितां येणारा
जंबूक–कोल्हा
जांब–पेला
जांबूनद–सोनें

झ

झळंबणें–पाझरूं लागणें
झळाळी–तेज, चकाकी
झांपडी–झांपड, गुंगी
झांस–धमकावणी, तळमळ

ट

टोप–मुकुट, शिरस्त्राण

ड

डाळणें–डावलणें, प्रतिकार करणें,
बाजूला लोटणें
डांभा–डौल, गर्व

ढ

ढाल–ढंग, साहसकर्म

त

तकवा–धीर, बळ
तगटी–भरजरी
तटणें–थांबणें, बंद पडणें

तत्त्व–खरी गोष्ट, वस्तुस्थिति
तत्त्वार्थ–सार
तनुता–क्षीणता
तन्वी–नाजुक, सडपातळ अंगाची स्त्री
तमिस्त्र–अंधकार
तरल–अस्थिर, न ढळणारें, चकाकणारें
तरला–चपल स्त्री
तल्य–बिछाना
ताटस्थ–तटस्थ वृत्ति, औदासिन्य
ताटक–तानवडा, एक कर्णभूषण
तानवडा–एक कर्णभूषण
ताफता–एक उंची रेशमी वस्त्र
तालवृंत–पंखा
तिरकुट–तीळकूट, तीळ कुटून केलेली चटणी
तिवाटी–विधुळवाटी
तिवाशी–गादी, गालिचा
तिळवा–तिळाचा लाडू
तुरंगी–घोडी
तुहिनकर–चंद्र
तोडर–पायांत घालण्याचा एक दागिना
तंती–ओळ, मार्ग
तांखडी–हुशार, शहाणी
तांत्रिक–तंत्रशास्त्रज्ञ
तांबूल–विडा
तोंडखोडी–तोंड टाकून बोलण्याची खोड असणारा
तृष्णा–वासना
त्रपा–लज्जा

## थ

थटी–कणगी, सांठविण्याची जागा
थारणें–स्थिर होणें
थोकणें–थांबणें
थोपविणें–थांबविणें

## द

दमन–पराभव
दमामा–मोठा नगारा
दरोगीण–दासींवर देखरेख करणारी मुख्य दासी
दल–पान
दळदर–दळदार, जाड
दापणें–दटावणें, दाबणें
दायी–दाई, उपमाता
दारा–पत्नी
दारिका–कन्या
दावें–दारी
दाशार्ह–यादव
दिनमणी–सूर्य
दिदृक्षा–पाहण्याची इच्छा
दीक्षा–नेहमींची रीत
दुकूल–वस्त्र
दुरदृष्ट–अदृष्ट, दैव
दुरळ–कडक, तीव्र
दुराशा–दुष्ट वासना
दुरित–पाप
दुर्निवार–प्रतिकार करण्यास कठीण.
दुर्वह–वाहण्यास, पार पाडण्यास कठीण

दुलडी–दूड
देखी–दृष्ट
देवई–कृष्णमाता देवकी
देवडें–वांकडें
देवढें–एकाशीं एक लागलेलें
देहली–उंबरठा
दैनंदिन–रोजचें
दैवज्ञ–जोशी, ज्योतिषी
दैवेकरी–दैववान
दोहणें–दूध काढणें
दौवारिक–द्वारपाल, रक्षक
दौश्चित्य–दुष्ट विचार
दृष्ट–वाईट, घातुक नजर
द्युति–कांति
द्वारवती–द्वारावती, द्वारका नगरी
द्विजपति–चंद्र, ब्राह्मणश्रेष्ठ
द्विजराज–चंद्र
द्विधा–दुभंग
द्विपवर–उत्तम हत्ती
द्विरद–हत्ती
द्वैपायन–शुक

## ध

धटी–मूल्यवान रेशमी वस्त्र
धन्वी–धनर्विद्येंत प्रवीण असलेला, धनुर्धारी
धम्मिल्ल–केशकलाप, वेणी
धसणें–घुसणें
धाणें–तृप्त होणें
धाता–प्रकार, मार्ग, ब्रह्मदेव
धात्रा–दाई
धाम–तेज, वसतिस्थान
धुडावणें–धुडकवून लावणें, नाहींसें करणें
ध्वांत–अंधकार

## न

नग–दागिना
नर्द–नरद, सोंगटी
नलिका–नळी
नलिनी–कमळ
नवोढा–नव वधू
नाति–नात
नाराच–बाण
नारिकेल–नारळ
नालीक–बाण, बंदूक
नासिका–नाक
निकसी–मऊ, गचाळ
निकेत–स्थान
निकेतन–स्थान, घर
निखिल–सर्व
निचय–समुदाय
नितंब–ढुंगण
नितंबिनी–स्त्री
नितंवणें–चकाकणें, शोभणें, सुंदर दिसणें
निदान–रोगपरीक्षा, चिकित्सा, कारण
निदेश–आज्ञा, निरोप
निधान–ठेवा
निधायी–विश्वासांतील स्त्री किंवा दासी

निधि–समुद्र, खजीना, द्रव्याचा सांठा
निपट–खरोखर, सर्वस्वी
नियत–खरोखर
नियोग–काम, आज्ञा
नियोजणें–जुंपणें, लावणें
नियोजिली–ठेवली, योजना केली
नियंता–नियमन करणारा, ताब्यांत ठेवणारा
निरत–तत्पर
निरसत–निरसन
निरतिशय–अतोनात
निरय–नरक
निरवधि–अतिशय
निराकार–आकाररहित
निराळ–आकाश
निरीह–निरिच्छ
निरोधणें–रोखणें, प्रतिबंध करणें
निरंजन–निर्विकल्प, शुद्ध
निर्गम–बाहेर जाणें, सोडून जाणें
निर्द्वंद्व–सुखदु:खरहित
निर्माण–उत्पन्न
निर्वाण–सुटका
निर्वासन–वासनारहित, निरिच्छ
निर्वाह–कार्यक्षमता, अंगीकृत कार्य पार पाडण्याचा निश्चय
निर्विकल्प–अज्ञेय, अतर्क्य
निर्विकारी–विकाररहित
निलज–निर्लज्ज
निलय–घर, वसतिस्थान
निवह–समुदाय
निवाडें–शेवटीं, अखेरीस
निवाणी–खराब, वाईट
निवास–वसति, राहणें
निवेदणें–समर्पण करणें
निवृत्ति–वैराग्य
निश्चेतना–मूर्च्छित
निश्वास–सुस्कारे, उच्छ्वास
निषद्या–जागा, स्थान
निष्किंचन–दारिद्री
नि:सहांगी–जिच्या अवयवांना सहन होत नाहीं अशी
नि:संग–तटस्थ, उदासवृत्तीचा
नीरद–मेघ
निराजणें–निरांजन ओंवाळणें
नीवि–निऱ्या, निऱ्याची गांठ
नीशार–मच्छरदाणी, घाबळी
नैपुण्य–प्राविण्य.
नैय्यायिक–न्यायशास्त्र जाणणारा
नैर्ऋत्य–नैर्ऋतेकडची देवता, नैर्ऋतेय
नंदिनी–मुलगी
नांदवणें–पुष्कळ दिवस सुखानें राहूं देणें, टिकाविणें
न्याहाली–पराची गादी
न्यून–उणें, कमी

प

पट–वस्त्र, पटका
पटक–वस्त्र
पटह–नगारा, ढोल

पडण–संकट
पण्यांगना–वारांगना,
पतद्ग्रही–तस्त
पद्मराग–माणिक, लाल
पद्य–वृत्तबद्ध रचना
परब्रह्म–परमात्मा
परभाग–उत्तम गुण
परभारीं–परस्पर
परमहंस–संन्यासी
परमार्थ–आत्मज्ञानाचा किंवा मोक्षाचा विचार
परंपरा–ओळी
परात्पर–सर्वश्रेष्ठ
परामर्ष–विचारपूस, समाचार
परावृत्ति–परत फिरणे
परिचर्या–सेवा
परिचारिका–दासी
परिजन–सेवक, दास
परिणत–ज्ञानवृद्ध
परिधान–वस्त्र नेसणें, पांघरणें
परिपाक–परिणाम, फळ
पारिपाटी–रीत, परिपाठ
परिवेषण–वाढप
पल्लव–पदर
पल्ली–पाल
पवणें–प्राप्त होणें, मिळणें
पाखर–घोड्याची किंवा हत्तीची झूल
पाचारणें–बोलावणें
पाची–एक रत्न, पांच, शिपायी, वीर
पाटाउ–उंची रेशमी वस्त्र, पाटाव
पाड–महत्त्व, मोठेपणा
पातित्य–अधःपात
पातें–पापणी
पाद्य–देवास स्नानाचे वेळीं घालण्याचें पाणी
पान–कर्णभूषण विशेष
पाभर–गरीब बिचारें
पायोनिधि–समुद्र
पारणें–समाधान, तृप्ति
पार्थ–राजा, अर्जुन
पार्श्व–भाग, बाजू
पालव–पल्लव, पदर
पाव–पाय
पावक–अग्नि
पावणें–प्रसन्न होणें
पाशपाणी–वरुण
पाळा–वेढा, समुदाय
पिक–कोकीळ पक्षी
पिपासा–तहान
पिपीलिका–मुंगी
पिशाची–डाकिनी, भूत
पिसाळणें–वेड्यासारखें वागणें
पिसें–वेडें
पीठ–आसन
पीयूष–अमृत
पुराण–प्राचीन, जुना
पुरारि–शंकर
पुरोडाश–हविर्द्रव्य

पुलीन—वाळवंट
पुष्पपु—मदन
पूगीफल—सुपारी
पूर्त—दानधर्माचीं कृत्यं
पषण—दळण
पैशुन्य—लबाडी, चहाडखोरपणा
पोखती—पोक्त, प्रौढ
पोल्हार—पैंजण
पौराणिक—पुराण वाचणारा, पुराणीक
पौरुष—पराक्रम, शौर्य
पचबाण—मदन
पंचेषु—मदन
पंजर—पिंजरा
पंवाडा—पराक्रम
पाजण—नव्या वस्त्रास खळ देणं
पाड्य—एका देशाचें नांव
पोंहची—पोंची ( पुरुषाच्या मनगटावरील एक दागिना)
पौंड्रक—चिन्ह
प्रगट—उघड
प्रगल्भता—प्रौढपणा, शहाणपणा
प्रोञ्छन—अंग पुसणं
प्रणति—नमस्कार, नमन
प्रतिवचन—उत्तर
प्रतीहारिका—द्वारपालिका
प्रथित—विख्यात
प्रपंची—संसारिक
प्रमाणगी—परवानगी, हुकूम
प्रमुदित—आनंदित
प्रवर्तणे—आरंभ करणे
प्रवाह—कार्यक्रम
प्रवाळ—पोंवळ
प्रशस्त—विस्तीर्ण ऐसपैस
प्रसाद—काव्याला स्वाभाविकपणें येणारी सुबोधता
प्रसु-सू—माता
प्रस्ताव—पश्चात्ताप
प्रक्षेप—टाकणे, फेकणे
प्राकार—तट
प्राक्तन—दैव
प्रारब्ध—नशीब, दैव
प्राशन—भक्षण
प्रासाद—राजवाडा

फ

फरा—घर, आवार
फरास—बिछाईत घालणारा
फांकणं—लांब जाणें
फुलेल—फुलांचें अत्तर, तेल

ब

बरवा—सुंदर, चांगला
बजागी—हट्टी, भांडखोर
बडिश—बलिश, मासे धरणाऱ्या कोळ्याच्या दोरीला मासा अडकण्याकरिता बांधलेला गळ
बणण—घडून येणे, जमणं, वश होणं, अनुकूल होणं
बराडी—भिकारी, आशाळभूत
बर्ह—पीस

बलाई—इडापिडा
बहळ—पुष्कळ
बाट—लबाड
बाड—तंबूची कनाथ, पडदा
बाफता रेशमी वस्त्र
बाहणें—बोलावणें
बाहे—हात
बिजवरा—कपाळावरचा एक दागिना
बिडाल—मांजर
बिदी—रस्ता, गल्ली
बिरडें—गांठ
बीरुद—प्रतिज्ञा, बाणा, ब्रीद
बुझवणं—समजूत करणें
बेसर—नथ
बोज—प्रतिष्ठा, महत्त्व
बोटवा—गव्हला
बंदी—भाट, स्तुतिपाठक
ब्रह्म—चैतन्य, परमात्मा
ब्रह्मांड—विश्व

भ

भव—संसार
भाक—वचन
भान—ज्ञान, कल्पना
भामिनी—रागावलेली स्त्री
भारती—वाणी
भाव—भक्ति, प्रेम, स्वभाव
भावणें—वाटणें
भीरू—भित्री स्त्री
भुजिष्या—दासी
भूत—प्राणी
भूभुज—राजा
भूमीरुह—वृक्ष
भूषा—दागिना
भेकी—बेडकी
भेण—भय
भेरी—नौबत
भेषज—औषध
भोंवणें—फिरणें, घिऱ्या घालणें

म

मणिबंध—मनगट
मधुपर्क—अतिथीची पूजा
मध्य—कंबर
मध्यस्थ—मध्यस्थी
मनस्वी—मन ताब्यांत असलेला
मनोज—मदन, काम
मन्मथ—मदन
मरीच—काळे मिरें
मल्लारी—मल्हारी; खंडोबा
मल्ली—लताविशेष
महर्घ—मूल्यवान
महार्घ—महाग, दुष्प्राप्य
महाप्रस्थान—मृत्यु
महालक्ष्मी—आदिशक्ति महामाया लक्ष्मी
महिषी—म्हैस
मागती—पुन्हा
माज—कंबर
मातुलिंग—महाळुंग

मातुल—मातुल, मामा
माध्व—मध्वसंप्रदायी
मानणें—वाटणें, आवडणें
मान्य—पूजनीय, सन्माननीय
माया—मोह, अज्ञान
मालती—गव्हल्यासारखा खिरींत घालण्याचा एक पदार्थ
माव—माया, कपट
माष—उडीद
मिहिर—सूर्य
मीन—मासा
मीमांसक—मीमांसा जाणणारे
मुकुलित—मिटलेलें
मुक्ता—मोतीं
मुक्ताफल—मोतीं
मुखरणि—मुखरण, मुख्य
मुग्ध—वेडा
मुग्धा—सोळा वर्षांच्या आंतील स्त्री
मुदा—मुद्दा, मुख्य गोष्ट
मुद्रिका—अंगठी
मुरणें—तृप्त होणें
मुष्टिक—बुक्क्या मारून लढणारा
मुसली—बलराम
मुळचिठ्ठी—मूळचिठ्ठी, आमंत्रणपत्रिका
मूर्धन्य—श्रेष्ठ, मुकुटमणि
मूस—आटणी, साचा, घडण
मूळ—बोलावणें
मेखळा—कमरपट्टा
मेचक—मेघ
मेचणें—भिऊन माघार घेणें
मेटें—चौकी, पहारा
मेध्या—हुशार, शहाणी
मोकलणें—पाठविणें, सोडणें
मोगरेल—मोगऱ्याचें तेल
मोट—सांठा
मोर—नाकांतला एक दागिना
मोरछळ—मोरचल, मोराच्या पिसांचा कुंचा किंवा चवरी
मोळा—वागण्याची पद्धत
मंचक—पलंग, झोपाळा
मंत्रवादी—मांत्रिक, मंत्र घालणारा
मंथणें—पराभव करणें; ठार मारणे
मांसल—पुष्ट
मैंद—घातकी, दुष्ट माणूस
मृगाक्षी—हरिणनयना
मृणाल—कमलाचा देंठ
मृषा—खोटें

### य

यज्वा—होमहवन करणारा
याग—यज्ञ
यान—रथ
यायजूक—नेहमीं यज्ञ करणारा
यावा—ढोल
युग्म—जोडी, दोन
युगुल—जोडी, द्वय
येकदाणें—एकदाणी
येकावळी—एकावली, एकसराचा हार
येला—वेलची, वेलदोडा

येव–येणें
योग–भेट, प्रसंग, ध्यान
योगनिद्रा–समाधी
योषित्–स्त्री
यंत्र–कांहीं तरी जादु टोण्याची आकृति किंवा कोष्टक

र

रजत–रुपें
रतिपति–मदन
रती–हिरे-मोत्यें वजन करण्याचें अति लहान वजन
रत्नाकर–समुद्र
रथ्या–रस्ता
रमणी–सुंदरी, स्त्री
रय–वेग, गति
रव–आवाज, स्वर
रशना–पट्टा
रस–गोडी, रुचि
रसना–वाणी, जीभ
रसाला–सुरस, रसाळ
रसोडेक–रसाळ, रसभरित
रहाणे–रहाणी, वागण्याची पद्धत
रहाळ–परिचय, मार्ग
राका–पौर्णिमा
राजक–राजांचा समुदाय
राजन्य–राजांचा समुदाय
राजस–सुकुमार, सुंदर
रातणें–रममाण होणे
राति–रात्र
रामा–सुंदर स्त्री
राव–राजा
रुक्म–सोने
रुचि–रंग
रुचिर–सुंदर
रोख–झोंक; मनाचा कल
रोखणे–बंद पाडणें, बंद पडणे
रोचकता–रुचि
ऱ्ही–लज्जा

ल

लभ्य–प्राप्त होण्यासारखी
ललना–स्त्री
लसणें–वैडूर्यमणि, एक रत्न
लक्ष्य–नेम मारण्याची वस्तु; ध्येय
लाग–संधान, प्राप्ति
लागट–लोचट, चिकटणारी
लालस–उत्कंठेनें
लासणे–भाजणे
लाहणे–मिळणे
लिगाड–खाडसाळ
लिप्त–दूषित
लेखा–किंमत, पाड
लेणे–दागिना, धारण करणें
लेवा–लेप
लौंद–दांडगे
लांसी–राक्षसीण

व

वचणे–जाणे
वत्सल–ममताळू

वदान्य—उदार
वनिता—स्त्री
वयस्या—सखि, मैत्रीण
वरदा—कुमारी
वरपंगत—वरकांती, वरवरचा देखावा, वरपांगी
वराकी—गरीब, दुर्दैवी स्त्री
वराडी—वऱ्हाडी, लग्नकार्याकरितां जमलेले लोक
वरान्न—वरण
वरोरू—सुंदर स्त्री
वर्ग्य—बांधव, भाऊबंद
वर्तणें—वर्तन करणें, वागणें
वर्षा—पावसाळा
वल्लभ—लाडका
वल्लरी—वेली
वश्य—अनुकूल
वश्या—वश
वसन—वस्त्र
वसुंधरा—पृथ्वी
वळवट—गव्हले, शेवया वळून केलेले पदार्थ
वक्षोरुह—स्तन
वाक्पति—बृहस्पती
वाखा—नाश, त्रास, पडापडी
वाजपेयी—वाजपेय नांवाचा यज्ञ करणारा
वातायन—खिडकी
वात्सल्य—प्रेम
वादित्र—वाजंत्री
वारणें—निवारण करणें, बाजूला करणें
वारांगना—नायकीण, वेश्या
वारी—पाणी, यात्रा, चालणें
वारुणी—पश्चिम दिशा
वावडणें—भटकणें
वावहणें—पळून जाणें
वासव—इंद्र
वाळक—वाळुक, काकडी
विकणें—मान्य होणें
विकत्थन—प्रौढी, गर्व
विकल्प—संशय, भ्रम
विकसणें—विकास पावणें, वाढणें, उमलणें
विखळ—दुष्ट
विखंडणें—दुःखित करणें
विघड—बिघाड, वियोग
विघडणें—बिघडणें
विचळणें—वेडा होणें
विच्छाय—फिकें, पांढरें
विजवटी—द्वाड; व्रात्य
विटंक—खुराडें
विदग्ध—शहाणा माणूस
विदेश—परदेश
विदेशी—परका
विदेही—विरक्त
विधाता—ब्रह्मदेव
विधि—ब्रह्मदेव
विधेयी—कर्तव्यदक्ष

विनीत--विनयशील, नम्र
विपारी--विरूप, कुरूप
विपंची--वीणा
विप्रतिपात्ति-मतभिन्नता
विप्राश्निक-भविष्य सांगणारा; ज्योतिषी
विबुध-देव
विभक्त-भिन्न, निरनिराळी
विभूति--रक्षा, राख
विमुख-पराङ्मुख, प्रतिकूल
विरमणें-थांबणें, शेवट होणें
विराजणें-शोभणें
विरोदी-विराली
विरोधी-विरोध करणारा
विलपण-शोक करणें
विलसणें-शोभणें
विलसित-शोभा, सौंदर्य
विलास-सुखोपभोग, क्रीडा
विलुठणें-लोळणें
विलोचन--डोळा
विविक्त-एकांत
विवेक-विचार
विशाखा-एक नक्षत्र
विशिख-बाण
विषण्ण-खिन्न
विषय-भोग्य पदार्थ
विषाद-कंटाळा, निरुत्साह, दुःख
विसर्जणें-त्याग करणें, सोडणें
विहित-नेमून दिलेलें
विहिरा-विहीर
विहंगम--पक्षी
विज्ञ--ज्ञानी पुरुष
वीचि-लाट, लहर
वीथि-मार्ग
वेंधविणें--चढविणें
वेठ-बिगारी, मजूर
वेत्रधर-भालदार, चोपदार
वेदिका-ओटा
वेदी-यज्ञाचा ओटा
वेधा-महादेव
वैखरी-वाणी
वैदग्ध्य-चातुर्य
वो-अवो, अहो
वोघ--ओघ, प्रवाह
वोचकणें -भिणें
वोटी-ओंटी
वोड-आपत्ति
वोढी-ओढ
वोसजणें-ओसरणें, कमी होणें
वोळघणें- चढणें, वळणें
वोहट-ओहटी;
वंचणें-फसविणें
वंचना-कपट फसवणूक
वंचविणें-फसविणें
वंद्य-वंदनीय, पूज्य
विंजण-वारा
विंजणा-पंखा
वेंघणें-चढणें
वेंचणें-खर्चणें, खर्च होणें, करणें

बेंचा निवडक भाग, उतारा
वोंटीं—पदर, ओंटी
वृंद—समुदाय
वृशभ—वृषभ, बैल
वृष—बैल
वृष्णि—यादव
व्यक्त—परमात्म्याचें सगुण, साकार रूप
व्यजन—पंखा
व्यवसित—व्यवसाय
व्यसन—संकट
व्यापक—व्यापून टाकणारें
व्यापार—आयुष्यांतील कृत्यें
व्रज—गोकुळ
व्रत—धार्मिक कर्म

## श

शकट—गाडा, गाडी
शची—इंद्राणी
शरण्य—लक्ष्य, शरसंधान करण्याचा पदार्थ
शरीरी—शरीर धारण करणारा पुरुष
शर्वाणी—पार्वती
शलाका—सळई
शल्य—बाण, मनाला टोंचणारी गोष्ट
शशी—चंद्र, कापूर
शाटिका—साडी, पैठणी
शाली—साळी, भात
शाक्त—देवीचा उपासक
शितिकंठ—शंकर
शिबीर सैन्याचा तळ
शिक्षापन—शिकवण
शील—स्वभाव
शुचिष्मंत—शुद्ध, स्वच्छ
शुष्क—सुकलेलें, म्लान
शूर्प—सूप
शेखर—डोक्यावरचा तुरा
शैवल—शेवाळ
शैशव—बाल्यावस्था
शाण—तांबडें
शौरी—कृष्ण
शांभव—शंकरभक्त
शृंगाटक—रस्त्यातला चौक
श्यामल—सांवळें
श्रवण—कान
श्रेणी—पंक्ति, समुदाय
श्रोत्रिय—वैदिक ब्राह्मण
श्लथ सैल
श्लाघ्य—प्रशंसनीय

## स

सक्त—गुंतलेला
सखवार—सुकुमार
सखर—ठाशीव; घट्ट विणीचें
सजण—मित्र, सखा
सजणें—जमणें; घडणें, शोभणें
सतखाका—ओवाळून टाकलेला जिन्नस
सतरंज—बुद्धिबळें
सदन—घर
सद्म—घर

सनातन—चिरकाल टिकणारें, शाश्वत
सप्ताश्व—सूर्य
समीक्षा—शोधपूर्वक पाहणें
सरवळा—गळ्ह्ल्यासारखा खिरींत घालण्याचा एक पदार्थ
सरोज—कमल
सवारणें—शृंगारणें
सहकार—आम्रवृक्ष
सहकारी—पत्नी
सहस्रपत्र-कमल
साची—सुंदर
साजिरा—सुंदर
साडू—बायकोच्या बहिणीचा नवरा
सात्यकि—कृष्णाचा सारथी
साध्वस—भीति
सापत्न—सावत्र, सावत्रभाव
साफल्य—सार्थक
सारंग—हरिण
सायक-बाण
सायी—सावली
साली-मेहुणी
साव—प्रामाणिक पुरुष
साह्यकारी—साह्यकर्ता
सित—टोंक असलेला, कुशाग्र
सिसफूल—केसांत घालण्याचें चंद्राकार फूल
सुकृत—पुण्य
सुखा—सुखकर
सुरवा—विजार, पायचोळणा
सुजि-सूज, वाढ
सुदती—सुंदर स्त्री
सुधांशु—चंद्र
सुपानी—पाणीदार
सुरभि—सुवासिक
सुलज—लज्जावती, लाजाळू
सूकर—वराह, डुकर
सूद—स्वैंपाकी
सेला—शेला
सोदर—भाऊ
सोदरी—बहीण
सोपान—जिना, पायरी
सोमयाजी—सोमयाग करणारा
सोय—आधार, आश्रय
सोयरा—संबंधी, नातेवाईक
सोहळा—उत्सव
सौभाग्य—सुदैव
सौमिक—सोमरससंबंधी
सौर—सूर्योपासक
सौविदल्ल—जनानखान्यांतील सेवक
संकर्षण—बळराम
संकल्प—विचार, हेतु
संगत—युक्त, सहित
संच—बांधा, पुडा
संतान—अपत्य
संध्या—संधिकाल
संपर्ग—संपर्क, स्पर्श
संभार—साहित्य, समूह
संभ्रम—घोटाळा

संमर्द—दाटी गर्दी
संमार्जनी—केरसुणी
संवाहन—पाय चेपणें, चुरणें
संविधान—व्यवस्था, तयारी
संविजन—वारा घालणें
संसृति-संसार
संहारणं—ठार मारणें
संक्षुब्ध—प्रक्षुब्ध, रागावलेला
सांकड—संकट
सांडणी—ओवाळून टाकलेला पदार्थ
सांध-नाडी, शीर
सिंधु-समुद्र
सिंपी—गोकर्ण, बोंडलें, दूध पाजण्याचा शिंपला
सौंगडी—सवंगडी, सोबती
स्पंदन—चलन-वलन, हालचाल
स्यंदन—रथ
स्थगित- विचारांत गढून गेलेली, तल्लीन, लुप्त
स्थविर—म्हातारा
स्थावर—अचल, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं न नेतां येण्याजोगा
स्फुलिंग—ठिणगी
स्फोटन—फोडणें, विदारणें
स्मेर—हास्य
स्वन—नाद, आवाज
स्वाप—निद्रा

### ह

हनोटी—हनुवटी
हय—घोडा
हरिता—दिशा
हरिद्र—हळद
हलधर—बळराम
हली—हली, बळराम
हाट—बाजार
हातसर—हातांत घालण्याचें मनगट्यासारखें कंकण
हातरोखा—हातानें लिहून दिलेली हुंडी दस्तएवज वगैरे
हारपणें—नाहींसें होणें
हिमकर-चंद्र
हिलाली-मशाल धरणारा
हीरक—हिरा
हुतवह—अग्नि
हुताशन—अग्नि
हुंबरी—गावळ्यांचा एक खेळ
हेजीब—दूत
हेम—सुवर्ण, धन
हेलना—हेटाळणी, अपमान
हेला—हेळसांड, धिक्कार
होरड—हट्ट
हंसतुळिका—हंसाच्या पराची गादी
ह्राद—सरोवर

### क्ष

क्षाळणें—धुणें, शुद्ध करणें
क्षितिधर—पर्वत